
# शब्द रुची

४७


बीएमएम अटलांटिक सिटी अधिवेशन विशेषांक

ऑगस्ट २०२२ • मूल्य १० रु. • पृष्ठे ६४



Government of Maharashtra | MAGNETIC MAHARASHTRA #MadeForBusiness | MAKE IN INDIA

# मॅग्नेटिक महाराष्ट्र



## प्रमुख औद्योगिक समूह

- **मुंबई-ठाणे-रायगड । १५००० एकर**
  अभियांत्रिकी । अन्न प्रक्रिया । वाहन उद्योग व सुटे भाग । रसायने । औषधनिर्माण
- **पुणे-चाकण-तळेगाव-सातारा । ८००० एकर**
  डाटा सेंटर । रत्ने व आभूषणे । अभियांत्रिकी । अन्न प्रक्रिया । वाहन व सुटे भाग । इएसडीएम लॉजिस्टिक्स
- **नाशिक-मालेगाव-अहमदनगर । ५००० एकर**
  अन्न प्रक्रिया । वैद्यकीय उपकरण । इएसडीएम । अभियांत्रिकी
- **औरंगाबाद (AURIC, DMIC) - जालना । ८००० एकर**
  अन्न प्रक्रिया । वाहन व सुटे भाग । इएसडीएम । वस्त्रोद्योग
- **नागपूर- अमरावती । ४००० एकर**
  अंतराळ आणि संरक्षण । अभियांत्रिकी । वस्त्रोद्योग । अन्न प्रक्रिया

## महाराष्ट्र : देशाचे आर्थिक शक्तीकेंद्र

- **भारतातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था**
  महाराष्ट्राचे एकूण देशांतर्गत उत्पादन मूल्य ४०२ अब्ज बिलियन डॉलर्स; भारताच्या एकूण देशांतर्गत उत्पादनामध्ये १४% योगदान
- **थेट परदेशी गुंतवणूकीमध्ये सर्वाधिक वाटा**
  २०००-२०२० कालावधीत १४० अब्ज बिलियन डॉलर्स थेट परकीय गुंतवणूकीस आकर्षित केले : भारताच्या एकूण वाट्यात ३०% योगदान
- **उत्पादनात अग्रेसर**
  भारताच्या एकूण औद्योगिक उत्पादनात महाराष्ट्राचे १५% योगदान
- **IPRS मध्ये सर्वोत्तम औद्योगिक क्षेत्रे**
  केंद्र सरकारच्या उद्योग संवर्धन आणि अंतर्गत व्यापार विभागामार्फत (DPIIT) इंडस्ट्रियल पार्क रेटिंग सिस्टीम (IPRS) अहवालानुसार महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक सर्वोत्तम औद्योगिक क्षेत्रे
- **उत्तम कायदा व सुव्यवस्था**
  महाराष्ट्र राज्य हे प्रगतिक प्रशासन व धोरण सातत्यासाठी ओळखले जाते.
- **निर्यातीत अग्रस्थानी**
  महाराष्ट्राचे निर्यात मूल्य सर्वाधिक आहे. भारताच्या एकूण निर्यातीत २१% योगदान
- **सर्वोत्तम गुणवत्तेचे मनुष्यबळ**
  भारतातील सर्वाधिक म्हणजे ६८% रोजगारक्षम गुणवत्ता महाराष्ट्रात आहे.
- **समृद्ध पायाभूत सुविधा**
  ३ आंतरराष्ट्रीय आणि १३ देशांतर्गत विमानतळ, २ प्रमुख व ५३ लहान बंदरे आणि सर्वाधिक ऊर्जाक्षमता.

## एकूण गुंतवणूक करार - रु ६,२१,७५५ कोटी

**थेट परकीय गुंतवणूक - रु २,८८,९०५ कोटी**
(ऑक्टोबर २०१९ ते मार्च २०२२)

**नियमित गुंतवणूक - रु ६२,९६३.६४ कोटी**
(डिसेंबर २०२० पासून)

**प्रमुख कॉरिडॉर भागीदारांबरोबर धोरणात्मक गुंतवणूक सहकार्य करार:**

- युएस- इंडिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरम (युएसआयएसपीएफ), युएसए साठी
- कोरिया-ट्रेड इन्व्हेस्टमेंट प्रमोशन एजन्सी, (केओटीआरए), दक्षिण कोरिया साठी
- युनायटेड किंगडम - इंडिया बिझनेस कौन्सिल, (युकेआयबीसी), युकेसाठी
- वर्ल्ड असोसिएशन फॉर इन्व्हेस्टमेंट प्रमोशन एजन्सीज (डब्ल्यूएआयपीए)
- इंडो फ्रेंच चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (आयएफसीसीआय)
- आफ्रिका इंडिया इकॉनॉमिक फाउंडेशन (एआयईएफ)

## गुंतवणूक करारांवर स्वाक्षरी

कोविड आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा एक भाग म्हणून जून २०२० ते मे २०२२ या कालावधीत एमआयडीसी आणि उद्योग विभाग यांनी एकत्रितपणे देश-विदेशातील आघाडीच्या गुंतवणूकदारांबरोबर ६,२१,७५५ कोटी रुपयांचे आणि ४,३०,२०२ रोजगार निर्मितीक्षमतेचे १२३ सामंजस्य करार केले.

- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, जून व जुलै २०२० -**
  **रु १७,६८६ कोटी । १४,०२५ रोजगार**
  सामंजस्य करार- १५ । आधारभूत क्षेत्रे - रसायने, वाहन, इएसडीएम, तेल आणि वायू । प्रमुख राष्ट्रे - युएसए, जपान, सिंगापूर, दक्षिण कोरिया
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, नोव्हेंबर २०२० -**
  **रु ३४,८२९ कोटी । २३,१८२ रोजगार**
  सामंजस्य करार- १५ । आधारभूत क्षेत्रे - डाटा सेंटर, लॉजिस्टिक्स, इलेक्ट्रॉनिक्स । प्रमुख राष्ट्रे - स्पेन, युनायटेड किंगडम, जपान, सिंगापूर, भारत.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, डिसेंबर २०२० -**
  **रु ६१,०४२ कोटी । २,५५,३८० रोजगार**
  सामंजस्य करार- २५ । आधारभूत क्षेत्रे - डाटा सेंटर, लॉजिस्टिक्स, इलेक्ट्रॉनिक्स । प्रमुख राष्ट्रे - भारत.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, जुलै २०२१ -**
  **रु १६,५०० कोटी । ५,००० रोजगार**
  सामंजस्य करार- २ । आधारभूत क्षेत्रे - तेल आणि नैसर्गिक वायू, अक्षय ऊर्जा । प्रमुख राष्ट्रे - ऑस्ट्रेलिया, भारत
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, सप्टेंबर २०२१ -**
  **रु ३५,५०० कोटी । १०,००० रोजगार**
  सामंजस्य करार- २ । आधारभूत क्षेत्रे - अक्षय ऊर्जा । प्रमुख राष्ट्रे - भारत
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, ऑक्टोबर २०२१ -**
  **रु २,८२३ कोटी । १,२५० रोजगार**
  सामंजस्य करार- १ । आधारभूत क्षेत्रे - विद्युत वाहने । प्रमुख राष्ट्रे - युके.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, नोव्हेंबर २०२१ - दुबई एक्स्पो २०२० - रु १५,६१७ कोटी । ११,३८५ रोजगार**
  सामंजस्य करार- २५ । आधारभूत क्षेत्रे - लॉजिस्टिक, ऑटो कॉम्पोनंट्स, ऑक्सिजन मॅन्युफॅक्चरिंग, डेटा सेंटर्स, जैवइंधन । प्रमुख राष्ट्रे - जपान, सिंगापूर, स्वीडन, कोरिया, जर्मनी, इटली व भारत.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, डिसेंबर २०२१ व जानेवारी २०२२**
  **रु ५,५१२ कोटी । ९,९८० रोजगार**
  सामंजस्य करार- १३ । आधारभूत क्षेत्रे - जैव-इंधन, खढ/खढएड, तांत्रिक वस्त्र, रसायने, ऑटो, इलेक्ट्रॉनिक्स । प्रमुख राष्ट्रे - फ्रान्स आणि भारत
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, मे २०२२**
  **रु ८०,४७९.७८ कोटी । ९६,७०५ रोजगार**
  सामंजस्य करार- २५ । आधारभूत क्षेत्रे - आयटी पार्क, आयटी -आयटीइएस आणि डेटा केंद्रे, वस्त्रोद्योग, अन्न प्रक्रिया, पेपर आणि पल्प, अभियांत्रिकी आणि पोलाद, अक्षय ऊर्जा, लॉजिस्टिक, तेल व वायू । प्रमुख देश - सिंगापूर, इंडोनेशिया, यूएसए, दक्षिण कोरिया आणि जपान.

MIDC

मुख्य कार्यालय: **महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
उद्योग सारथी, महाकाली केव्हज रोड,
अंधेरी (पूर्व) मुंबई ४०००९३
**वेबसाईट:** www.midcindia.org

प्रमुख कार्यालय: **महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
४ (ए), १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर कॉम्प्लेक्स १,
कफ परेड, कुलाबा, मुंबई- ४०० ००५.
**वेबसाईट:** www.midcindia.org


महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
मराठी विश्वकोश
महाराष्ट्र राज्य
मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ
अधिक माहितीसाठी
https://marathivishwakosh.org
भाषा संचालनालय
अधिक माहितीसाठी
https://directorate.marathi.gov.in
महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ
अधिक माहितीसाठी
https://sahitya.marathi.gov.in
मराठी भाषा विभाग
मराठी भाषेच्या सर्वांगीण
विकासाच्या दृष्टीकोनातून
स्वतंत्र प्रशासकीय विभाग म्हणून
मराठी भाषा विभागाची निर्मिती.
अधिक माहितीसाठी
https://marathi.gov.in
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी
विकास संस्था
अधिक माहितीसाठी
https://rmvs.marathi.gov.in
ग्रंथालीतर्फे प्रसिद्ध शब्दरुची विशेषांक प्रकाशनास
महाराष्ट्र शासनाच्या हार्दिक शुभेच्छा...


UNION ROYAL
SB NRE (URNRE) &
SB NRO (URNRO)
• Royal account for Royal customers with unlimited benefits.
• 50% Concession in Retail Loan processing charges & locker rent for first year.
• Insurance coverage up to Rs. 50 Lakh
यूनियन बैंक ऑफ इंडिया
Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking
(Toll Free No.) 1800 208 2244 / 1800 425 1515 / 1800 425 3555 | www.unionbankofindia.co.in
@unionbankofindia @UnionBankTweets UnionBankInsta UnionBankofIndiaUtube @unionbankofindia



A

Well

Wisher

# Satre Infrastructure Private Limited


Connecting you to your motherland with
NKGSB Bank NRI Services
NRI Deposit [NRO, NRE & FCNR(B), RFC Accounts]
Foreign remittances at competitive rates
Foreign Exchange at attractive rates
Portfolio investment Scheme
Purchase & sale of shares on Repatriation & Non Repatriation basis (Recognized stock exchange in India)
NRE-PIS Account, NRO-PIS & Demat Account
• NKGSB BANK has correspondent banking relations worldwide
• Competitive Exchange Rates on all your Forex transactions
• All the above services are subject to prevailing directives issued by Reserve Bank of India under Foreign Exchange Management Act, 1999, as amended from time to time
NKGSB Co-operative Bank Ltd. (Multi-State Scheduled Bank)
Trusted over a Century
Registered Address: Laxmi Sadan, 361, V. P. Road, Girgaum, Mumbai - 400 004
Customer Care: 022 28602000 I www.nkgsb-bank.com I customercare@nkgsb-bank.com
AUTHORIZED CATEGORY - I DEALER

# शब्द रुची ४७

**बीएमएम अटलांटिक सिटी अधिवेशन विशेषांक**
**ऑगस्ट २०२२, वर्ष नववे**
**अंक चौथा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

---

कार्यालयीन संपर्क
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**सचिन पिळणकर, समीर कदम**
**साहाय्य – अर्चित नागवेकर**

SCAN & PAY
100021052900008.9821032830@idbi
GRANTHALI

---

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ४०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

---

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५०
granthali02@gmail.com
www.granthali.com

---

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

---

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

---

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

अशोक सराफ – माझा भाई / ९
**सुभाष सराफ**

...तरच आपण 'वाचू'...! / **१३**
**सचिन खेडेकर**

नंदा खरे : शतकातील मोठा लेखक / **१९**
**अरविंद पाटकर**

आधुनिक संतूरचे जनक / २२
**डॉ. नीतिन आरेकर**

उस्ताद अमजद अली खान यांचं 'सरोदरघर' / २९
**पूजा सामंत**

द्रष्टे ज्ञानमहर्षी / **३०**
**डॉ. परिणीता देशपांडे**

कॅप्टन्स ऑफ दी सँड्स – जॉर्जे अमादू / **३२**
**राजीव श्रीखंडे**

कवी मनाचा कथाकार / **३६**
**सुधाकर वसईकर**

निसर्गाचा स्रोत अबाधित राहण्यासाठी...! / **३९**
**शरद काळे**

दृश्यात्मक शब्दकळेची कविता / **४७**
**किरण येले**

रंगरेषांचा प्रवास / **५१**
**विजयराज बोधनकर**

किशोर जोथाडी / **५४**
**प्रकाश दुधळकर**

**ग्रंथाली पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ५८**

**'ग्रंथाली' ग्रंथपाने / चांगदेव काळे / ५९**

## संपादकीय

**या** महिन्याच्या ११ ते १४ तारखांना अमेरिकेतील अटलांटिक सिटी येथे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन भरत आहे. 'ग्रंथाली' गेल्या पंधरा अधिवेशनांत त्यात सहभागी झाली ती ग्रंथप्रदर्शन घेऊन. दर दोन वर्षांनी हे अधिवेशन अमेरिकेतल्या वेगवेगळ्या शहरात होते. गेली तीस वर्षं 'ग्रंथाली' त्यात सहभागी होताना साहित्यप्रसार करत आहेच; त्यासाठी येणाऱ्या विविध माध्यमांचाही उपयोग करत आली आहे. आयपॅडवर तीनशे पुस्तकांनी त्याची सुरुवात झाली, जेव्हा हे माध्यम आले. मग टॅबही आले. ई-बुक निर्माण केली. यावेळी छापील निवडक पुस्तकांसह ध्वनिमुद्रित कथांच्या क्लिप तयार करवून नेल्या आहेत. त्या एका योजनेअंतर्गत रसिकांना उपलब्ध होणार आहेत. त्याला चांगला प्रतिसाद लाभेल अशी खात्री आहे.

अभिनेते अशोक सराफ यांनी वयाची पंचाहत्तरी पूर्ण केली. त्यांचे अभिनयप्रवास उलगडणारे 'मी बहुरूपी' हे पुस्तक आहेच, त्याचबरोबर त्यांची कारकीर्द दर्शवणारी ७५ छायाचित्रे व एक लघु ध्वनिचित्रफीत बीएमएम अधिवेशनात आकर्षक ठरेल. मराठीचा प्रचार-प्रसार व मराठी ग्रंथमांडणी जिथे असेल तिथे 'ग्रंथाली' नफातोट्याचा विचार न करता सहभागी होते. त्यामुळेच चंद्रपूर-गडचिरोलीसारख्या दुर्गम ठिकाणीही 'ग्रंथाली' पोचली होती. 'ग्रंथाली'ची पहिली ग्रंथयात्रा १९८२ साली निघाली, तिला यावर्षी चाळीस वर्षे झाली. या चाळीस वर्षांत जगण्याचे जवळपास सारेच संदर्भ बदलले. 'ग्रंथाली' या बदलांसोबत कात टाकत राहिली. नव्या जाणिवांना टिपत राहिली. आपला उद्देश कायम राखल्यामुळे या दिंडीत नवनवीन लेखक-वाचक येत राहिले. त्यामुळेच देश-विदेशातील लोक 'ग्रंथाली'शी जोडलेले आहेत.

पं. शिवकुमार शर्मा आणि लेखक नंदा खरे या दोन भिन्न क्षेत्रांतल्या, विचारी व्यक्तिमत्त्वांचे नुकतेच निधन झाले. नंदा खरे यांनी आपल्याला संपन्न जाणिवा दिल्या, शिवजींनी मंत्रमुग्ध करणारे संगीत दिले. या अंकात त्यांच्याबद्दल नीतिन आरेकर आणि अरविंद पाटकर यांनी लिहिले आहे. व्यासंगी अभिनेते सचिन खेडेकर वाचनाचे महत्त्व अधोरेखित करतात आणि सुभाष सराफ आपल्या भाईबद्दल; ज्येष्ठ बंधू अशोक सराफ यांच्याबद्दल त्यांच्या वयाच्या अमृतमहोत्सवानिमित्त व्यक्तिगत आठवणी सांगत आहेत.

भारतरत्न धर्मशास्त्रचिकित्सक डॉ. पां.वा. काणे यांची पन्नासावी पुण्यतिथी एप्रिल महिन्यात होती. त्यांच्या कार्याला अभिवादन परिणीता देशपांडे यांनी केले आहे. सुप्रसिद्ध कथाकार बालाजी सुतार यांना नुकत्याच मिळालेल्या बाबूराव बागूल पुरस्काराच्या निमित्तानं त्यांच्या लेखन-कर्तृत्वाची नोंद सुधाकर वसईकर यांनी घेतली आहे. साहित्याच्या क्षेत्रातील उदयोन्मुख प्रतिभेची नोंद घेणारे 'उमलती अक्षरे' हे किरण येले यांचे नवे सदर या अंकापासून सुरू करत आहोत. नेहमीची सदरे आहेतच.

'ग्रंथाली-प्रतिभांगण'मध्ये विविध चर्चा-मुलाखती होत आहेत. विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी गप्पा आयोजित होत आहेत. एका कार्यक्रमात ॲस्ट्रोफिजिक्समधले मान्यवर डॉ. आशुतोष कोतवाल यांनी 'गॉड पार्टिकल'पासून विविध बाबी सोप्या भाषेत उलगडून सांगितल्या. अन्य अशाच कार्यक्रमात माधव जोशी यांनी आपला कॉर्पोरेट प्रवास रंजक पद्धतीने मांडला. यांच्याशी प्रत्येकी अ.पां. देशपांडे आणि चंद्रशेखर नेने यांनी संवाद साधला. granthali pratibhangan या ट्यूब चॅनेलवर या गप्पा अवश्य पाहा व पुढेही पाहत राहा. तसेच, granthali watch या यूट्यूब चॅनेलवर 'ग्लोबल ग्रंथसफर', 'ग्लोकल लेखिका' आणि 'साहित्याच्या पारावर' पाहू शकता. देश-विदेशातील अभिजात साहित्याची ओळख त्यातून होते. 'ग्रंथाली'शी संपर्कात राहण्यासाठी या चॅनेलना अवश्य सबस्क्राइब करा.

**– अरुण जोशी**
कार्यकारी संपादक



# अशोक सराफ - माझा भाई

**सुभाष सराफ**

**मी** गेली ५० वर्षे अनुभवत आलोय, की अशोक सराफ हे नाव घेतलं तरी रसिकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलतं. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे जे या अभिनयसम्राटाने काम करून ठेवलं आहे ते आपोआपच त्या रसिकांच्या डोळ्यांसमोर उभं राहातं. लोकांना सतत आनंद देत राहणं हा या कलाकाराचा सदैव प्रयास राहिला आहे आणि त्याचा मी साक्षीदार आहे.

लहानपणापासून भाईचा एकच ध्यास होता तो म्हणजे अभिनय-अभिनय आणि अभिनय! विशेष म्हणजे अभिनयाचं बाळकडू जणू उपजतच त्याला मिळालं असावं. त्याचा प्रवास सुरू झाला अगदी वयाच्या सहाव्या वर्षापासून, जेव्हा त्याला अभिनयासाठी पारितोषिक मिळालं. त्यानं कधीही अभिनयाचं विधिवत शिक्षण घेतलं नाही. त्याची खासियत म्हणजे त्याची निरीक्षणशक्ती दांडगी आहे. त्याचा पुरेपूर उपयोग त्यानं त्याच्या भूमिका सादर करताना करून घेतला आहे. त्याचे गुरू नटश्रेष्ठ गोपीनाथ सावकार यांच्याकडून अभिनय त्यानं एकलव्याप्रमाणे आत्मसात केला आहे.



**भाई आणि मी**

आमचे मामा नटश्रेष्ठ गोपीनाथ सावकार हे एक उत्कृष्ट नट होते त्याचबरोबर एक ख्यातनाम दिग्दर्शक होते. त्यांनी १९५० ते १९७० च्या दशकात मराठी संगीत रंगभूमीवर 'कलामंदिर' या त्यांच्या संस्थेतर्फे संगीत नाटकं रंगभूमीवर सादर केली आणि आपल्या दिग्दर्शनाद्वारे उत्कृष्ट कलाकार घडवले. परंतु एक नाट्यकलाकार व निर्माता म्हणून त्यांना आयुष्यात जे चटके सहन करावे लागले त्यामुळे भाईनं अभिनयक्षेत्रामधे येऊ नये असं त्यांचं ठाम मत होतं. याचं पर्यावसान असं झालं की भाईला आपल्या गुरूकडून एकलव्याप्रमाणे अभिनय आत्मसात करावा लागला आणि त्यामध्ये त्याची निरीक्षणशक्ती कामी आली.

लहानपणापासून भाई मितभाषी होता. आपण बरं आणि आपलं काम बरं अशा वृत्तीचा होता. आमच्या सराफ घराण्यात कोणालाही अभिनयाचं अंग नाही तरीही अशा घरात या अभिनयसम्राटाचा जन्म होणं हा मला वाटत एक दैवी चमत्कार आहे. ही दैवी देणगी लाभलेला असा हा गुणी कलाकार आपल्या अंगी फक्त अभिनयच नव्हे तर तबलावादन व नृत्याचा ताल उपजतच घेऊन आला आहे. मात्र अंगी नुसते गुण असून चालत नाही तर

मेहनत घेऊन त्याची मशागत करून त्या गुणांमध्ये प्रगती करावी लगते. भाईनं आपले अभिनयगुण उत्कृष्टरीत्या विकसित केले व त्याद्वारे रसिकांना आनंद दिला व देत आला आहे. त्याबरोबर इतर दोन गुंणाकडे लक्ष देणं वेळेअभावी त्याला शक्य झालं नाही म्हणून एका उत्कृष्ट तबलावादकाला किंवा नृत्यविशारदाला रसिकजन मुकले असं मला म्हणावंसं वाटतं.

भाईला एक प्रश्न सतत विचारला जातो, की तुम्ही आजवर दिग्दर्शन का केलं नाही? याचं उत्तर मला वाटतं, की भाईला एका वेळी एकच गोष्ट करावी असं वाटतं आणि त्याच्या मुलाखतीत त्यानं सांगितलं आहे, की दिग्दर्शन करत असताना नाटक/ सिनेमाची सगळी अवधानं सांभाळावी लागतात. त्यामुळे दिग्दर्शन करायचं असेल तर अभिनय थांबवावा लागेल आणि ते मला आज करायचं नाही. भविष्यकाळात दिग्दर्शन नक्कीच करेन. मी या गोष्टीची अतिशय आतुरतेनं वाट बघतो आहे, कारण मला खात्री आहे, की भाई ज्या दिवशी दिग्दर्शनक्षेत्रात पाऊल ठेवेल तेव्हा त्याच्या हातून अशी एक कलाकृती घडेल की जिचा डंका सर्व जगात वाजवला जाईल.

असं म्हणतात, की बाळाचे पाय पाळण्यात दिसतात. ती म्हण भाईच्या बाबतीत अगदी तंतोतंत लागू पडते. अभिनय करण्याचा ध्यास त्याच्या लहानपणाच्या छोट्या छोट्या गोष्टींतून दिसत असे. त्याला लहानपणी कुठल्याही खेळापेक्षा अभिनय करण्यामध्ये रस होता. वयाच्या पाचव्या-सहाव्या वर्षापासून त्याने अभिनय करायला सुरुवात केली. तबलावादनसुद्धा त्याचवेळी सुरू केलं होतं, तेसुद्धा कुठेही शिक्षण न घेता. जणू त्याला ते उपजतच अवगत होतं. आमच्या चिखलवाडी गणेशोत्सवात किंवा मानाजी ब्लॉक्सच्या गच्चीवरील दिवाळी महोत्सवातील नाटकात काम करताना त्याचे हे गुण लहानपणीच जाणवले होते.

आमच्या चिखलवाडीतील गणेशोत्सवातील नाटकांच्या संदर्भात एक आठवण नमूद करावीशी वाटते. दोन बालकलाकारांनी सादर केलेलं एक नाटक होतं, 'गुरुदक्षिणा' आणि ते दोन बालकलाकार होते ८ वर्षांचा अशोक सराफ व ६ वर्षांचा सुनील गावसकर. कृष्णाच्या भूमिकेतील सुनील गावसकर अतिशय देखणा दिसायचा. चिखलवाडीतील ही दोन कमळं जगप्रसिद्ध होतील ह्याची कल्पना त्यावेळी कुणालाही नव्हती. लहानपणी सुनीलला सकाळी लवकर उठून हातात बॅट व क्रिकेटचे कीट घेऊन जाताना बघितलेलं मला आठवतं. या दोघांनी आपापल्या क्षेत्रात नाव कमावलं आणि त्यासाठी कारणीभूत ठरली ती त्यांची आपल्या कामावरील नितांत श्रद्धा. आपण जे करतोय त्यामध्ये मन लावून काम करण्याची चिकाटी आणि सर्वात महत्त्वाचं, की हे दोघंही पन्नासहून अधिक वर्षं कार्यरत आहेत.

वयाच्या एकोणिसाव्या वर्षी त्याला स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये नोकरी मिळाली, तीदेखील एक अभिनेता म्हणून. त्यावेळी स्टेट बँकमध्ये कलाकार म्हणून नोकरी देण्याची प्रथा सुरू केली होती आणि भाईनं आंतरबँक एकांकिका स्पर्धांत सतत तीन वर्षं उत्कृष्ट कलाकार हा पुरस्कार पटकावला. तिसऱ्या वर्षीचा स्पर्धांत स्टेट



**'गुरुदक्षिणा'मध्ये डावीकडे सुनील गावसकर (कृष्ण) व उजवीकडे अशोक सराफ (बलराम)**



बँकेची 'मॅ हॅ हॅ हॅ...' ही एकांकिका बघायला साहित्य संघमंदिरचं प्रेक्षागृह ओसंडून वाहत होते, ह्याचा मी साक्षीदार आहे.

भाईची एक विशेष गोष्ट म्हणजे त्याच्यामते कुठलीही भूमिका त्याच्या लांबीवर अवलंबून नसते. लहान किंवा मोठी नसते. तर त्या नाटकाच्या अथवा सिनेमाच्या कथानकाच्या दृष्टीने किती महत्त्वाची आहे आणि एक कलाकार म्हणून तुम्हाला त्यात काय करता येईल हे महत्त्वाचं असतं. आपल्या पंचावन्न वर्षांच्या प्रदीर्घ अभिनयकारकिर्दीत हे सूत्र त्यानं आयुष्यभर पाळलं. मला वाटतं, त्याचमुळे त्यांच्या भूमिका या यशस्वी झाल्या त्याचबरोबर लोकप्रियही झाल्या.


'पांडू हवालदार'मध्ये दादा कोंडकेसमवेत

भाईची आणखी एक खासियत म्हणजे त्याची शिस्तप्रियता. नाटकाच्या प्रत्येक प्रयोगाआधी एक तास तो नाट्यगृहात पोहोचतो. तोच प्रकार नाटकांच्या तालमीबाबत. रंगमंचावर काम करत असताना कोणीही स्वत:च्या पदरची वाक्यं घेतलेलं त्याला आवडत नाही आणि ही गोष्ट तो स्वत:ही कटाक्षानं पाळतो. त्याचं सर्व लक्ष व निष्ठा त्या भूमिकेप्रती राहिल्या आहेत. त्यामुळेच अनेक विविध छटा असलेल्या भूमिकांद्वारे त्यानं मानवी भावभावनांच्या प्रत्येक पैलूचं दर्शन आपल्याला घडवलं. भाईची फक्त विनोदी अभिनेता न राहता एक चरित्र अभिनेता म्हणून जनमानसात प्रतिमा ठसली गेली आहे. 'अरे संसार संसार' या चित्रपटातल्या त्याचा खलनायक बघताना जेवढी आपल्याला चीड येते, तितकेच 'पांडू हवालदार', 'अशी ही बनवाबनवी' या चित्रपटांतल्या भूमिका बघताना आपण खळखळून हसतो. त्याच्या अभिनयाची ताकद एवढी विशाल आहे की जीवनातल्या नवरसांच्या विविध भावना आपल्या कायिक व वाचिक अभिनयातून विविध भूमिकांद्वारे त्यानं आपल्या समोर जिवंत केल्या आहेत. आजही वयाच्या अमृतमहोत्सवी वर्षात तो तेवढ्याच ताकदीने रसिकांना रिझवत आहे. प्रत्येक भूमिकेची जी मागणी असेल, त्याप्रमाणे तो कधी गंभीर वाटतात तर कधी निरागस, निष्पाप वाटतो, तो कधी करुण रस आपल्याला उलगडून दाखवतो तर कधी मिश्कील भूमिकेतून आपल्याला आनंद देतो.

भाईच्या आयुष्यातील एका ऐतिहासिक क्षणाचा मी साक्षीदार आहे याचा मला मनापासून आनंद आहे. तो प्रसंग घडताना माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता. तो दिवस होता २९ मार्च १९७५. दादरच्या कोहिनूर थिटरमध्ये (आताचं नक्षत्र) 'पांडू हवालदार' चित्रपटाचा प्रीमियर शो होता. भाई आणि मी सहा वाजता थिएटरमध्ये शिरलो. मध्यंतराला चहा घेण्यासाठी आम्ही बाहेर आलो तेव्हा लोकांच्या नजरा व कुजबुज भाईला बघितल्यावर जाणवायला लागली. तेव्हा भाई मला म्हणाला, सुभाष, हे काय होतंय? मी म्हटलं, की– काही नाही. हा सखाराम हवालदाराचा परिणाम आहे. आणि खरोखरच तसंच झालं. चित्रपट संपल्यावर बाहेर पडल्यावर भाईच्या सभोवती गराडा पडला होता. अभिनंदनाचा वर्षाव त्याच्यावर सुरू झाला. तेव्हा मला जाणवलं की एका स्टारचा जन्म झाला होता. एका रात्रीत भाईचं आयुष्य बदलून गेलं.

या सराफ कुटुंबातील नव्या स्टारच्या जन्मामुळे आमचंपण सर्व आयुष्य बदलून गेलं. मुख्यत्वे मला तो फरक खूप जाणवला. भाईचा भाऊ म्हणून लोकांकडून मला सतत आदरानं वागवलं गेलं याचं मुख्य कारण म्हणजे भाई हा फक्त उत्तम अभिनेताच नव्हे तर उत्तम माणूस आहे ही जनमानसातली भावना. त्याचबरोबार स्टारपणाचे थोडे तोटेही सहन करावे लागतात. घरच्या कुठल्याही कामात ज्यासाठी सर्वसामान्यांमध्ये मिसळावं लागतं तिथे भाई जाऊच शकत नाही. त्यामुळे ती सर्व कामं मला व इतर भावंडांना करावी लागली. तसंच कुठेही सहलीला चित्रपट/नाटक बघायला सहज उठून आम्ही एकत्र जाऊ शकत नाही.

रसिक प्रेक्षकांचं प्रेम व आदर भाईला आयुष्यभर मिळत आला आहे. रसिकांच्या या प्रेमामुळे व त्यांनी केलेल्या प्राथनेमुळे १९८७ साली झालेल्या जीवघेण्या अपघातातून भाई निर्विघ्नपणे बाहेर पडला व आजही कार्यरत आहे, अशी आमची भावना आहे. त्या अपघातातून वाचवरणारे दोन देवदूत डॉ. नंदकिशोर लाड व डॉ. प्रेमानंद रामाणी हे आम्हा सर्व सराफ कुटुंबीयांना वंदनीय आहेत. त्यांनी केलेला यशस्वी शस्त्रक्रियेमुळे भाई पूर्ववत कार्यरत राहू शकला.

त्या अपघाताची आठवण आली, की आठवतं ते म्हणजे रसिकांचं अपार प्रेम. पुण्याच्या हॉस्पिटलमधील बावीस दिवसांच्या वास्तव्यामध्ये महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आबालवृद्ध आपल्या आवडत्या कलाकाराची विचारपूस करायला यायचे. त्यावेळी दारावर मी उभा असायचो आणि नबंरानं रसिकांना आत सोडायचो. त्यावेळी रूममधे आत शिरताना त्या रसिकांच्या डोळ्यांमध्ये उत्सुकता व भाईबद्दल वाटणारी काळजी ओतप्रोत भरलेली जाणवायची आणि रूममधून बाहेर पडताना त्याच रसिकांच्या डोळ्यांत मला समाधान जाणवायचं ते म्हणजे की आपला लाडका अभिनेता सुखरूप आहे.



**आमचे वडील लक्ष्मणराव आणि आई उषादेवी**

त्या अपघातामधे भाईला मणक्याच्या दुखापतीव्यतिरिक्त एकही इतर जखम किंवा दुखापत झाली नव्हती हे एक मोठं आश्चर्यच म्हणावं लागेल.

आमचे वडील लक्ष्मणराव आणि आई उषादेवी यांची आम्ही पाच अपत्यं. तीन बहिणी आणि दोन भाऊ. मी घरात सर्वात लहान. त्यामुळे सगळ्यांचं प्रेम मला मिळालं. अगदी सर्व भावंडांचंसुद्धा. भाईनं माझ्यावर कधीही दादागिरी केली नाही. त्यानं फक्त माझ्यावर प्रेम केलं आणि सतत मार्गदर्शन केलं. आज मी जो काही आहे त्यात भाईचा मोलाचा वाटा आहे. आईवडिलांनंतर पित्याची माया व प्रेम हे भाईनं आम्हाला दिलं आणि मुख्य म्हणजे अगदी सहजतेनं तो त्या भूमिकेत शिरला.

आमच्या आईला गाणी म्हणायला व ऐकायला खूप आवडायची. ती गाणं शिकली नव्हती पण तिचा गळा गोड होता. लहानपणी ती म्हणत असलेलं तिचं अतिशय आवडतं गाणं मला आठवतंय - चित्रपट 'मोलकरीण' (१९६३), वसंत देसाईंचं संगीत, पी. सावळारामांचे शब्द आणि आशा भोसले यांचा मुलायम आवाज गाणं होतं, 'देव जरी मज कधी भेटला'..... या गाण्यातली दुसरी ओळ ती मला सतत ऐकवायची, 'माझे सारे जीवन देई मम बाळाला.' त्या वेळेस मला खरोखरच कल्पना नव्हती की ही माऊली ते शब्द सत्यात उतरवेल.

भाईला १७ एप्रिल १९८७ रोजी मोठा अपघात झाला तेव्हा तो पुण्याला हॉस्पिटलमध्येच होता. आईला आम्ही ते सांगितलं नव्हतं कारण त्याचा धक्का तिला बसेल. तिला आम्ही सांगितलं होतं, की भाई सिनेमाच्या शूटिंगसाठी बाहेरगावी गेला आहे. बरोबर बावीस दिवसानंतर ९ मे १९८७ रोजी आईनं अखेरचा श्वास घेतला आणि त्यानंतर चमत्कार झाल्याप्रमाणे पुढच्या गोष्टी घडल्या. आमची डॉ. नंदकिशोर लाड यांच्याशी भेट झाली. १२ जून १९८७ रोजी त्यांनी व डॉ. रामाणी यांनी त्याच्यावर अतिशय कठीण अशी शस्त्रक्रिया केली आणि ६ सप्टेंबर १९८७ रोजी भाईच्या नवीन चित्रपटाचं शूटिंग मुंबईत सुरू झालं! बाकी सर्व इतिहास आपण सर्व जण जाणतोच. हे सर्व चमत्कार घडण्यामागे आणि भाईचं आयुष्य सुरळीत होण्यामागे आमच्या श्रीमंगेशाची कृपा, आईवडिलांची पुण्याई तर आहेच. त्याचबरोबर असंही वाटतं, की खरोखरच आईनं आपले शब्द खरे केले असतील का? आणि आपलं उरलेलं जीवन या आपल्या लाडक्या बाळाला दिलं असेल का?

भाई लहानपणी मिश्कील स्वभावाचा आणि थोडा खोडकरच होता. तो स्वतःहून कधी बोलायला जाणार नाही, पण एकदा का एखाद्याशी मैत्री झाली की तो खुलतो. सहज बोलताबोलता एखाद्याची थट्टामस्करी करण्याचा गुण हा आमच्या मामांकडून त्यानं उचलला आहे. त्याचबरोबर उपजतच असलेल्या दांडग्या निरीक्षणशक्तीमुळे आजूबाजूच्या व्यक्तींच्या नकला तो उत्कृष्ट करत असे. ही कला त्याने लहानपणापर्यंतच मर्यादित ठेवली. पुढील आयुष्यात नाटकात-सिनेमात भूमिका करताना कधीही कोणाची नक्कल केली नाही. तसंच, आपल्या भूमिका करताना कधीही एकसुरीपणा येऊ दिला नाही.

जीवघेण्या अपघातातून निर्विघ्नपणे बाहेर पडण्यासाठी चमत्काराच्या पलीकडची एक गोष्ट होती म्हणजे भाईचा मनस्वी स्वभाव व उदंड आत्मविश्वास. लहानपणापासून मी बघत आलो आहे की त्यानं एकदा एखादी गोष्ट करायची ठरवली, की ती पूर्णत्वाला नेणं हे त्याच्या स्वभावाचं वैशिष्ट्य आहे. आजपर्यंतच्या त्याच्या यशाचं मोठं गमक आहे ते म्हणजे त्याचा नियमितपणा व संयम. नियमित व्यायाम व खाण्यापिण्यावरचा त्याचा संयम वाखाणण्याजोगा आहे. यामध्ये हे मान्य करावं लागेल, की यात निवेदिताचा मोठा वाटा आहे. तिची साथ मिळाल्यामुळे वयाच्या अमृतमहोत्सवापर्यंतचा मोठा पल्ला तो सहज पार करू शकला आणि आजही तितक्याच ताकदीनं नाटक व सिनेमामध्ये कार्यरत आहे.

त्याच्या स्वभावाचा दुसरा पैलू म्हणजे तो प्रचंड हळवा आहे. जवळच्या व्यक्तींच्या बाबतीत काही घडलं तर तो कासावीस होतो. रसिक प्रेक्षकांनी त्याला स्वीकारलं आणि मोठं केलं हे सांगताना तो हळवा होतो. आजवरच्या त्याच्या आयुष्यात त्यानं अनेकांना मदत केली, पण त्याची वाच्यता कुठेही केली नाही. आपल्या सहकलाकारांना मार्गदर्शन करताना, आपल्या मोठेपणाचं दडपण त्यांच्यावरून दूर करणं ही तर त्याची खासियत आहे. गेल्या चार पिढ्यांतील रसिकांना तर त्यानं रिझवलंच आहे, त्याचबरोबर त्या सर्व पिढ्यांतील कलाकारांना अप्रत्यक्षरीत्या घडवलं आहे. म्हणूनच असं म्हणावंसं वाटतं, की अशोक सराफ हे एक अभिनयाचं चालतंबोलतं विद्यापीठ आहे.

भाईला पुढील आयुष्यासाठी व पुढील वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा. स्वर्गलोकीच्या या गंर्धवानं पृथ्वीतलावर जन्म घेऊन रसिकजनांना रिझवलं आणि आजही रिझवत आहे. त्यासाठी त्याला उत्तम आरोग्य लाभो ही इश्वरचरणी प्रार्थना.


**- सुभाष सराफ**
sarafassociates@gmail.com




# ...तरच आपण 'वाचू'!

**सचिन खेडेकर**

**मला** वाचनाबद्दल असं नेहमी वाटतं, की ज्यामध्ये शिकवणी लावल्याशिवाय, शाळेत गेल्याशिवाय आपण श्रीमंत होत असतो ती बाब म्हणजे वाचन. एखादा अभ्यासपूर्ण लेख किंवा पुस्तक वाचल्यानंतर जो प्रकाश आपल्या डोक्यात पडतो तो आपण स्वतःहून पाडू शकत नाही. ते वाचनानंच साध्य होतं. इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि प्रिंट मीडिया यातदेखील हाच मोठा फरक आहे. आपल्याकडे आजही विश्वासार्हता ही वर्तमानपत्र वाचल्यानंतरच येऊ शकते. नाहीतर नुसत्याच हादरवणाऱ्या बातम्या! आपल्या डोक्यात असलेला विचार अधिक पक्का करायचा असेल किंवा आपल्याला माहीत नसलेल्या गोष्टी माहीत करून घ्यायच्या असतील तर मला असं वाटतं, की याला वाचनाशिवाय दुसरा पर्याय नाही. नव्या संस्कृतीत जरी असं म्हटलं जात असलं, की 'If you can see it, why read?' हा जो विचार घट्ट रुजलेला आहे, मला त्याला पूर्णपणे, शंभर टक्के तडा द्यायचा आहे. आपण वाचन करतो तेव्हा आपल्या बुद्धीला चालना मिळत असते. ही प्रक्रिया द्विमितीय पद्धतीनं घडत असते. म्हणजे आपण ओळ वाचत जातो तसं आपल्या डोळ्यांसमोर चित्र उभं राहतं. त्यावेळी आपलं कल्पनाविश्व रुंदावत जातं किंवा बौद्धिक पातळी रुंदावत जाते. हे केवळ वाचनामुळे घडून येतं आणि तेही एकाचवेळी. मेंदूचा एक भाग जो एरवी वापरलाच जात नाही तो वाचनामुळे वापरला जातो, नाहीतर काही वर्षांनी या संवेदनाच आपण विसरून जाऊ.




एक उदाहरण सांगतो. काही वर्षांपूर्वी आम्ही गोव्याला गेलो होतो. तिथे आमच्या हॉटेलच्या खोलीतून समोर अथांग समुद्र दिसत होता. माझा मुलगा तेव्हा चार-पाच वर्षांचा होता. तो बराचवेळ समुद्राकडे टक लावून पाहत उभा होता. मी त्याला विचारलं की काय पाहतो आहेस? त्यावर तो म्हणाला, मला सारखं असं वाटतंय की या समुद्रातून जलपरी बाहेर येईल. म्हणजे त्यानं कुठेतरी वाचलेलं, कुठेतरी पाहिलेलं त्याला तिथे समुद्र पाहिल्यावर आठवत होतं. आपण ज्याला कल्पनाविश्व किंवा कल्पनेत उभं केलेलं, डोळ्यांसमोर येणारं दृश्य म्हणतो त्यामागे वाचनाचाच अनुभव असतो. आपण ते पडताळून पाहतो तेव्हा तिथेही हीच भावना असते, की 'हे कुठेतरी वाचलंय!' आणि मग त्याचा संबंध जोडण्याचा आपण प्रयत्न करतो. ही एक प्रक्रिया आहे, जी वाचनामुळे अनुभवास येते.




वैयक्तिक आयुष्यात मला मराठी साहित्य वाचायला आवडतं आणि त्यातही कुणीतरी शिफारस केलेलं पुस्तक वाचायला आवडतं. सध्या मी, लेखक किरण गुरव यांचं 'क्षुधाशांती भुवन' आणि अमेरिकन लेखक मॉर्गेन हॉझेल यांचं गाजलेलं 'सायकॉलॉजी ऑफ मनी' ही दोन पुस्तकं वाचतोय. चरित्रात्मक भूमिका करताना अवांतर वाचन केल्याचा खूप फायदा होतो. सुभाषचंद्र बोस यांची भूमिका साकारण्यापूर्वी श्याम बेनेगल यांनी मला सांगितलं होतं, की 'या चित्रपटाची संहिता लिहिताना ३८ पुस्तकांचा परामर्श घेतला गेला आहे. यातील जी शंभर-दीडशे दृश्यं आहेत, ती ज्या पुस्तकांवरून घेतली गेली आहेत ती सगळी

पुस्तकं तू वाचून काढ.' चित्रीकरण सुरू व्हायला सहा महिन्यांचा अवकाश होता. त्यामुळे माझ्याकडे पुरेसा वेळ होता. त्यांचं म्हणणं बरोबर होतं, की दृश्य तीन आणि दृश्य चार यामध्ये जर तीन महिन्यांचा कालावधी दाखवला असेल तर त्या तीन महिन्यांत ते कुठे होते, काय करत होते, त्यांचं काय चालू होतं हे तुला वेगळं सांगावं लागणार नाही. ती पुस्तकं वाचल्यानं मला निश्चितच फायदा झाला. 'You should prepare for a role till it becomes your second culture.' असं म्हटलं जातं. तुम्ही तुमच्या भूमिकेबद्दल खूप जाणून घेता तेव्हा ते चेहऱ्यावर आणण्यासाठी तुम्हाला विशेष प्रयत्न करावे लागत नाहीत. तुम्ही ती भूमिका पटकन आत्मसात करू शकता कारण वाचनामुळे ते तुमच्या मनात बिंबलेलं असतं. घडलेल्या गोष्टीचा सारांश तुमच्या चेहऱ्यावर येतो. मला नेहमी असं वाटतं की चरित्रात्मक भूमिका करत असताना माणूस म्हणून ती व्यक्ती कशी घडली आहे, हे कलाकाराने जाणून घेणं आवश्यक असतं आणि तो अभ्यास वाचनानं होतो.

काहीवेळेस वाचायला वेळ मिळत नाही असंही होऊ शकतं किंवा वाचनात मन रमण्यासाठी शांत वेळ मिळत नाही, असंही होऊ शकतं. एकावेळी खूप काही चालू असतं तेव्हा ती शांतता मिळेलच असं नाही. माझ्या बाबतीतही असं झालेलं आहे. पण मग मी रोज चाळीस पानं वाचायचीच, असा नियम करून वाचनाची सवय कायम राखली. पूर्वी मी चित्रीकरणाच्या दरम्यान वाचन करायचो पण धड तिकडेही लक्ष लागत नाही आणि धड इकडेही लक्ष लागत नाही असं व्हायचं. म्हणून मी आता वाचनासाठी ठरावीक वेळ राखून ठेवतो. त्यामुळे वाचन चांगलं होतं आणि आताशा तर हातात मोबाइल घेण्यापेक्षा पुस्तक घेणं चांगलं! आता आपण ठरवून पुस्तक हातात घेतलं नाही तर आपण सतत मोबाइलकडेच पाहत राहू. फोन बाजूला ठेवून आपण पुस्तक हातात घेतलं तरच आता आपण 'वाचू'. यासाठी शांत वेळ निवडा. वाचलेलं डोक्यात शिरेल अशी वेळ ठरवायची आणि खुर्चीत बसून डायनिंग टेबलवर पुस्तक ठेवून वाचायचं. मी चित्रीकरणाच्या निमित्तानं बराच प्रवास करतो. विमानप्रवास, ट्रेनचा प्रवास या वाचनासाठी माझ्या आवडत्या जागा आहेत. माझी शाळा मराठी होती म्हणून मला मराठी वाचायला आवडतं; पण ज्यांना ज्या भाषेमध्ये सगळ्यात जास्त आणि अगदी खोलवर जाऊन वाचनाची संधी आहे त्यांनी त्या भाषेत वाचावं. वाचन महत्त्वाचं. आधी म्हटलं त्याप्रमाणे, आपण ठरवून पुस्तक हातात घेतलं नाही तर आपण सतत मोबाइलकडेच पाहत राहू. फोन बाजूला ठेन आपण पुस्तक हातात घेतलं तरच आता आपण 'वाचू' एवढं नक्की.

**शब्दांकन – मनीषा नित्सुरे**
manisha.nitsure@gmail.com

॥ग्रंथाली॥



# विदेशी गुदगुल्या

## आनंद गर्दे

आनंद गर्दे यांची जीवनशैली खुसखुशीत आहे आणि प्रसंगांची गुंफण ते हास्यस्फोटक रीतीने करतात. मराठी विनोदाची परंपरा समृद्ध करणारा आणखी एक संग्रह...

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# तरंग भोवतालचे




## विनता कुलकर्णी

पुस्तकाच्या पहिल्या विभागात आसपासच्या गोष्टी, दुसऱ्या विभागात स्थळ-वर्णन आणि गोष्टी थोरामोठ्यांच्या या विभागात काही व्यक्तींच्या मुलाखती आहेत.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

## मराठी भाषा विभागाची निर्मिती व उद्दिष्टे

मराठी भाषेचा विकास व संवर्धन याकरता २९.११.२०१० च्या शासन अधिसूचनेद्वारे 'मराठी भाषा विभाग' या स्वतंत्र विभागाची निर्मिती. विभागाचे संकेतस्थळ https://marathi.gov.in/

### मुख्य उद्दिष्टे

- महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार मराठी भाषेचा वापर प्रशासकीय कामकाजात करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करणे.
- प्रशासनात राजभाषेचा सक्षमपणे वापर व्हावा याकरता पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.
- कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी यांचेकरता मराठी व हिंदी भाषा परीक्षा नियमांची अंमलबजावणी करणे.
- मराठी भाषेचा प्रचार व प्रसार याकरता विविध उपक्रमांचे आयोजन करणे.
- मराठी भाषेतील साहित्यनिर्मितीला उत्तेजन देणे.
- मराठी विश्वकोशाचे अद्ययावतीकरण करणे.
- केंद्र शासनाच्या त्रि-भाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्रीय कार्यालयांना मराठी वापराबाबत सूचना देणे.
- विधानमंडळाच्या मराठी भाषा समितीच्या शिफारशींनुसार मराठी भाषेच्या वापरासंबंधात विविध कार्यालयांमध्ये समन्वय साधणे.

## महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४

- या अधिनियमान्वये दिनांक २६ जानेवारी १९६५पासून मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली व महाराष्ट्र राज्याची राजभाषा म्हणून देवनागरी लिपीतील मराठी भाषेचा अंगीकार करण्यात आला.

## महाराष्ट्र राजभाषा (वर्जित प्रयोजने) नियम, १९६६

- महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ मधील तरतुदीनुसार ३०.०४.१९६६च्या अधिसुचनेन्वये १ मे, १९६६पासून वर्जित प्रयोजने वगळता सर्व शासकीय प्रयोजने मराठीतून करणे अनिवार्य केले.

### वर्जित प्रयोजने पुढीलप्रमाणे आहेत –

१. केंद्र शासन व केंद्रीय कार्यालये यांच्याशी करण्यात येणारा पत्रव्यवहार.

२. अन्य राज्यांशी करण्यात येणारा पत्रव्यवहार.

३. परराष्ट्रांचे दूतावास यांच्याशी करण्यात येणारा पत्रव्यवहार.

४. महालेखापाल कार्यालयाशी करण्यात येणारा पत्रव्यवहार तसेच त्यांच्याकडे द्यावयाचे लेखे.

५. न्यायालयीन व विधिविषयक बाबी.

६. वैद्यकीय औषधी योजना, अहवाल आणि वैद्यकीय अहवालातील तांत्रिक बाबी.

## महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम २०२१, दि. १६ जुलै, २०२१

- महाराष्ट्र राजभाषा (सुधारणा) अधिनियम, २०२१ दि. १६.०७.२०२१ अन्वये महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ मध्ये पुढील तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे.

- शासकीय प्रयोजने स्पष्ट करण्यात आलेली आहेत.
- राज्य शासनाचे प्रत्येक कार्यालय जनसंवाद व जनहित यांच्यासंबंधित त्यांच्या धोरणामध्ये मराठीचा वापर करण्यासाठी यथोचित तरतूद करेल.
- मराठी भाषा अधिकारी प्रत्येक कार्यालयात नेमण्यात येईल. सर्व कार्यालये त्यांच्या संकेतस्थळावर किंवा संदेशवहनाच्या कोणत्याही साधनांवर मराठी भाषेच्या वापराबाबत स्वयंप्रेरणेने प्रकटीकरण करतील.
- सदर अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी न करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.
- सदर अधिनियम शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/ प्र.क्र.६२/भाषा-२, दि. ०९.०५.२०२२ अन्वयेदेखील उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.
- मराठी भाषेचा वापर न करण्याबाबतच्या तक्रारींसंदर्भात कार्यवाही करण्यासाठी जिल्हा मराठी भाषा समिती व राज्य मराठी भाषा समिती स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हास्तरावर प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा समिती स्थापन करण्यात येणार आहे.
- सदर समिती मराठी भाषेचा वापर न करण्याबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींवर कार्यवाही करेल, तसेच मराठीबाबतचे उपक्रम राबवेल. जिल्हास्तरीय समितीला मदत करण्यासाठी

तसेच सल्ला देण्यासाठी राज्यस्तरावरदेखील एक समिती स्थापन करण्यात येणार आहे.

- सदर अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, आवश्यक असतील असे निदेश किंवा अनुदेश, राज्य शासनाच्या सर्व कार्यालयांना देण्याचा अधिकार सदर अधिनियमातील कलम 5 ह अन्वये शासनास आहे.
- सदर अधिनियमान्वये राज्य मराठी भाषा समिती स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर समितीचे अध्यक्ष मा. मंत्री, मराठी भाषा असून, उपाध्यक्ष मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन हे आहेत.
- जिल्हा मराठी भाषा समिती आपला वार्षिक अहवाल राज्य मराठी भाषा समितीस सादर करते.

## महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणे (राजभाषा) अधिनियम, २०२२ दि. ०७.०४.२०२२

स्थानिक प्राधिकरणे म्हणजे महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, औद्योगिक नगरी, जिल्हापरिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, अन्य कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था, नियोजन प्राधिकरण, राज्य सरकारची मालकी असलेली, त्याचे नियंत्रण असलेली किंवा निधी पुरवठा केलेली वैधानिक महामंडळे, शासकीय कंपन्या किंवा कोणतेही प्राधिकरण यांच्या कार्यालयीन कामकाजात आणि जनसंवाद व जनहिताशी संबंधित बाबींमध्ये मराठी भाषेचा वापर करणे या अधिनियमान्वये बंधनकारक करण्यात येणार आहे. सदर अधिनियम शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.६२/भाषा-२, दि. ०९.०५.२०२२ अन्वयेदेखील उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

## मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठीचे उपक्रम

| | |
|---|---|
| १) भाषा पंधरवडा | : दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी |
| २) मराठी भाषा गौरवदिन | : दि. २७ फेब्रुवारी (कविवर्य कुसुमाग्रज जन्मदिन) |
| ३) वाचनप्रेरणादिन | : दि. १५ ऑक्टोबर (डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जन्मदिन) |

मराठी भाषेच्या प्रचार-प्रसाराच्या हेतूने मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. मभावा-२०२०/प्र.क.९८/भाषा-२, २४.०६.२०२२ अन्वये सध्या सुरू असलेल्या उपरोक्त तीन उपक्रमांबरोबरच पुढील आठ उपक्रम राज्यातील शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये, अधिनस्त कार्यालये यांच्या सहकार्याने सुरू करण्यात आले आहेत.




१. शैक्षणिक स्तरावर मराठी भाषेचा वापर वाढविणे.
२. ग्रंथालयांना पुस्तकांच्या स्वरूपात साहाय्य करणे.
३. तांत्रिकदृष्ट्या मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी निधी.
४. साहित्यिकांचा सन्मान, ज्येष्ठ साहित्यिकांच्या जन्मशताब्दी वर्षाचे आयोजन आणि मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचा शताब्दीसोहळा यासाठी निधी.
५. सीमावर्ती भागात मराठी भाषेसंदर्भात कार्यरत असणाऱ्या संस्थांना निधी.
६. शैक्षणिक अभ्यासक्रमाबाहेरील मराठी भाषेतील प्रावीण्याबाबतच्या परीक्षा.
७. माहिती व जनसंपर्क संचालनालयाच्या मदतीने मराठी प्रचार-प्रसारासंबंधी जाहिराती तयार करणे.
८. मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी उपक्रम मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या स्तरावर राबविणे.

**मराठी भाषेच्या प्रचार-प्रसाराच्या हेतूने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. मभावा-२०२०/प्र.क.९८/भाषा-२, दि.२४.०६.२०२२ अन्वये महसुली विभाग व जिल्हा स्तरावर निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.**

१. प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा मराठी भाषा समिती स्थापन करण्यात आली आहे. अधिनियमातील तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करणे, मराठी भाषेचा वापर न करण्याबाबतच्या तक्रारींचे निराकरण करणे आणि मराठी भाषेसंदर्भात विभागाने वेळोवेळी जाहीर केलेले उपक्रम राबविणे इत्यादी सर्व बाबींसंदर्भात जिल्हास्तरावर कार्यवाही करण्यासाठी यासाठी ६ विभागीय आयुक्त आणि ३६ जिल्हाधिकारी यांना प्रत्येकी रु. २,००,०००/- प्रमाणे एकूण रु.८४,००,०००/- निधी आवर्ती स्वरूपात देण्याचे प्रस्तावित आहे.

२. जिल्हास्तरीय समितीला मदत करण्यासाठी तसेच सल्ला देण्यासाठी राज्यस्तरावर राज्य मराठी भाषा समिती स्थापन करण्यात आलेली असून या समितीचे अध्यक्ष मा. मंत्री, मराठी भाषा असून उपाध्यक्ष मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन हे आहेत.

## आंतरराष्ट्रीय मराठी मंचाची निर्मिती

परदेशात मराठी भाषेचा प्रचार-प्रसार व संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था यांच्या कार्याची शासनस्तरावर दखल घेण्यासाठी आणि त्यांच्यात समन्वय निर्माण करण्यासाठी मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१८/भाषा-२, ०७.०३.२०२२ अन्वये आंतरराष्ट्रीय मराठी मंच स्थापन करण्यात आला आहे. या मंचाच्या माध्यमातून परदेशातील मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या संस्था, व्यक्ती यांनी त्यांची माहिती शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित संस्था, व्यक्ती व राज्य मराठी विकास संस्था यांच्यात समन्वय साधण्यासाठी मानसेवी तत्त्वावर (Honorary basis) एक किंवा

एकापेक्षा जास्त समन्वयकांची अथवा उपसमन्वयकांची नेमणूक राज्य मराठी विकास संस्थेमार्फत करण्यात येईल.

## पुस्तकाचे गाव या योजनेचा विस्तार

मराठी भाषेचा विकास, प्रचार, प्रसार व वाचनसंस्कृतीची जोपासना व्हावी या दृष्टीने व मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक पुस्तकांचे गाव सुरू करून योजनेचा विस्तार करणेबाबतचा निर्णय संदर्भाधीन दि. ०४.०१.२०२२च्या शासन निर्णयानुसार घेण्यात आला आहे.

सदर शासननिर्णयानुसार पुस्तकांचे गाव ही योजना विस्तारित स्वरूपात सुरू करताना पहिल्या टप्प्यात पुस्तकाचे गाव विभागीय स्तरावर सहा महसुली विभागांत सुरू करण्यात येणार आहे. या अनुषंगाने पुस्तकांचे गाव या योजनेचा पुढील चार महसुली विभागांत त्या विभागासमोर दर्शविलेल्या गावात विस्तार करण्यास शासन निर्णय दि.२५.०३.२०२२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

अमरावती व नाशिक महसुली विभागात पुस्तकाचे गाव सुरू करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर योजनेचे समन्वयन संचालक, राज्य मराठी विकास संस्था मुंबई यांच्याकडून करण्यात येत आहे.

| महसुली विभाग | क्षेत्र |
|---|---|
| औरंगाबाद | वेरुळ, जि. औरंगाबाद |
| नागपूर | नवेगाव बांध, जि. गोंदिया |
| कोकण | पोंभुर्ले, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग |
| पुणे | अंकलखोप (औदुंबर), ता. पलुस, जि. सांगली |

## मराठी भाषा भवन मुख्य केंद्र / उपकेंद्र

◆ मराठी भाषा विभागाच्या अधिपत्याखालील विविध कार्यालयांच्या उपक्रमांमध्ये व कामामध्ये समन्वय साधण्यासाठी ही कार्यालये एकाच इमारतीत असणे आवश्यक आहे. या उद्देशाने दक्षिण मुंबई किंवा वांद्रा-कुर्ला-वसाहत या परिसरात मराठी भाषा भवन मुख्य केंद्र व ऐरोली येथे मराठी भाषा भवन उपकेंद्र बांधण्यास दि.१४.०२.२०१८ च्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला.





## मराठी भाषा भवन मुख्य केंद्र

◆ मराठी भाषा भवन मुख्य केंद्र उभारणीकरिता दि.२४.०३.२०२१ रोजीच्या मा. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये गिरगाव महसूल विभागातील, जवाहर बालभवन, चर्नी रोड, मुंबई येथील जागा मराठी भाषा विभागास विनामोबदला उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सदर जागेवर मराठी भाषा भवन मुख्य केंद्र उभारण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

◆ सदर इमारतीचे बांधकाम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करून घेण्यात येणार आहे. सदर इमारतीच्या बांधकामासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत वास्तुविशारद म्हणून मे.पी.के.दास अँड असोसिएट्स, मुंबई यांची निवड करण्यात आली आहे.

## मराठी भाषा भवन उपकेंद्र

◆ सिडको महामंडळाकडून ऐरोली, नवी मुंबई येथील सेक्टर १३ मधील भूखंड क्र.६अ एकूण क्षेत्रफळ ३०१८.७२ चौ.मी. दीर्घकालीन भाडेपट्टीने संपादित केला आहे. सदर इमारतीचे बांधकाम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करून घेण्यात येणार आहे. त्यानुसार दि.०३.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये उपकेंद्राचे बांधकाम आराखडे व रू.२७.०७ कोटी इतक्या रकमेच्या ढोबळ अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

◆ सन २०२१-२२ आर्थिक वर्षात मराठी भाषा भवन उपकेंद्र करीता रू.१०.०० कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास अदा करण्यात आली आहे.

## भाषा संचालनालय

भाषा संचालनालयाचे मुख्य कार्यालय मुंबईत असून नवी मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथे चार विभागीय कार्यालये आहेत. भाषा संचालनालयाचे संकेतस्थळ https://directorate.marathi.gov.in/

**मुख्य उपक्रम**

- ◆ राजभाषा अधिनियम १९६४ च्या अंमलबजावणीकरता वर्जित प्रयोजने वगळता सर्व प्रशासनिक व्यवहारात मराठीचा वापर करण्याकरता पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.
- ◆ दैनंदिन कार्यालयीन कामांकरता विविध विषयांचे परिभाषा कोश/शासन व्यवहार कोश यांची निर्मिती.
- ◆ विविध विभागांशी संबंधित अर्ज/नमुने/नियम/संहिता/ विधेयके/ राज्यपालाचे भाषण इत्यादींचा मराठी अनुवाद.
- ◆ सर्व शब्दकोश/परिभाषा कोश याकरता स्वतंत्र संकेतस्थळ (https://shabdakosh.marathi.gov.in/)
- ◆ दैनंदिन प्रशासनिक वापराचे चार शब्दकोश चलभाषा उपयोजकावर (मोबाइल ॲपवर) उपलब्ध
- ◆ केंद्रीय व राज्य अधिनियमांचा मराठी अनुवाद करून संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.
- ◆ शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेकरता मराठी व हिंदी भाषा परीक्षांचे आयोजन करणे.
- ◆ राजभाषा अधिनियमानुसार प्रशासनात मराठी भाषेचा वापर सक्षमपणे होतो किंवा कसे, याबाबतची कार्यालयीन तपासणी.

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची अद्ययावत माहिती https://sahitya.marathi.gov.in/ या संकेतस्थळावर आहे.

### मुख्य उपक्रम

- साहित्यसंस्थांना अनुदान.
- अखिल भारतीय साहित्य संमेलन व अन्य साहित्य संमेलनांस अनुदान.
- नवलेखक/प्रकाशनाला प्रोत्साहन.
- मंडळाकडून विविध विषयांवर तज्ज्ञांमार्फत आतापर्यंत ५४१ मौलिक ग्रंथाची निर्मिती.

## साहित्यिकांचा गौरव व राज्यस्तरीय पुरस्कार

२७ फेब्रुवारी, मराठी भाषा गौरवदिनाच्या दिवशी पुढील राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येतात–

१. 'विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार' (ज्येष्ठ साहित्यिक)
२. 'श्री.पु. भागवत पुरस्कार' (साहित्यनिर्मिती क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणारी प्रकाशन संस्था)
३. 'स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार' (विविध साहित्य प्रकारांतील एकूण ३५ पुरस्कार)
४. 'मंगेश पाडगांवकर भाषा संवर्धक पुरस्कार' (भाषा विकासासाठी मौलिक कामगिरी केलेल्या व्यक्तीस तसेच संस्थेस)
५. 'डॉ. अशोक केळकर भाषा अभ्यास पुरस्कार' (भाषाशास्त्राच्या दृष्टीने विशेष कामगिरी केलेल्या अभ्यासक व्यक्तीस तसेच संस्थेस)






## महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटानिका इन्सायक्लोपीडियाच्या धर्तीवर मराठी विश्वकोशांची निर्मिती.
- अ ते ज्ञ वर्णाक्षरांनुसार सुमारे अठरा हजार नोंदींचा समावेश.
- १ ते २० (संहिता खंड) व खंड २१ (सूची खंड) https://marathivishwakosh.org या संकेतस्थळावर उपलब्ध.
- विश्वकोशातील माहिती अद्ययावत करणे व नवीन विषयांची माहिती अंतर्भूत करण्याकरता विषयनिहाय ४५ ज्ञानमंडळांची निर्मिती.
- सर्व नोंदी थेट संकेतस्थळावर अद्ययावत करणे.
- विश्वकोशाचे २० खंड मोबाइल ॲपवरही वाचकांसाठी उपलब्ध आहेत.

## राज्य मराठी विकास संस्था

राज्यात तसेच राज्याबाहेर मराठीचा विकास करण्याकरता राज्य मराठी विकास संस्था या स्वायत्त संस्थेची १९९३ रोजी निर्मिती.

संस्थेची माहिती https://rmvs.marathi.gov.in/ या संकेतस्थळावर अद्ययावत आहे.

## संस्थेचे उपक्रम

- अमराठी भाषकांसाठी मराठी अभ्यासक्रमाची साधने विकसित करणे.
- संगणकावर मराठीचा वापर करण्यास चालना देणे.
- राज्याबाहेर मराठी साहित्याचे जतन करणे.
- राज्यातील व राज्याबाहेरील मराठी विकासासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान देणे.
- पुस्तकांचे गाव, भिलार हा नावीन्यपूर्ण उपक्रम.

## मराठी भाषा विभाग / क्षेत्रीय कार्यालयांची संकेतस्थळे

- मराठी भाषा विभाग (खुद्द) व विभागाच्या अखत्यारीतील ४ क्षेत्रीय कार्यालयांची पुढीलप्रमाणे नवीन संकेतस्थळे दि.०९.०७.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये प्रसिद्ध करण्यात आली आहेत.

१. मराठी भाषा विभाग https://marathi.gov.in/
२. भाषा संचालनालय http://directorate.marathi.gov.in/
३. राज्य मराठी विकास संस्था http://rmvs.marathi.gov.in/
४. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ http://sahitya.mrarathi.gov.in/
५. महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ http://www. marathivishwakosh.org/
६. विश्वकोश प्रथमावृत्ती https://vishwakosh.marathi.gov.in/
७. मराठी परिभाषा कोश https://shabdakosh.marathi.gov.in/
८. शासन शब्दकोश भाग–१
भ्रमणध्वनी उपयोजक (Mobile App)
हे उपयोजक गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे.
९. मराठी विश्वकोश
भ्रमणध्वनी उपयोजक (Mobile App)
हे उपयोजक गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे.
१०. मराठी परिभाषा शब्दकोश
भ्रमणध्वनी उपयोजक (Mobile App)
हे उपयोजक गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे.




# नंदा खरे : शतकातील मोठा लेखक

**अरविंद पाटकर**

**मूल्यहीन** अर्थव्यवहारांविषयीचं मुक्त चिंतन असलेलं नंदा खरे यांचं 'बाजार' हे पुस्तक प्रकाशित केल्यानंतर त्यांच्या 'नांगरल्याविण भुई' या कादंबरीची नवी आवृत्ती मनोविकासने नुकतिच प्रकाशित केली आहे. (या कादंबरीची पहिली आवृत्ती ग्रंथालीने प्रकाशित केली होती.) नंदा खरे गेल्या काही महिन्यांपासून पुण्यात राहत होते. त्यामुळे नांगरल्याविण भुईच्या लेखक प्रती देण्यासाठी मी १० जुलैला दुपारी त्यांच्या मॉडेल कॉलनीतील घरी गेलो. नेहमीप्रमाणे मी रस्ता चुकलो आणि नंदा खरेना फोन केला. तेव्हा पहिल्यांदाच आपल्या घरी कोणीतरी येत आहे एवढ्या आपुलकीने त्यांनी मला घराचा पत्ता सांगितला. हे याच वेळी घडलं असं नाही. पुण्यात आल्यामुळे त्यांच्याशी वारंवार भेटणं होई. त्या प्रत्येकवेळी अगदी उत्साहाने कोणत्या मार्गाने कसं यायचं ते सांगत. 'नांगरल्याविण भुई'च्या पाच प्रती त्यांना देण्यासाठी घेऊन गेलो होतो. त्यामुळे पुस्तक मिळणार याचा त्यांना आनंद होताच पण माझी खूप दिवसाने भेट होणार होती याचाही आनंद त्यांना अधिक झाला असणार.


नंदा खरेंच्या घरी जाणे किंवा त्याना भेटणे म्हणजे ही एक मेजवानीच असे. ते अत्यंत आपुलकीने बोलत पण विचारांबाबत ते तेवढेच ठाम असतं. विचारात आणि जो विचार स्वीकारला आहे त्याबाबत ते ठाम असत. जसे लिखाणात त्यांची स्पष्टता असे तशी ती त्यांच्या दैनंदिन जीवनातील आचरणात असे. असे हे नंदा खरे मनोविकासच्या कुटुंबात आणि नंतर पाटकर कुटुंबात सामील झाले ते संदेश भंडारे यांच्यामुळे.


संदेश भंडारे यांचे 'वारी एक आनंदयात्रा' हे पुस्तक आम्ही प्रकाशित केले होते. या पुस्तकामुळे संदेशचे आणि आमचे स्नेहाचे संबंध तयार झाले होते. संदेश आणि नंदा खरे हे पूर्वीचे मित्र. एके दिवशी संदेश आमच्या ऑफिसमधे आले तेव्हा बोलता बोलता नंदा खरे यांचा विषय निघाला आणि त्यांना तुम्ही एकदा भेटाच असे आग्रहपूर्वक सांगितले. हे सांगत असताना संदेश यांनी धोक्याचा इशाराही दिला होता. तो म्हणजे नंदा खरे कमी बोलतात. त्यांचे जर एखाद्याशी पटले नाही तर ते त्यांच्यापासून लांब होतात. आता हे मोठे दडपण माझ्यावर आले. आपलं खरंच जमेल की नाही किंवा आपलं पटेल की नाही याची शंका मला यायला लागली.



नंदा खरे

नंदा खरे ऑफिसमधे आले. गप्पा सुरू झाल्या. संदेशने










सांगितलेले हळूहळू धुसर व्हायला लागले आणि माझे, नंदा खरेंचे सूर जुळायला लागले. पुढे पुढे तर त्यांचे माझे सूर हे एकच झाले.

'कहाणी मानवप्राण्याची' हे एक मोठे बाड घेऊन नंदा खरे ऑफिसमधे आले. विषय खूप मोठा आणि वेगळा होता. तितकाच तो महत्त्वाचा होता. शिवाय मनोविकाससाठीही हे पुस्तक करणं एक आव्हान होतं. आजपर्यंत प्रकाशित केलेल्या पुस्तकांचे विषय वेगळे होते. नेहमीच्या पठडीतले होते. इतर प्रकाशक ज्या प्रकारची पुस्तकं प्रकाशित करतात तशीच पुस्तक आम्ही प्रकाशित करत होतो. नाही म्हणायला अंधश्रद्धा निर्मुलनावरची, विज्ञानावरची, आरोग्यावरची पुस्तक आम्ही प्रकाशित करत होतो. बाकी इतर पुस्तकं सर्वसाधारण विषयांवरची असत.

पण नंदा खरेंनी आणलेला विषयच खूप वेगळा होता. खर्चिक होता आणि त्याउप्परही या अशा विषयावरचे पुस्तक प्रकाशित करताना विक्री किती होईल हे सांगता येणारं नव्हते. तरीही आम्ही धाडस करायचे ठरवले. त्यावेळी मनोविकासची आर्थिक परिस्थिती काही चांगली नव्हती. पण पुस्तकाचा विषय, लेखक नंदा खरे या जोरावर आम्ही हे धाडस केले.

मनोविकासने हे पुस्तक स्वीकारले म्हटल्यावर नंदा खरेंनाही हुरूप आला. तेही आमच्याबरोबर कामाला लागले. आंतरराष्ट्रीय किर्तीचे चित्रकार वासुदेव कामत याना मुंबईच्या दहिसरला जाऊन भेटणे या सर्व गोष्टीत ते उत्साहाने भाग घेत असत. नंदा खरेंच्या लिखाणावर वासुदेव कामतही बेहद्द खुष होते. त्यांनी अप्रतिम चित्रं काढली. आम्ही दणक्यात प्रकाशन समारंभ केला. या समारंभात दोन मान्यवर व्यक्ती अगदी आवर्जून सहभागी झाल्या होत्या. त्यापैकी एक होते माधव गाडगीळ आणि दुसरे होते कुमार केतकर.

'कहाणी मानवप्राण्याची' हे पुस्तक आले. त्यानंतर कितीतरी काळाने डॉ. युवाल नोआ हरारी याचं 'सेपिअन्स' हे पुस्तक आले. नंदा खरे नेहमी म्हणत, 'कहाणी मानवप्राण्याची' हे अगोदर आले म्हणून बरे झाले, नाहीतर लोक म्हणाले असते सेपिअन्सवरूनच नंदा खरेंनी 'कहाणी मानवप्राण्याची' उचलेले आहे.

'सेपिअन्स'ची मराठी वाचकांमधे जेवढी चर्चा झाली तेवढी 'कहाणी मानवप्राण्याची' या पुस्तकाची झाली नाही. पण याची पर्वा नंदा खरेंनी केली नाही. उलट ते नेहमी म्हणत, 'मनोविकासने लेखकाचे भरपूर लाड केले.' अर्थात 'कहाणी मानवप्राण्याची'ला बऱ्यापैकी यशही मिळाले. त्यामुळे नंदा खरे आणि मनोविकासाचे सूर खूप छान जुळले. त्यांनी आपली पुढील सर्व पुस्तके मनोविकासकडे दिली. एवढेच नव्हे तर मनोविकासच्या एकूण चढउतारात ते कायम आमच्याबरोबर राहिले.


नंदा खरे हे एक वेगळेच रसायन होतं. ते कमी बोलत हे खरं नाही. ज्यांच्याशी त्यांची नाळ जुळली त्यांच्याबरोबर ते अगदी मोकळेपणाने बोलत. अनेक विषयावर बोलत. जे पटेल ते पोटतिडकीने मांडत. जे पटत नाही त्यावरही ते सडेतोड बोलत. तरुण मुलांशी त्यांची फार जवळीक असे. त्यांच्याशी बोलणे, त्यांच्या अडीअडचणी समजावून घेणे, त्यांना मदत करणे, वेगवेगळ्या विषयांवर वाचायला लावणे, काही सामाजिक कामात त्यांच्याबरोबर काम करणे, विज्ञान प्रसाराला सहकार्य करणे हे सर्व ते खूप आनंदाने करत असत. नागपूरचे त्यांचे स्वतःचे घर उपक्रमांसाठी सदैव उघडे असे. शिवाय आर्थिकदृष्ट्या शक्य असेल तेवढी सगळी मदत ते करत.

नंदा खरेंनी कधी स्वतःभोवती कोंडाळे तयार केले नाही किंवा कुठल्या कोंडाळ्यात ते सामील झाले नाहीत. कोण काय बोलतो याचाही त्यांनी कधी विचार केला नाही. पुरस्कार मिळाला तर उत्तम, नाही मिळाला तरी त्यांची खंत नाही. पुरस्कारासाठी कधी त्यांनी लिहिले नाही आणि पुरस्कार मिळवण्यासाठी प्रयत्नही केले नाहीत.

भरपूर वाचन आणि लिखाण हे त्यांचे खऱ्या अर्थाने आवडते छंद होते. ते कायम भविष्याचा वेध घेत असत. आज जे काही घडत आहे त्याचे भविष्यात होणारे परिणाम त्यांना दिसत असत. त्यातूनच त्यांचे लिखाण घडत गेले. लिखाणात कधीच फाफटपसारा नसे. जे सांगायचे ते अगदी नेमकेपणाने सांगायचे. जे लिखाण करायचे त्यातून वाचक वैचारिकदृष्ट्या घडत गेला पाहिजे. त्याने वाचले आणि सोडून दिले असे न होता वाचताना त्याच्या मेंदूला चटका बसायला हवा असे त्यांचे लिखाण होते.

खरे-तारकुंडे ही त्यांची बांधकाम व्यवसायातील नागपूरमधील अग्रगण्य कंपनी. त्यांनी अनेक ठिकाणी बांधकाम केले आहे. पारदर्शकता हा त्यांचा गुण होता. आपल्या कामाचा ठसा त्यांनी उमटविला होता. अशा अतिशय चांगल्या काळात ते त्या कंपनीतून बाहेर पडले. अगदी तृप्त मनाने बाहेर पडले आणि ते लिखाणाकडे वळले. एकापेक्षा एक सरस पुस्तकं त्यांनी लिहिली.




आताच्या आजारपणातही 'बाजार' नावाचे पुस्तक लिहिले. अतिशय देखणे मुखपृष्ठ चंद्रमोहन कुलकर्णींनी तयार केले. त्यामुळे नंदा खरे अतिशय खुश होते.

'नांगरल्याविण भुई' या पुस्तकाची पुढील आवृत्ती त्यांनी आमच्याकडून प्रकाशित करून घेतली. त्याच्या प्रती द्यायला गेलो तेव्हा त्यांनी 'बांधकाम व्यवसायावर मी कांदबरी लिहितो आहे. त्याची ही शंभर पानं. वाचून कळवा. पुढचं लिखाण सुरू आहे', असे त्यांनी सांगितले होते. मी ते लिखाण ऑफिसमधे घेऊन आलो. त्याचवेळी मी त्याना २०५० ही कादंबरीसुद्धा परत प्रकाशित करू असे सांगितले. त्यावर ते म्हणाले, 'ही कांदबरी प्रकाशित करताना मी वाचकांची ३०/४० पानं लिहून क्षमा मागणार आहे. त्या कादंबरीत मी जे मांडले आहे, त्याची पूर्तता झाली नाही आणि यासाठी मी वाचकांची क्षमा मागणार आहे.'

दुसऱ्या दिवशी त्यांची तब्येत बिघडली. त्यांना हॉस्पिटलमधे नेण्यात आले. थोडे बरे होऊन घरी आले पण आजारपण त्यांना झेपले नाही. ते आम्हा सर्वांना सोडून गेले.

नंदा खरे एका लेखाचा विषय नाही 'एका पुस्तकाचा विषय आहे. तो कधी तरी लिहिता येईल..

**– अरविंद पाटकर**
editormanovikas@gmail.com

# EDARCH

*(Entrepreneurship Development And Rehabilitation Centre for the Handicapped)*

A National Award receipent NGO in Pune, Mah., India.

- **Join EDARCH Mission : To bring Specially Abled (Divyang) persons in the Main Stream as Entrepreneurs.**
- **We utilize Special Abilities of Divyangs in association with each other and with Skill Development train their groups to work on machines manufacturing industrial products for industries.**

***Associate with us***

- **To bring funds, products for EDARCH, Machinery & Training through CSR and to establish a project for Educated /uneducated and multiple disability Divyang persons to lead better life with dignity in the society.**

**Contact**

**Website : www.edarch.org**

**India**
**Dr. Dilip Deshpande**
**President-EDARCH**
**91-9823082671, 91-9850924747**
email: info@edarch.org

**US & Abroad**
**Anil Prayag**
**+ 1 (301) 343-7610**
email: anilprayag1@gmail.com



# आधुनिक संतूरचे जनक

डॉ. नीतिन आरेकर

**विसाव्या** शतकाचा उत्तरार्ध व एकविसाव्या शतकाचा प्रारंभ हा काही महान कलावंतांच्या महत्तम कारकिर्दीचा साक्षीदार होता. या कालखंडानं खूप काही श्रेष्ठ दर्जाचं कलाविश्व घडताना पाहिलं. संगीतविश्वाचा तर हा सर्वोत्तम कालखंड असावा. या काळात कंठसंगीत, वाद्यसंगीत हे एका वेगळ्या श्रेष्ठतम पातळीवर गेलं. वैश्विक संगीतावर भारतीय संगीताचा अमीट ठसा उमटला. विशेषत: विसाव्या शतकानं तर वैश्विक संगीताची आणि भारतीय संगीताची अतिशय सुरेख अशी सांगड घातली. बहुधा एकूणच मानवी जातीच्या कलेतिहासातील सर्वात समृद्ध असा कालखंड घडवला. या घडणीच्या शिल्पकारांत अग्रक्रमानं नाव घेतलं जाईल ते पंडित रविशंकरजी, उस्ताद अली अकबर खां, उस्ताद अल्लार खां, उस्ताद झाकीर हुसेन, पंडित हरिप्रसाद चौरसिया यांचं. याच नामावळीतील एक अत्यंत महत्त्वाचं आणि सृजनशील नाव म्हणजे पंडित शिवकुमार शर्मा. शिवजींचं नाव संतूर ह्या वाद्याशी जोडलं गेलं आहे, ते त्यांच्या संतूर ह्या वाद्याला स्वतंत्र वाद्याचा दर्जा देण्याच्या यशस्वी प्रयत्नांमुळे. नुकतंच पंडित शिवकुमार शर्मा यांचं निधन झालं. विश्वसंगीतानं एक बिनीचा मोहरा गमावला. लेखात पंडितजींनी त्यांच्या प्रारंभीच्या काळात साथसंगत करण्यासाठी वाजवल्या जाणाऱ्या व शिवजींनी त्याला स्वतंत्र वाद्याचा दर्जा मिळण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा, त्यांनी संतूर या वाद्यामध्ये नेमके कोणते बदल घडवले, ते बदल कसे घडवले व ते घडत असताना कोणती प्रक्रिया चालू होती, याचा अल्पसा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

संतूर हे तंतुवाद्य आहे. एकूणच भारतीय तंतुवाद्यांच्या उगमाचा शोध घ्यायला गेलं तर तो धनुष्य-बाण संस्कृतीपर्यंत मागे नेता येतो. धनुष्याला



पंडित शिवकुमार शर्मा

लावलेला बाण हा प्रत्यंचा ओढून सोडल्यावर जो ध्वनी येतो, त्या संकल्पनेचा आश्रय भारतीय तंतुवाद्यांच्या निर्मितीमाधे घेतला गेला असावा. आजवरचं, अभ्यासकांना ज्ञात असलेलं सर्वात प्राचीन तंतुवाद्य म्हणजे वीणा. सुरुवातीच्या काळातली पिनाकी वीणा ही पुढे रुद्र सरस्वती वीणा, बाणवीणा, कात्यानी वीणा आणि शततंत्री वीणा अशी विकसित होत गेली. शततंत्री वीणेतून जन्माला आलं ते वाद्य म्हणजे संतूर. शततंत्री या शब्दाचा अपभ्रंश संतूर झाला असावा अशी समजूत आहे.

संतूर वाजवताना वादकाला दोन्ही हातांत स्ट्रायकर घेऊन तारांवर आघात करूनच हे वाद्य वाजवावं लागतं. या वादकाच्या बोटांचा स्पर्श वाद्याला होत नसल्याने संतूरवर मींड काढता येत नव्हती, तिच्या सुरांत एकसंघपणा राहात नव्हता आणि त्यावर आलापही पूर्ण काढता येत नव्हते. अनेकांना असं वाटत असे की संतूरला शास्त्रीय संगीतातील एक स्वतंत्र वाद्य म्हणून कधी मान्यता मिळू शकणार नाही. प्रारंभीच्या काळात शिवजींनी जे संतूर वापरलं होतं ते साथीचं वाद्य म्हणूनच उपयोगी होतं. शास्त्रीय रागसंगीत वाजवायला ते अडचणीचं होतं. राग म्हणजे रंजन करणारा, विशिष्ट स्वररचनायुक्त आणि स्वतःचं असं नियमांचं एक शास्त्र असलेला स्वरसमूह असतो. प्रत्येक रागात किमान पाच स्वर आवश्यक असतात. खालच्या स्वरापासून वरच्या स्वरापर्यंत (आरोह) आणि पुन्हा परत (अवरोह)! जसे- सा रे ग म प ध नी सा (आरोह) आणि सा नी ध प म ग रे सा (अवरोह). एक गोष्ट अभ्यासक लक्षात ठेवतात ती म्हणजे कोणत्याही रागाची ओळख फक्त त्यातील विशिष्ट स्वरांमुळे होत नाही तर त्या रागातल्या स्वरांचं एकमेकांशी असलेल्या नात्यामुळे, त्यांच्या लगक्रमामुळे, एखाद्या विशिष्ट स्वराला त्या रागात मिळणारं प्राधान्य यातून त्या विशिष्ट रागाचं स्वरूप स्पष्ट होतं. शास्त्रीय संगीताचा बहुतांश परीघ हा मंद्र, मध्य व तार अशा तीन सप्तकांतून स्पष्ट होतो. प्रत्येक सप्तक सात स्वरांचं असतं. भारतीय शास्त्रीय संगीतासाठी मूळ सात स्वरांची आवश्यकता असली तरी त्यातील बहुतेक स्वरांमध्ये वैविध्यपूर्णता असते. ह्या वैविध्याला शुद्ध, कोमल आणि तीव्र स्वर असे शब्द वापरले जातात. कोमल आणि शुद्ध स्वर धरून एकूण बारा स्वर उपलब्ध होतात. पाश्चिमात्य संगीतात याचा उल्लेख शार्प मेजर तसंच फ्लॅट/ मायनर असा केला जातो. शिवजींना, या पार्श्वभूमीवर संतूरचा विचार करणं भाग होतं.

त्यांच्या हाती आलेलं संतूर ही एक पेटी होती. तिच्यावर लाकडी ब्रिज होते, त्या काश्मिरी संतूरला शंभर तारा आणि पंचवीस ब्रिज होते. प्रत्येक ब्रिजवर चार तारा होत्या. सरगमसाठी प्रत्येक ब्रिजवर चार तारा लावलेल्या असत. सा एका ब्रिजवर, ग दुसऱ्या ब्रिजवर वाजवला जाई. त्या काश्मिरी संतूरची स्वरात लावण्याची पद्धत वेगळी होती. एका बाजूला स्टीलच्या तारा असत ज्यातून अधिकतर मध्य सप्तकाचे स्वर वाजवता येत. दुसरी बाजू पितळी तारांची असे ज्यातून मंद्र सप्तकाचे स्वर निर्माण होत. ज्या स्वरात एक बाजू लावली जात असे त्याच्या विरुद्धची बाजूही त्याच स्वरात



डॉ. नीतिन आरेकर यांच्यासमवेत पंडित शिवकुमार शर्मा

लावावी लागे. त्या संतूरमध्ये मुख्य आणि दुय्यम स्वर नव्हते. अडचणीचा मुद्दा म्हणजे काश्मीरमध्ये संतूर लाकडी प्लॅटफॉर्मवर ठेवून वाजवलं जात असे. त्यामुळे नको त्या स्वरांचाही समावेश त्याच्या गुंजनात होई.

प्रत्येक वादक कळत-नकळत गायकाचा आवाज वाद्यावर काढण्याचा प्रयत्न करतो. शिवजींच्या बाबतीत एक महत्त्वाची गोष्ट अभ्यासकांनी लक्षात घेतली पाहिजे की ते निष्णात तबलावादक होते आणि शास्त्रीय संगीत गायकही होते. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या कलात्मक वैशिष्ट्याचा प्रभाव त्यांच्या संतूर ह्या वाद्याच्या संशोधनात, लोकप्रिय करण्यात आणि त्याच्या प्रचार-प्रसारात झाला होता.

शिवजींनी संतूर ह्या वाद्यावर ते शास्त्रीय संगीतातील एक महत्त्वाचं वाद्य ठरायला हवं ह्या दृष्टीनं प्रयोग करायला सुरुवात केली. त्यातील पहिला महत्त्वाचा बदल त्यांनी केला तो म्हणजे संतूर लाकडी आसनावर ठेवण्याऐवजी मांडीवर ठेवून वाजवण्यास प्रारंभ केला. ह्या कृतीमुळे, लाकडी आसनावर ठेवून संतूर वाजवल्यानं येणारे जास्तीचे ध्वनी येणं बंद झालं. याचा परिणाम तान आणि झालांवरदेखील सकारात्मक पद्धतीनं झाला. काश्मिरी संतूरमध्ये प्रत्येक ब्रिजवर, स्वरासाठी चार तारा वापरल्यामुळे अधिकची कंपनं

यायची. ती टाळून नेमकेपणा येण्यासाठी शिवजींनी प्रत्येक ब्रिजसाठी तीन तारा वापरल्या. यामुळे त्यांना वादनासाठी आवश्यक असा नाद, आवश्यक असा ध्वनी मिळू लागला. ही गोष्ट वादकासाठी सोयीस्करही ठरली कारण चार तारांपेक्षा तीन तारा लावणं सोपं व कमी वेळ लावणारं ठरलं.

शिवजींनी संतूर स्वरात लावण्याच्या पद्धतीत बदल केला. काश्मिरी संतूरमध्ये एका बाजूला पितळी तारा मंद्र सप्तकात लावल्या जात, ज्यामुळे सुरांची पुनरावृत्ती होत असे व फारसे वैविध्यही मिळत नसे. शिवजींनी सगळ्या पितळी तारांच्या जागी सर्व स्टीलच्या तारा लावून पाहिल्या. त्यांची ही प्रयुक्ती सफल ठरली. या बदलामुळे तीव्र/शुद्ध, कोमल स्वर एकापुढे एक स्वच्छपणे ऐकू येऊ लागले. ह्या बदलामुळे संतूरवर बाराच्या बारा स्वर घेता येऊ लागले. सदर बदलामुळे वादकाला सर्वच पट्ट्यांमध्ये विविध राग वाजवता येऊ लागले.

प्रत्येक तंतुवाद्यात एक तार अशी असते, जी चिकारी या नावानं ओळखली जाते. चिकारीची तार लेखनातल्या विरामचिन्हासारखं काम वादनात करते. बव्हंशी सरोद किंवा सतार या तंतुवाद्यांतील चिकारी ही मध्य सप्तकातील सा पेक्षा एक सप्तक उंच लावलेली असते. शिवजींनी चिकारीसाठी चार तारा ठेवल्या. त्यातल्या दोन तारा षड्जात लावल्या, वादक जो राग वाजवत असे त्यासाठी एक तार ठेवली आणि उरलेली एक तार संवादी स्वरासाठी ठेवली. त्यामुळे ज्या रागाचं वादन सुरू आहे, त्याचा पूर्ण आकार श्रोत्यासमोर व्यक्त होऊ शकेल असा त्यांचा अंदाज होता व तो अंदाज अचूक ठरला. ह्या नवसर्जित संतूरवर एखादा वादक चिकारीसाठी आघात करतो, तेव्हा तीन तारांचा एकत्र नाद येऊन त्या ध्वनिसमूहाला नेमका अर्थ प्राप्त होऊ लागला. आता ज्या क्षणी वादक संतूरवादनाला सुरुवात करतो त्याक्षणी श्रोत्याला त्या रागाचं स्वरूप, त्यातला आनंद जाणवायला सुरुवात होते.

संतूरमधून मींड निर्माण करणं आवश्यक होतं. त्यासाठी त्यांनी जवळपास दोन वर्षं वेगवेगळे प्रयोग केले. विचित्रवीणेचा संदर्भ घेऊन आलापीसाठी विचित्रवीणेच्या तारा ज्या पद्धतीनं छेडल्या जात तशा संतूरच्या तारा धातूच्या साहाय्यानं छेडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. एक दिवस त्यांना मींड निर्माण करण्याचं तंत्र गवसलं, ते नेमकं काय आहे, ते त्यांच्या वादनाच्या व्यवस्थित श्रवणावरून रसिकाला कळू शकेल. ते शब्दांतून मांडणं अवघड आहे.शिवजींनी संतूरमध्ये निर्दोषता आणण्यासाठी तिच्यावरच्या ब्रिजांची संख्या वाढवून, चार तारांचे एकोणतीस ब्रिज आणि तिसावा ब्रिज त्यांनी चिकारीच्या तारेसाठी ठेवला. त्यानंतर प्रत्येक ब्रिजवरची एकेक तार मी कमी केली. म्हणजे एकोणतीस ब्रिज आणि सत्त्याऐंशी तारा राहिल्या. तारांची संख्या कमी केल्यामुळे वादकाला रेंज अधिक मिळू लागली आणि ब्रिजांची संख्या वाढल्यामुळे संतूरवादकांना आलापाबरोबरच अनेकविध राग वाजवण्याची सुविधा उपलब्ध झाली.

संगीताची सर्वात मोठी प्रक्रिया म्हणजे स्वतःच्या आत डोकावणं. शिवजींनी संतूरवादन हे मनोरंजनाचं साधन आहे असं समजलं नाही तर ती आत्मशोधाची प्रक्रिया आहे असं मानलं. आध्यात्मिकता हा संगीताचा अविभाज्य गुणधर्म आहे, अशी त्यांची समजूत होती. वादनाचं तंत्र हे तिथपर्यंत पोचण्याचं साधन आहे. कोणत्याही प्रकारच्या संगीतात तंत्राच्या पलीकडे जाऊन स्वतःला व्यक्त करता आलं पाहिजे, असं ते मानत. आज अनेकदा ध्यानधारणेसाठी संतूरवादनाच्या ध्वनिमुद्रिकांचा, सीडींचा किंवा डिजिटल साधनांचा उपयोग केला जातो, त्यावेळी शिवजींना नेमकं काय सुचवायचं आहे याचा अभ्यासकांना अदमास येतो. त्यांची अशी धारणा होती की कोणत्या तरी दैवी शक्तीमुळे आणि बालपणीच्या काश्मीरमधील निसर्गाच्या प्रभावामुळे ते वादनतंत्रात यशस्वी झाले आहेत. ते एके ठिकाणी म्हणतात, संगीतरचना पूर्ण कलाकृतीच्या स्वरूपात जगासमोर आणण्याआधी, पूर्ण कलाकृतीचं रूप तिला प्राप्त होण्यापूर्वी मनात तिची योजना करणं हे गर्भधारणेसारखं आहे. वेगवेगळ्या कल्पना, आठवणी, लहान असताना माझ्या आईकडून ऐकलेली गाणी, जम्मूमध्ये हिवाळ्यातल्या संध्याकाळी शेकोटीभोवती सुरेल गीतं गाणारे बंजारी या सगळ्यांनी माझी संगीतविषयक कल्पनाशक्ती आणि विचार जोपासलेत. मी काही निर्मिती करतो, संगीतरचना करतो तेव्हा मी माझ्या वैयक्तिक आठवणींच्या खजिन्यातून त्यासाठी लागेल ती मदत घेतो. मी, लहान मूल असल्यापासून मला निसर्गसौंदर्यानं भुरळ घातली आहे. निसर्गाचं सर्वांगसुंदर रूप मला नेहमीच भारून टाकणारं वाटतं. उगवत्या सूर्याची पहिली किरणं पडल्यामुळे गुलाबीसर दिसणाऱ्या पर्वतांची भव्यता, पावसाची खात्री देणारं भरून आलेलं काळं आभाळ किंवा मनासमोर येणारं हिरव्यानिळ्या समुद्राचं चित्र यांतली प्रत्येक गोष्ट मला हलवून टाकते. निसर्ग, माझं वैयक्तिक आयुष्य आणि जीवनात भेटणारे लोक यांना दिलेले साद-प्रतिसाद म्हणजे माझ्या संगीतरचना!

शिवकुमार शर्मा यांच्या संतूरवादनाबद्दल प्रतिक्रिया देताना पद्मभूषण उस्ताद झाकिर हुसेन एका मुलाखतीत म्हणतात, की ''ह्या शंभर तारांच्या वाद्याला शिवजींनी शंभर रंगी बनवलं. कोणत्याही प्रकारच्या संगीतात, मग ते हिंदुस्थानी शैलीतील वा कर्नाटकी शैलीतील भारतीय शास्त्रीय संगीत असो, सिनेमा संगीत असो, सुगम संगीत असो किंवा विश्वभरातील कोणत्याही प्रकारचं संगीत असो, संतूर हे वाद्य त्यात स्वत:चा रंग भरतं. पद्मविभूषण शिवकुमार शर्मा यांच्या प्रयत्नांमुळे व त्यांच्या शिष्यांमुळे आज संतूरला जगमान्यता लाभली आहे व तितकीच लोकप्रियताही लाभली आहे.


त्यांना डोग्री आणि काश्मिरी लोकसंगीतानं इतका मोठा संस्कार दिला आहे की ते तो अनुभव ते श्रोत्यांबरोबर पुन्हा पुन्हा वाटून घेतात. त्यांच्या पहाडी धूनच्या साऱ्या रचना प्रेमभावनेनं व्यापून गेलेल्या आहेत, एखाद्याला आपल्या प्रिय व्यक्तीच्या सान्निध्याची उत्कट इच्छा असणं, विरहाची वेदना जाणवणं, एकत्र असण्यातला आनंद मिळणं आणि आपल्यावर कुणीतरी प्रेम करावं अशी गरज वाटणं अशा सर्व प्रकारच्या भावनांतील वैविध्य त्यांनी केलेल्या शास्त्रीय संगीतातील असो वा भावसंगीतातील वा चित्रपट

संगीतातील असो, प्रतीत होतं. त्यांच्या वादनातून जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा दृष्टिकोनही स्पष्ट होतो.''

पंडित शिवकुमार शर्मा यांच्या शास्त्रीय वादनाविषयी अनेकांनी लिहिलं आहे. मात्र त्यांच्या सिनेसंगीताविषयक दृष्टिकोनाकडे काहीसं दुर्लक्ष झालं आहे. सिनेसंगीत आणि शास्त्रीय स्वररचना तयार करणं यात खूप फरक आहे. शिवकुमार शर्मा व हरिप्रसाद चौरसिया यांनी संगीतरचनांची निर्मिती करायला सुरुवात केली, त्याच्या अनेक वर्षं आधीपासून शिवजी हिंदी सिनेमांचा अभ्यास करत होते, सिनेक्षेत्रात संतूरवादन करत होते. त्या काळातला प्रत्येक संगीतकार त्याच्या त्याच्या प्रादेशिक संगीताचा वापर करत होता, व असा वापर ते करत त्यावेळी ते संगीत यशस्वी होताना दिसत असे. हे त्यांचं त्या संदर्भातलं निरीक्षण होतं. रोशन, पंडित अमरनाथ, मदन मोहन, ओ.पी. नय्यर, चित्रगुप्त अशा संगीतकारांनी त्यांच्या संगीतात पंजाबी लोकसंगीत आणलं. खेमचंद प्रकाश आणि मास्टर गुलाम मोहंमद यांनी राजस्थानी लोकसंगीताचा बाज सिनेसंगीतात आणला. एस.डी. बर्मनसारख्या संगीतकारावर आसामी लोकसंगीताचा प्रभाव होता. आर.सी. बोराल, अनिल विश्वास, सलील चौधरी आणि हेमंतकुमार या संगीतकारांनी बंगाली भटियाली, बाऊल आणि इतर लोकसंगीताची धून वापरली. त्यांचं अनुकरण करून शिव-हरींनी डोग्री लोकसंगीताच्या, उत्तर प्रदेशातील लोकसंगीताच्या प्रभावातून आपल्या संगीतरचना केल्या. डोग्री संगीताच्या प्रभावातून आलेलं लोकप्रिय गाणं म्हणजे 'देखा एक ख्वाब...', उत्तर प्रदेशातल्या लोकसंगीताच्या प्रभावातून आलेलं गाणं म्हणजे 'रंग बरसे...' 'सिलसिला'मधली लग्नाची सर्व गाणी, माझी आई माझ्या लहानपणी जी गाणी गात असे त्यावर आधारित होती. एखाद्या चित्रपटाचं संगीत बनवत असताना संगीतकारासमोर, ज्यासाठी संगीत तयार करायचं ती दृश्यं असतात आणि त्या विशिष्ट चित्रपटाची कथाही कशा प्रकारचं संगीत हवं आहे हे स्पष्टपणे सुचवत असते. उदाहरणार्थ, 'सिलसिला'मध्ये 'देखा एक ख्वाब...' या गाण्यासाठी शारीरिक सौंदर्य असं अप्रतिम चित्रित केलं गेलं आहे की गाणं त्याच तऱ्हेनं संगीतबद्ध व्हायला हवं होतं. देखणा अमिताभ बच्चन, दैवी सौंदर्याची पुतळी असलेली रेखा यांच्या शारीर सौंदर्याबरोबरीनं चित्रित होणाऱ्या सुंदर ट्युलिपच्या रांगा त्या स्नेहाळ आणि प्रेमळ वातावरणात भर टाकत होत्या, त्या रांगांचं सौंदर्य 'देखा एक ख्वाब...' ह्या गाण्याच्या चालीतूनही प्रतीत व्हायला हवं होतं; 'रंग बरसे...' ह्या गाण्याच्या वेळी पारंपरिक आणि विशिष्ट भागातील लोकसंगीताचा वापर होणं हे गरजेचं होतं. ते ह्या गीतांमधून निश्चितपणे प्रतीत होतं. शिवजी हे एकदा 'सिलसिला'साठी काम चालू असताना कोट्याला संगीत रिसर्च ॲकॅडमीमध्ये ट्रेननं कामाला चालले होते. फर्स्ट क्लासमध्ये ते एकटेच बसले असताना त्यांच्या डोक्यात डोग्री लोकसंगीताचे सूर आले. चार तासांनंतर 'सरसे सरके सरकी चुनरिया' या गाण्याची चाल तयार झाली होती. शिव-हरींनी अगदी मोजकेच चित्रपट केले, पण त्या चित्रपटांच्या संगीतानं हिंदी चित्रपटसृष्टीला श्रुतिरम्यता प्रदान केली. कलेचं कोणतंही रूप हे हिणकस, त्याज्य नसतं तर कोणतीही कला ही मानवी सर्जनशीलतेला आवाहन करणारी एक दैवी गोष्ट असते, असा विचार आपल्या संगीतरचनांमधून मांडणारे, दोन सहस्रकांमधील सृजनशीलतेचा सांधा मुलायमपणे जोडणारे, आधुनिक संतूरजनक पद्मभूषण शिवकुमार शर्मा हे एक अद्‌भुत गारुड आहे.

**- डॉ. नीतिन आरेकर**
nitinarekar@gmail.com

ग्रंथाली



# गुंफियेला शेला

**संपदा जोगळेकर-कुळकर्णी**
**सोनाली लोहार**
**हर्षदा बोरकर**
**निर्मोही फडके**


या चौघींनी 'गुंफलेला शेला' हा अतिशय रंगतदार आहे. रंगतदार यासाठी की, चित्रातील रंगभाषा आपल्या शब्दांतून खूप सुरेख पद्धतीनं या चौघींनी मांडली आहे.

**- अच्युत पालव**

**मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रु.**

# प्रेमरंग

**किसन पाटील**




प्रेमरंगाच्या प्रेमछटा कवेत घेत त्या भूलीची स्वप्नंफुलं होतात. त्यांना रंग, रूप, गंध, नाद स्पर्शाच्या संवेदनांची भुरळ पडते. याची अनुभूती म्हणजे या प्रेमरंगी शब्दफुलांची निर्मिती ठरते. त्याच असतात सर्जनशील निर्मितीच्या वेणा! या चौऱ्यांशी रचनांचा एक फेरा पूर्ण झाला.

**- किसन पाटील**

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**



# उस्ताद अमजद अली खान यांचं 'सरोदघर'

**पूजा सामंत**

**जगभर** भारतीय शास्त्रीय संगीतात आपल्या सरोदवादनाचे अनेक कान्सर्ट करणारे पद्मविभूषण उस्ताद अमजद अली खान नुकतेच मुंबईत 'मॉर्निंग रागा' कॉन्सर्टच्या निमित्तानं आले होते. त्यांच्या ह्या मैफलीचं सूत्रसंचालन लेखक, गीतकार, दिग्दर्शक आणि अमजद अली खान यांचे स्नेही गुलझार यांनी केलं होतं. गुलझार यांनी आपल्या ह्या जादुई सरोदवादकाच्या संगीतकारकिर्दीचा आढावा घेणारी एक डॉक्युमेंटरीदेखील निर्माण केली आहे. उस्ताद अमजद अली यांच्या ग्वाल्हेरच्या वडिलोपार्जित घराचं रूपांतर आता 'म्युझियम'मध्ये झालं असून ही संगीतमय वास्तू आता 'सरोदघर' ह्या नावानं ओळखली जाते, ह्या वास्तूचं रूपांतर अनेक दुर्मिळ आणि ऐतिहासिक वाद्यांचं संग्राहालय असं झालेलं आहे. ह्या इतिहासकालीन वास्तूला नवी ओळख मिळावी, तिचं वेळोवेळी नूतनीकरण व्हावं आणि त्यासाठी आवश्यक तो निधी निर्माण व्हावा यासाठीदेखील ते प्रयत्नशील आहेत. या मैफलीनंतर त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली. उस्तादजीही मनमोकळं बोलले.



सरोदचे तुमचे पहिले गुरू तुमचे वडील. काय आठवणी आहेत तेव्हाच्या?

– मी माझ्या कुटुंबात शेंडेफळ होतो. एकूण सात भावंडांमध्ये मी लहान होतो, आणि त्यामुळे वडिलांचा जास्त लाडका. माझा जन्म ९ ऑक्टोबर १९४५ रोजी ग्वाल्हेरला झाला. वडील हाफिझ अली खान तर आई राहत जहान.

अब्बा संगीताचे मोठे साधक त्यामुळे आम्हां मुलांमध्ये आपोआप संगीताविषयी ओढ निर्माण होणं स्वाभाविक होतं. अब्बा आधी किमान सहा पिढ्या संगीतात होत्या. आजोबा सांगत, सरोद ह्या वाद्याचा शोधदेखील आपल्या पूर्वजांचा. आमचं बंगश घराणं संगीताची साधना थेट अकबराच्या काळापासून करत आहे. माझं प्राथमिक शिक्षण आमच्या राहत्या घरी पूर्ण झालं. वयाच्या बाराव्या वर्षी मी सरोदचा पहिला जाहीर कार्यक्रम सादर केला होता. १९५७ च्या सुमारास एका सांस्कृतिक समितीनं वडिलांना संगीतशिक्षक म्हणून नियुक्त केलं आणि तेव्हापासून आमच्या जीवनाचं दिल्लीपर्व सुरू झालं. दिल्लीच्या मॉडर्न शाळेत मला पुढील शिक्षण मिळू लागलं. माझं इथे शिक्षण पूर्ण होईपर्यंत १९६३ साल उजाडलं. शालेय शिक्षणासह वडील मला घरी सरोदवादनाचं शास्त्रीय शिक्षण देतच होते. माझे सरोदचे पहिले गुरू माझे अब्बाजान होते. रियाझ करण्यात जराही दिरंगाई केलेली त्यांना मुळीच खपत नसे. त्यांच्या पक्क्या तालमीत मी तावूनसुलाखून निघालोय. म्हणूनच आज

नवी पिढी रियाजाला महत्त्व देत नाही हे पाहून मला खंत वाटते!

माझ्या पिताजीनी १९६३ मध्ये पहिला जाहीर कार्यक्रम माझ्यासोबत अमेरिकेत सादर केला, त्याला अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. वडिलांची कला मी पुढे नेली. अमेरिका, न्यू मेक्सिको इथे विद्यापीठातून सरोद शिकवण्यासाठी माझी नियुक्ती झाली.

भारतीय वाद्य सरोदचा प्रसार आपण केलात, तुमच्या वादनाचे वेगळेपण, वैशिष्ट्य काय सांगता येईल?

– माझ्या आणि माझ्या कलेबाबत जवळून अभ्यास करणारे असं म्हणतात, माझ्या बोटांनी मी सरोद न वाजवता नखांनी वाजवतो, जे असाधारण आहे, तितकंच मुश्किल आहे.. नखांनी वाद्य वाजवल्यामुळे ह्यातून उमटणाऱ्या स्वरांचा आवाज अधिक स्पष्ट, गेयता आणि नादमाधुर्य निर्माण करतो. सरोदवर मी राग किरण रंजनी, राग हरी प्रिया कानदा, जवाहर मांजारी, सुहाग भैरव, शिवांजली, ललित धवणी यांसारखे कठीण राग वाजवतो. जगभर माझे सरोदमधील हे अभिनव आविष्कार लाइव्ह पाहण्यासाठी रसिकांची गर्दी होते.

ग्वाल्हेर येथील वडिलोपार्जित वास्तू ज्याला, सरोदघर अशी ओळख आहे, त्यासाठी निधी जमवावा असं का वाटलं?

– सरोद घर ही फक्त आमची कौटुंबिक वास्तू नाही. पंडित भीमसेन जोशी माझ्या वडिलांचे पट्टशिष्य, जे आमच्या ह्याच वास्तूत तीन वर्षांपेक्षा अधिक काळ सलग वास्तव्यास होते. भीमसेन जोशी मला त्यांचे भाऊ मानत. ते येत आमच्य ह्या वास्तूत प्रेमानं राहत. मोगुबाई कुर्डीकर ते किशोरी आमोणकर अशा अनेक गानतपस्व्यांचा राबता आमच्या ह्या वास्तूत होता. आमचे हे घर म्हणजे संगीताची चालतीबोलती पाठशाळा असे. पुढे कालांतरानं आम्ही दिल्लीत राहू लागलो. वडील गेले.. ह्या घराला विकण्याचा विचार केला, पण मन अस्वस्थ झाले. वडील म्हणत, ज्या वास्तूनं तुमचं ऊनपावसापासून संरक्षण केलं.. तुम्हांला गुणी केलं.. कलेचा समृद्ध वारसा दिला. ते घर विकून तो पैसा वापरणं अनीती ठरेल.. काहींनी ह्या वास्तूचं हॉटेलमध्ये रूपांतर  करा असाही सल्ला दिला. पण मी आणि पत्नी सब्बुलक्ष्मी जर्मनीत कार्यक्रमाकारणे गेलो होतो तेव्हा तेथील संगीतकार बेथोवन ह्याच्या घराचं म्युझियममध्ये केलेलं रूपांतर पाहून खूप बरं वाटलं. शेक्सपीयर असो किंवा चार्ली असो  तेथील विविध क्षेत्रातील नामवंतांचं त्यांनी फार सुरेख पद्धतीनं सर्वर्धन केलं आहे. पुढील पिढीला प्रेरणा मिळावी, सांगीतिक-सांस्कृतिक वारसा जपला जावा असा हेतू त्यामागे होता. आपल्याकडे कोलकाता येथे गुरू रवींद्रनाथ टागोर यांच्या वास्तू आणि वस्तूंची जपणूक मात्र पश्चिम बंगाल सरकारनं उत्तम केली आहे. ज्या थोरांच्या वास्तू बनतात, त्यांची निगा पुढे न राखल्यामुळे ते संग्रहालय पाहणं व्यर्थ ठरतं. वेळोवेळी नूतनीकरण, निगा राखणं हे अत्यावश्यक आहे पण इथे आपल्याकडे ते अभावानं घडतं. पण सरोदघर ह्या वास्तूच्या संग्रहालय निर्मितीसाठी तत्कालीन मंत्री अर्जुन सिंह यांनी मदत केली आणि म्हणूनच हे ह्या सरोदघराचं रूपांतर आम्ही म्युझियममध्ये करू शकलो. पण, म्युझियम करून आपली जबाबदारी संपत नाही, त्याची वेळोवेळी देखभाल, अर्थात मेंटेनन्स आणि अगदी नूतनीकरणदेखील अत्यावश्यक असतं. म्हणूनच त्यासाठी निधी जमवण्यास संगीत सरोद मैफिलींचं आयोजन करावं असं ठरलं. आमचे अब्बाहुजूर (वडील) ह्यांच्या नावानं आम्ही दरवर्षी स्मृतीपुरस्कारही देतो. ह्या समारोहांना अटलबिहारी बाजपेयी, सोनिया गांधी, फरीदा खानम, सवाईगंधर्व असे अनेक मातब्बर उपस्थित राहिले आहेत.



'सरोदघरा'साठी उस्ताद झाकीर हुसेन ह्यांनी त्यांचे आणि पूर्वजांचे तबले भेट दिलेत, बडे गुलाम अली खान यांच्या नातवानं आम्हाला आजोबांची सारंगी भेट दिली. संगीतक्षेत्रातील अशा



मान्यवरांच्या मौल्यवान वस्तू, संगीत वाद्यं आम्हाला भेट मिळाली आहेत. ह्यापेक्षा मोठा नजराणा आणखी कुठला असेल? म्हणूनही मी स्वतःला भाग्यवान समजतो .

दुर्दैवानं आपल्या देशात संस्कृती टिकवणं, संवर्धन करणं ह्याला फारसं महत्त्व नाही! त्यामुळे युगपुरुष, लोकप्रिय लेखक, संगीतक्षेत्रातील गायक-वादक ह्यांचं संग्रहालय बनत नाही आणि बनलं तरी त्याला देखभालीअभावी अवकळा येते! राजकारण आपल्या देशाचा गाभा आहे..आणि त्यासाठी वारेमाप शक्ती, युक्ती आणि धन खर्ची पडते..!

उस्तादजी, सरोद म्हटलं की फक्त अमजद अली खान हे नाव सामोरं येतं.. पुढील पिढीत आपल्याकडे अन्य सरोदवादकांनी तुमच्याइतकी उंची गाठली नाही! काय कारणं असावीत?

– सरोदवादनाचे कार्यक्रम मी जगभर अनेकदा केलेत. माझ्या माहितीनुसार विदेशात पाचशे सरोदवादक तरी आहेत. आपल्या देशात किती असतील ह्याबद्दल मी नक्की सांगू शकत नाही. पण खरं सांगायचं झाल्यास हल्लीच्या पिढीला स्टेजवर 'परफॉर्म' करायची घाई असते. कला ही मुळात सादरीकरणासाठीच असते. लेकिन अपनी कला को पेश करने से पहले उसे सही तरीकों से सीखना भी होगा। सरोद सीखकर भी उसका रियाज़ होना बहुत आवश्यक है। मराठीत सांगायचं झाल्यास पी हळद आणि हो गोरी! सरोदमध्ये तसं प्रभुत्व निर्माण होत नाही जसं गुरूंच्या सरोदमधून येऊ शकते. माझ्या काळात सरोद शिकल्यानंतर अनेक वर्षं त्याचा रियाज गुरूंसमोर चाले, जगासमोर कला प्रकट करण्याची वेळ आता आली किंवा नाही ते गुरू सांगत – ते ठरवत. ...नव्या पिढीचे शिष्य म्हणतात, गुरूंकडून कला शिकली पण परफॉर्मन्ससाठी गुरूच्या परवानगीची गरज काय? अनेक शिष्य असंदेखील वक्तव्य करताना मी पाहिलंय, गुरू को हम से ईर्ष्या होती है! आता काळ बदलला, माणसं बदललीत, भावनादेखील झपाट्यानं बदलल्या.. शाश्वत मूल्यांचा ऱ्हास होतांना मी पाहिलंय. सम्राट अकबर गुणीजनांचा पारखी, कदरदान होता. तो मुस्लीम असला तरी तानसेनसारखी गुणी हिंदू नवरत्नं त्यानं आपल्या दरबारात नेमली होती.. पण अकबराची राजवट गेली आणि औरंगजेबाच्या राजवटीत सगळ्या कलाकारांना-गुणीजनांना कैदेत टाकण्यात आलं .. कालाय तस्मै नमः!

सगळे दिवस एक सारखे नसतात .. गुरू असतो तसा शिष्य असेलच असं नाही ..आज कोई सरस्वती को पूज रहा है, आनेवाले कल में वही होगा यह उम्मीद संभव नहीं!

तुमच्या कारकिर्दीला पन्नासेक वर्षं झालीत, कारकिर्दीवर कितपत संतुष्ट आहात?

– मला वाटतं जगात सर्व सुख-संपत्ती, मानमरातब लाभूनही शंभर टक्के कुणीही संतुष्ट असत नाही , अल्पसंतुष्ट असतात म्हणूनच आपण माणसं आहोत.. माझ्याही जीवनात सुख-दुःखं, चढ-उतार आले, पण मी परवरदिगारचा आभारी आहे ज्यानं मला ऐश्वर्य, समाधान, सुख, प्रसिद्धी सगळं भरभरून दिलं. मी समाधानी आहे. तरीही मी म्हणेन माझ्या आधीच्या पिढीनं सगळी साधना केली आणि पूर्वजांचा आशीर्वाद मला लाभला. माझ्या गुरूंचं, शिष्यांचं प्रेम, कृपाछत्र ह्यामुळे माझं आयुष्य कृतार्थ झालं.

सरोदवादक म्हणून तुम्ही जगविख्यात आहात, पण असं ऐकिवात आहे, तबलाप्रेम तुमचं पहिलं प्रेम होतं, हे खरं का?

– हो. मला माझ्या बालपणी तबला वाजवणं खूप प्रिय होतं, पण तबला वाजवता वाजवता मी कधी सरोदकडे वळलो मलाही समजलं नाही.

अलीकडेच गानकोकिळा लता मंगेशकर यांचं निधन झालं! त्यांच्याविषयी तुमच्या काय आठवणी आहेत? काय भावना आहेत?

– लतादीदींचे सूर अवघ्या विश्वाला आपलंसं करून गेले. ह्रदयाच्या आरपार जाणारे त्यांचे सूर म्हणजे संगीतातील अंतिम शब्द! त्यांच्या सुरांमध्ये, आवाजात जीवनाचं सार होतं. थेट ह्रदयाला भिडणारे ते सूर, त्या सुरांचं गारुड कधीही विस्मरणात न जाणारं.. आपल्या देशाला ७५ वर्षं संगीतलेणं लाभलेली अद्वितीय गायिका म्हणजे लता! आपण त्यांचे सूर ऐकतच वाढलो. लतादीदी कधीही भेटल्या की आवर्जून माझी पत्नी, मुलांची आस्थेवाईकपणे चौकशी करत. हल्लीच्या प्रोफेशनल जगात कुणी कुणाला 'हॅलो' म्हणत नाही जोवर हॅलोमध्ये काही सबळ कारण, काही स्वार्थ-हेतू नसेल! पण लतादीदींच्या तुलनेत आम्ही कुणीच नाही, तरीही लहान-थोरांशी त्याच आदरानं-प्रेमाने वागणं हे दीदींच्या स्वभावाला अनुसरूनच होतं.

जगभर संगीतात अनेक विविध प्रयोग होताना दिसतात, भारतीय रागांचं फ्युजन करावं असं वाटलं का?

– फ्युजनमध्ये इतकी काही भेसळ होते की ओरिजिनल कुठल्या कुठे जातं. हम इसे कोलाब्रेशन कहते हैं। हमने एक ऑर्केस्ट्रा बनाया है, जिसका नाम समागम रखा है। हमने ४५ मिनट का आर्केस्ट्रा बनाया। इसमें ५० से ६० म्युजिशियन हमारे पीछे होते हैं। अमान, अयान और मैं, हम तीनों बैठते हैं और बजाते हैं। अमेरिका, न्यू यॉर्क सहित पूरी दुनिया में हमने इसे बजाया है। कुछ लोग ऐसे भी हैं जो कहते हैं कि नए रागों की गुंजाइश नहीं है। वो उनकी सोच है। राग क्या है? एक मेलोडी है। जब उसका डिसिप्लिन बन जाता है एसेंडिंग और डिसेंडिंग का तो वो राग बन जाता है। नए-नए राग बनाना नॅचरल है। मैं खुदा का शुक्रगुजार हूं कि मेरी जिंदगी में नई-नई मेलोडी आती रहती है, तो उनको नाम देता रहता हूं। मैंने किसी को गणेश कल्याण तो किसी को अमीरी तोड़ी नाम दे दिया। पिताजी को भी मैंने एक राग समर्पित किया है, हाफिज कौश, माताजी को एक राग समर्पित किया। राहत जहान नाम था उनका तो राग का नाम राहत कौश। महात्मा गांधी को एक राग समर्पित किया बापू कौश। अटलजी (अटलबिहारी वाजपेयी) को अटल रंजिनी समर्पित कर चुका हूं।

नव्या पिढीला शास्त्रीय संगीताची फारशी ओढ नाही असं दिसतं, तुमचं मत यावर काय?

– नहीं! ऐसा नहीं! मूठभर युवा पिढीला नक्कीच क्लासिकल संगीताची आवड आहे हे नक्कीच. अगदी आमच्याही पिढीत प्रत्येकाला शास्त्रीय संगीताची आवड होतीच असं नाही. नव्या पिढीसमोर फिल्म संगीत, वेस्टर्न म्युझिक, पॉप, रॅप, जॅझ असे अनेक प्रकार आहेत त्यामुळे ही डायव्हर्शन स्वाभाविक आहेत. तसं होत राहणार. त्याबद्दल मला काही विषाद नाही.

तुमची मुलं अमान अली आणि अयान अली बंगश ह्यांच्या भावी योजना काय आहेत?

– माझ्या मुलांच्या भावी योजनांवर मी काही भाष्य करणं योग्य ठरणार नाही. फिल्म इंडस्ट्री में यह दस्तूर है कि फिल्म मेकर्स अपने बच्चों को लॉन्च करते है, राज कपूर साहबने रणधीर, ऋषि, राजीव सभी को लॉन्च किया। उन्हें फिल्मों में हीरो बनाया। अशी अनेक उदाहरणं आहेत. पण असा रिवाज संगीत घराण्यात नाही. प्रत्येकाला आपली लढाई स्वतः लढावी लागते, आपलं स्थान स्वतः निर्माण करावं लागतं. सुदैवानं अमान आणि अयान ह्या दोघांनी त्यांच्या परीने आपलं स्थान निर्माण केलं आहे. अभी दिल्ली बहुत दूर है, पण माझी इच्छा आहे माझ्या मुलांनी इन्स्टंट पब्लिसिटीच्या मागे न लागता सरोद किंवा क्लासिकल संगीताची तपस्या करावी. तपस्येतून जी फुलं ओंजळीत येतात त्यांचा सुगंध जन्मोजन्मी पसरतो. दशदिशांना पसरतात सुरांचे स्वर. आपल्या देशानं माझ्या मुलांना ते जसे आहे तसं स्वीकारलं आहे, ह्याचा मला आनंद आहे. आम्ही तिघांनी एकत्र शोदेखील केलेत.

फुरसतीच्या क्षणी काय करता?

– फुरसतीच्या क्षणांमध्येदेखील मी संगीत ऐकतो. त्यातूनच मला नवी स्फूर्ती मिळते. माझ्या प्रेरणांचं उगमस्थानदेखील संगीताचे सात सूर आहेत. भारतीय सुगम संगीत, लोकसंगीत, शास्त्रीय संगीत तर ऐकतोच; फ्युजन संगीतदेखील ऐकतो. जागतिक संगीतविश्वात काय घडामोडी चालू आहेत हे समजणंदेखील गरजेचं असतं.

उस्ताद अमजद अली खान ह्यांच्याशी बातचीत करताना जाणवत राहतो तो त्यांचा सौजन्यपूर्ण मृदू स्वर, अगत्यशील वागणूक आणि कुणालाही न दुखावता आपली स्पष्टोक्ती कायम राखण्यातील दृढता! आजच्या तथाकथित प्रॅक्टिकल जगात पैसा हेच सर्वस्व मानणाऱ्या पिढीत आपल्या पूर्वजांच्या वास्तूची मनाप्रमाणे वासलात लावणं उस्ताद अमजद अलींना अशक्य नव्हतंच, पण आपल्या वास्तूचं संग्रहालयात रूपांतर करण्यामागे त्यांची मनीषा, त्यांची जिद्द पुढील पिढीसमोर नवा आदर्श निर्माण करेल ह्यात शंका नाही! शेवटी आपली संस्कृती आपणच जपली पाहिजे तोच खरा वारसा हा धडा साक्षात गिरवणारे सरोदवादक अमजद अलींना दंडवत घालूनच मी रॉयल ऑपेरा हाऊसमधून बाहेर पडते.

**– पूजा सामंत**

samant.pooja@gmail.com



# द्रष्टे ज्ञानमहर्षी

**डॉ. परिणीता देशपांडे**

*देखणी ती पाऊले जी ध्यासपंथे चालती।*
*वाळवंटातुनी सुद्धा स्वस्तिपद्मे रेखिती।*

**बोरकरांच्या** या काव्यपंक्तींनी ज्यांच्या आयुष्याचे वर्णन करता येईल असे थोर संस्कृतविद्वान, साक्षेपी कायदेपंडित आणि धर्मशास्त्राचे पुरोगामी अभ्यासक महामहोपाध्याय डॉ. पांडुरंग वामन काणे यांना, त्यांच्या पंचखंडात्मक 'धर्मशास्त्राचा इतिहास' या महाकाय ग्रंथासाठी 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवण्यात आले. ही गोष्ट आपल्यापैकी अनेकांना ठाऊक असेल. पण प्राचीन भारतविद्येच्या संशोधनात्मक साहित्याच्या बळावर हा सन्मान मिळवणारे ते एकमेवाद्वितीय विद्वान होते हे फार थोड्याच जणांना माहिती असेल. मुळात धर्मशास्त्र म्हणजे काय हेच आज किती जण जाणतात? धर्मशास्त्र म्हणजे प्राचीन आणि मध्ययुगीन भारतात अस्तित्वात असलेली नागरी कायदे-व्यवस्था! वेदांपासून स्मृतिग्रंथांपर्यंत - एवढा प्रचंड विस्तार असलेले क्षेत्र! या ग्रंथराजाची नुसती तीनशेपन्नास पानांची विषयसूची आणि एकशे शहात्तर पानांची ग्रंथसूची वाचली तरी छाती दडपून जाते.



**भारतरत्न डॉ. पांडुरंग वामन काणे**
(७-५-१८८० ते १८-४-१९७२)

'नामूलं लिख्यते किञ्चित्' (पुराव्याशिवाय किंवा आधाराशिवाय काहीही लिहिलेले नाही) असा बाणा समोर ठेवून काणे यांनी या ग्रंथात, धर्माची व्यापक संकल्पना, धर्मशास्त्रावर झालेले ग्रंथ व ग्रंथकार (खंड १); वर्णाश्रम, दास्य, अस्पृश्यता, संस्कार, वैदिक यज्ञसंस्था (खंड २); राजधर्म, न्यायदान, सदाचार (खंड ३); पातक, प्रायश्चित्त, कर्मविपाक, अन्त्येष्टी, श्राद्ध, तीर्थयात्रा (खंड ४), व्रते, उत्सव, काल, मुहूर्त, धर्मशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र शांती, पुराणे-धर्मशास्त्र संबंध, पुनर्जन्म, तंत्रविद्या, बौद्ध धर्माचा ऱ्हास (खंड ५).... इतका प्रचंड आवाका असलेल्या विषयाचा साधार आणि सविस्तर परामर्श घेतला आहे. एखादी संस्थासुद्धा करू शकणार नाही एवढे अवाढव्य काम काणे यांनी एकहाती आणि एकटाकी केले आहे. ना कोणी संशोधन-साहाय्यक, ना संगणक, ना कुणी नोंदलेखक! 'इतिहास कशाशी खातात हे भारतीयांना ठाऊक तरी आहे का?' या पाश्चात्त्यांच्या निराधार आक्षेपाला आणि हेटाळणीला याहून सडेतोड उत्तर दुसरे कोणते असू शकते? मुख्य म्हणजे 'धर्म हा प्रवाही असून, या सर्व संकल्पनांचा बदलत्या सामाजिक परिस्थितीबरोबर पुनर्विचार आणि पुनर्विस्तार करावा लागतो' असा अत्यंत महत्त्वपूर्ण, भविष्यवेधी दृष्टिकोन ग्रंथाच्या शेवटी, या आधुनिक महर्षींनी मांडला आहे. प्राचीन भारताच्या समाजनियमांचा, कायदे पद्धतीचा असा अभ्यास आजवर कुणी केला नव्हता.

१९६२ साली पूर्णत्वास गेलेल्या या ज्ञानसत्राची सुरुवात १९३० सालीच किंबहुना त्याही आधी १९२६ साली काणे यांनी नीलकण्ठभट्टाच्या 'व्यवहारमयूख' या ग्रंथाची चिकित्सित आवृत्ती केली, तेव्हाच झाली. या पुस्तकाच्या प्रस्तावनेतच त्यांनी धर्मशास्त्राच्या इतिहासलेखनाचे सूतोवाच केले आहे. या तीस-पस्तीस वर्षांच्या अखंड तपश्चर्येने सिद्ध झालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करण्याचा पायंडा काणे यांनी स्वत:च घालून दिला. एकीकडे संस्कृतचे गाढे विद्वान आणि दुसरीकडे तर्ककुशल वकील असे दुपेडी परंतु विलक्षण बौद्धिक व्यक्तिमत्त्व लाभलेल्या काणे यांनी, केवळ केशवपन केले नाही म्हणून जिला पंढरपूरच्या विठ्ठलाची महापूजा नाकारण्यात आली होती अशा सकेशा विधवेचे वकीलपत्र घेतले आणि तो तिचा धर्मसिद्ध हक्क आहे अशी प्रागतिक भूमिका घेऊन न्यायालयात धर्मशास्त्राच्या पुराव्याच्या आधारे तिला न्याय मिळवून दिला. आज विधवांच्या हक्काबद्दल समाज सजग होत आहे. त्याचे बीज काणे यांनी रुजवले आहे. आपल्या ग्रंथात त्यांनी स्त्रियांच्या हक्काविषयी प्राचीन पुरावे



तत्कालीन राष्ट्रपती राधाकृष्णन यांच्या हस्ते 'भारतरत्न' किताबाने गौरव





धर्मशास्त्राचा इतिहास पां.वा. काणे यांचा ग्रंथराज

देऊन स्त्रीचा मिळकतीचा हक्क, वारसाहक्क, दत्तकविधान आणि स्त्रीधनासंबंधीचे स्पष्ट विवेचन केले आहे. त्याचा आधार घेऊन आजचा स्त्रीविषयक कायदा आणि हिंदू कोड बिल यासारखी बिले संमत झाली आहेत. मुंबईतील ब्राह्मणसभेच्या गणपतीचे दर्शन जेव्हा मेळ्यातील कलाकारांना त्यांच्या जातीच्या कारणावरून नाकारण्यात आले तेव्हा, कार्यकारिणीचे अध्यक्ष असलेल्या काणे यांनी त्यांचे निर्णायक मत कलाकारांच्या बाजूने दिले. पुढे प्रकरण न्यायालयात गेले. तेव्हा न्यायालयाने काणे यांचे मत ग्राह्य धरले आणि हे जवळजवळ शंभर वर्षांपूर्वी; जेव्हा भारतातील बहुसंख्य मंदिरे ब्राह्मणेतरांसाठी खुली नव्हती तेव्हा काणे यांना द्रष्टे म्हटले जाते ते याचसाठी! त्यांच्या कामाचे मोल समजले तर आज समाजात जे वृथा वादंग होत आहेत ते टाळता येतील आणि निकोप, एकात्म व सशक्त समाज घडवता येईल, हे विसरून कसे चालेल?

कुशाग्र बुद्धिमत्ता, तीक्ष्ण स्मरणशक्ती, अफाट वाचन, संस्कृत आणि वकिलीचा वडिलांकडून मिळालेला वारसा, आजोळकडून मिळवलेले वैद्यक आणि ज्योतिषशास्त्राचं ज्ञान, शिक्षणाची अनिवार ओढ, नवनवीन गोष्टींचे सतत कुतूहल, त्यासाठी लागणारी शोधक वृत्ती आणि ज्ञानासाठी अथक कष्ट करण्याची तयारी- एवंगुणविशिष्ट काणे आपल्या विलक्षण बौद्धिक जीवनप्रवासात अनेक मानसन्मानाचे धनी झाले. मुळात ते संस्कृतचे प्राध्यापक! मंडलिक सुवर्णपदक, झाला वेदान्त सुवर्णपुरस्कार असे प्रतिष्ठेचे पुरस्कार त्यांनी आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीलाच अगदी तरुण वयात संशोधनाच्या जोरावर पटकावले. परंतु सरकारी नोकरीतील मनमानीपणा पाहून स्वाभिमानी काणे यांनी स्वतंत्र वकिली करण्याचा निर्णय घेतला. त्यांचे मन भारतविद्या आणि प्राच्यविद्या यांच्या अभ्यासात आकंठ बुडलेले असे. वकिलीव्यतिरिक्त एकोणचाळीस पुस्तके, एकशेपंधरा संशोधनात्मक लेख, पंचेचाळीस पुस्तक-परीक्षणे व परिचय असा अक्षय लेखनप्रपंच त्यांनी मांडला. डॉ. रा.ना. दांडेकर यांनी म्हटल्याप्रमाणे जवळजवळ पंधरा हजार पानांचा छापील मजकूर काणे यांनी स्वहस्ते एकटाकी लिहिला. त्यातील धर्मशास्त्राची सहा हजार पाचशे पाने सोडली तर त्याहीपेक्षा कितीतरी अधिक त्यांचे संस्कृत साहित्यविषयक लेखन आहे. त्यांनी तर्कशुद्ध पद्धतीने मांडलेला संस्कृत ग्रंथांचा कालक्रम आजही संस्कृत अभ्यासकांना मार्गदर्शक ठरतो.

१९४१ साली महामहोपाध्याय ही पदवी, १९४६ मध्ये अलाहाबाद विद्यापीठाकडून डी.लिट., १९४७-४९ मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू, १९५३-५९ राज्यसभेचे सभासदत्व, साहित्य अकादमी पुरस्कार, १९५८ मध्ये भारतविद्येचे राष्ट्रीय व्याख्याता, अनेक प्राच्यपरिषदांचे अध्यक्षपद - इतकी मोठी सामाजिक प्रतिष्ठा लाभूनही काणे प्रत्यक्ष जीवनात इतके साधे होते की आपल्या गिरगाव-आंग्रेवाडीतील घरातून एशियाटिक लायब्ररीमध्ये (जिथे बसून त्यांनी धर्मशास्त्राचे बरेचसे लेखन केले) ते ट्रामने किंवा चालत येत असत. अशी निगर्वी आणि ध्येयनिष्ठ माणसे आता दुर्लभ झाली आहेत.

कोणत्याही समाजाच्या परंपरा, इतिहास आणि वारसा यांची कालानुरूप नीट व्यवस्था लावावी लागते आणि तिचे योग्य परिप्रेक्ष्यात आकलन व्हावे लागते. त्यासाठी काणे यांनी केलेल्या व्यासंगाचा तत्कालीन राष्ट्रपती राधाकृष्णन् यांनी विशेष गौरवाने उल्लेख केला. या व्यासंगाचा उचित गौरव भारतरत्न पुरस्काराने झाला आणि नुकतेच त्यांच्या ५०व्या स्मृतिदिनी, १८ एप्रिल २०२२ रोजी, एशियाटिक सोसायटीच्या पुढाकाराने त्यांचे पोस्टाचे तिकीट प्रकाशित होऊन तीही उणीव दूर झाली. आपल्या प्रागतिक विचारांनी प्राचीन धर्मशास्त्राला आजच्या कायद्याच्या परिप्रेक्ष्यात आधुनिक आयाम मिळवून देणाऱ्या आणि संस्कृत साहित्याची चिकित्सक मांडणी करणाऱ्या या द्रष्ट्या ज्ञानमहर्षींना ही विनम्र आदरांजली!

**- डॉ. परिणीता देशपांडे**

parineetadeshpande@yahoo.com

## ग्लोबल ग्रंथपरिचय



# कॅप्टन्स ऑफ दी सॅंड्स - जॉर्जे अमादू
# Captains of the Sands by Jorge Amado

राजीव श्रीखंडे

**जगप्रसिद्ध** ब्राझिलियन लेखक जॉर्जे अमादू याचा जन्म १० ऑगस्ट १९१२ रोजी ब्राझीलमधील बाहिया राज्यातील इताबुना या शहरात झाला. तो चार भावंडांपैकी सर्वात मोठा मुलगा. लहानपणापासूनच कोकोच्या शेतावर काम करणाऱ्या मजुरांचे कष्टप्रद आयुष्य जॉर्जेने बघितले. याचा त्याच्यावर फार मोठा परिणाम झाला.

देवीच्या साथीच्या वेळी जॉर्जेचे कुटुंब इलिहस या शहरात स्थलांतरित झाले. त्याने त्याचे शालेय जीवन साल्वाडोर या त्या प्रांताच्या राजधानीच्या शहरात काढले. जॉर्जे चौदा वर्षांचा असताना त्याने अनेक नियतकालिकांशी संपर्क प्रस्थापित केला आणि काही समविचारी मुलांबरोबर त्याने Rebels Academy ची स्थापना केली. जॉर्जेचा चुलतभाऊ गिलबर्टो अमादू हा एक प्रसिद्ध वकील, लेखक, पत्रकार आणि राजकारणी होता तर त्याची मावसबहीण व्हेरा क्लाऊसार ही एक अभिनेत्री आणि पटकथालेखिका म्हणून प्रसिद्ध होती.

१९३१ साली केवळ अठरा वर्षांचा असतानाच जॉर्जेने आपली पहिली कादंबरी The Country of Carnival प्रसिद्ध केली. त्याने पुढे मॅटिल्ड गार्सिया रोसा या तरुणीशी विवाह केला आणि त्याला १९३३ साली लीला नावाची मुलगी झाली. त्याच वर्षी जॉर्जेने आपली दुसरी कादंबरी Cacau प्रसिद्ध केली. या कादंबरीमुळे त्याचा नावलौकिक चांगलाच वाढला.

जॉर्जे अमादूने Federal University of Rio de Janeiro Faculty of Law या कायद्याच्या महाविद्यालयातून आपले शिक्षण पूर्ण केले. पण त्याने कधीच वकिलीचा व्यवसाय स्वीकारला नाही. त्याच्या डाव्या चळवळीतल्या सहभागामुळे त्याचे आयुष्य बरेच मुश्किलीचे बनले. त्यावेळी ब्राझीलमध्ये गेटिलिओ व्हर्गासची हुकूमशाही राजवट होती. जॉर्जे अमादूला १९३५ मध्ये अटक झाली आणि दोन वर्षांनंतर त्याची पुस्तके जाळण्यात आली. एवढेच नव्हे तर त्याच्या पुस्तकांवर बंदी घालण्यात आली. पुढे Jubiaba ही जॉर्जेची कादंबरी फ्रान्समध्ये प्रकाशित झाली आणि युरोपभर तो लोकप्रिय झाला. या कादंबरीची अल्बर्ट कामूसारख्या अनेक मातब्बर लोकांनी मुक्तकंठाने स्तुती केली. त्याआधी Sea of Death, Captains of the Sands यासारख्या त्याच्या अनेक कादंबऱ्या प्रचंड लोकप्रिय झाल्या होत्या.

जॉर्जे साम्यवादी विचारसरणीचा असल्यामुळे १९४१-४२ मध्ये तो अर्जेंटिना आणि उरुग्वे इथे परागंदा झाला. तो पुढे ब्राझीलला परतला आणि नंतर आपल्या बायकोपासून विभक्त झाला. १९४५मध्ये तो National Constituent Assembly वर सर्वाधिक मते मिळवून निवडून आला. तो ब्राझिलियन कम्युनिस्ट पक्षाचा उमेदवार होता. त्याने धर्माविषयीचा उदारमतवादी दृष्टिकोन असलेला कायदाही संमत करून घेतला.

जॉर्जेने १९४५ मध्ये दुसऱ्यांदा लग्न केले ते लेखिका झेलिया गहार्द हिच्याशी. १९४७ मध्ये त्याच्या पक्षावर बंदी घालण्यात आली. अनेक सदस्यांना अटक झाली, त्यांच्यावर खटले चालवण्यात आले. जॉर्जे यावेळी फ्रान्सला पळाला. पुढे १९४९ मध्ये त्याच्या मुलीचा लीलाचा मृत्यू झाला. १९५० मध्ये त्याची फ्रान्समधून हकालपट्टी करण्यात आली. १९५० ते १९५२ मध्ये जॉर्जे आणि त्याची पत्नी झेलिया हे झेकोस्लोवाकियामध्ये राहिले. पुढे तो सोवियत युनियनला गेला. तिथे त्याला १९५१ चे स्टालीन शांतता पारितोषिक मिळाले.

१९५४ साली जोर्जे ब्राझिलला परतला. पुढच्याच वर्षी त्याने कम्युनिस्ट पक्षाचा त्याग केला आणि तो राजकारणापासून वेगळा झाला. त्यानंतर त्याने स्वतःला फक्त लिखाणाला वाहून घेतले.

१९५८ साली त्याची Gabriela, Clove and Cinnamon ही कादंबरी प्रकाशित झाली आणि फार गाजली. Tereza Batista : Home from the Wars आणि Dona Flor and her Two Husbands याही कादंबऱ्या लोकप्रिय झाल्या.

१९६१ मध्ये जॉर्जेची Brazilian Academy of Letters या

संस्थेवर निवड झाली. त्याच्या पुढच्या कादंबरीचे म्हणजेच Pen, Sword, Camisole चे कथानक याच संस्थेत घडते. Home is the Sailor, Shepherds of the Night, Tent of Miracles, Tiesta, The War of the Saints यासारख्या त्याच्या पुढच्या अनेक कादंबऱ्या गाजल्या.

जॉर्जे अमादूचा ६ ऑगस्ट २००१ रोजी मृत्यू झाला. त्याच्या अस्थी त्याच्या घराच्या बगिच्यावर पसरवण्यात आल्या.

जॉर्जेला फ्रेंच सरकारच्या काळ्या यादीतून १९६५ साली बाहेर काढण्यात आले, ते प्रसिद्ध फ्रेंच लेखक आणि त्यावेळी सांस्कृतिक मंत्री असलेल्या आंद्रे मारलॉव्हच्या प्रयत्नांमुळे. पुढे १९८४ मध्ये फ्रेंच सरकारने त्याला French Legiond Honneur हा सर्वोत्तम सन्मान देऊन त्याचा गौरव केला. १९८७ साली त्याच्याच सॅल्वाडोर या शहरात The House of Jorge Amado Foundationची उभारणी करण्यात आली. त्यात एक म्युझियम आहे ज्यात जॉर्जेच्या पुस्तकांची मुखपृष्ठे ठेवण्यात आली आहेत. जॉर्जेच्या मृत्यूनंतर २०१४ साली Legislative Assembly of Bahia ने त्यांचा सर्वोत्तम नागरी पुरस्कार देऊन त्याचा गौरव केला. जॉर्जेला ऑनररी डॉक्टरेट ही पदवी ब्राझील, पोर्तुगाल, इटली, इस्त्रायल, फ्रान्स यासारख्या अनेक देशांच्या अनेक महाविद्यालयांनी देऊन त्याचा मानसन्मान केला.



जॉर्जे अमादू


जॉर्जे अमादूच्या पहिल्या काही कादंबऱ्यांवर त्याच्या साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. हुकूमशाही राजवटीत होणाऱ्या जुलमांची, कष्टकरी समाजाच्या पिळवणुकीची हृदयद्रावक दृश्ये त्याच्या कादंबरीत पाहायला मिळतात. पण पुढच्या आयुष्यात त्याच्या लिखाणाची वाढलेली व्याप्ती आपल्याला स्तिमित करणारी आहे. ब्राझीलमधील रीतीरिवाज, कौटुंबिक व्यवस्था, समाजात स्त्रियांची पुढे येण्याची धडपड, धर्माचा प्रभाव, असे अनेक विभिन्न विषय अमादूने अतिशय समर्थपणे हाताळलेले आहेत. लैंगिक संबंधांविषयी त्याची वर्णने त्याकाळच्या ब्राझिलियन समाजाला न पचणारी असल्यामुळे अनेकदा त्याला धमक्यांचाही सामना करावा लागला.

जॉर्जे अमादूने विपुल लेखन केले. त्याच्या अनेक कादंबऱ्यांची लोकप्रियता इतक्या वर्षांनंतरही टिकून राहिलेली आहे. त्याच्या कादंबऱ्यांची ५५ देशांतल्या ४९ भाषांत भाषांतरे झालेली आहेत. आपल्या बाहिया प्रांतातल्या चालीरीती, तिथला समाज, समाजातले अनेक थर, त्यांचे जीवन यावर अमादूने भरपूर लिखाण करून बाहियाला जगप्रसिद्ध केले.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जागतिक वाङ्‌मयात आधुनिकतेची जी चळवळ सुरू झाली, ज्याला Modernist School of writing असे म्हटले जाते, त्यामध्ये जॉर्जे अमादू हा एक आघाडीचा लेखक होता.

आता मी दी कॅप्टन ऑफ दी सँड्स या कादंबरीकडे वळतो.

ब्राझीलमधील बाहिया प्रांतातल्या एका शहरात हे कथानक घडते. या शहराला एक मोठा किनारा असतो आणि या किनाऱ्यावरील एका पडीक गोदामात अनेक मुले राहत असतात. अनाथ, रस्त्यावर फिरणारी, कुणी नातेवाईक नाही, कुणाचा मदतीचा हात नाही, बेवारशी, जणू समाजाने त्यागलेली अशी ही मुले. पडेल ते खाणे, भीक मागणे, कुणा दयाळू व्यक्तीने केलेल्या मदतीचा आश्रय घेणे अशा प्रकारे ही मुले त्यांचे दीनवाणे जीवन जगत असतात. समदुःखामुळे त्यांच्यात एक बंध निर्माण होतो. वेगवेगळ्या परिस्थितीतून, वेगवेगळ्या ठिकाणाहून ही मुले आलेली असतात, साधारणतः ५ वर्षे ते १४ वर्षे या वयोगटांतील ही जवळजवळ १०० मुले असतात. हळूहळू या मुलांची एक टोळीच तयार होते. टोळी म्हटली की म्होरक्या असतोच. या म्होरक्याचे नाव असते पेड्रो बाला – द बुलेट. हा आता पंधरा वर्षांचा असतो. त्याला त्याच्या आईबद्दल काहीच माहिती नसते आणि त्याच्या वडिलांचा एका संपामध्ये बंदुकीची गोळी लागून मृत्यू झालेला असतो. वयाच्या पाच वर्षांपासून तो बाहियातील रस्त्यांवर जगत असतो. आता त्याला शहराच्या कानाकोपऱ्याचीदेखील पूर्णपणे माहिती असते. पूर्वी एका मारामारीत पेड्रोच्या चेहऱ्यावर जखम झालेली असते आणि त्याचा व्रण त्याच्या चेहऱ्यावर कायम असतो.




पेड्रो हा अतिशय हुशार मुलगा असतो. तो त्या टोळीला संघटित करतो. चोऱ्या कशा करायच्या याची तो त्याच्या सगळ्या सहकाऱ्यांना शिकवण देतो. लेगलेस, बिग जाओ, कॅट आणि प्रोफेसर या नावांनी ओळखली जाणारी चार मुले त्याची मुख्य सहाय्यक असतात.

पुढे पेड्रो चोरीच्या योजना अमलात आणू लागतो. प्रत्येक मोहिमेची तो काटेकोरपणे योजना आखतो, प्रत्येक मोहिमेत तो टोळीतल्या काही जणांची निवड करतो, त्यांना मोहिमेतील कामे वाटून देतो आणि अतिशय नेमकेपणाने तो ही मोहीम राबवतो. अशा तऱ्हेने या मोहिमा यशस्वी होऊ लागतात. शहरात अशा चोऱ्यांचे प्रमाण

वाढू लागते. या मोहिमा नेहमीच यशस्वी होत असल्याने चोर कधीच पकडले जात नाहीत. यामुळे शहरातल्या नागरिकांमध्ये अस्वस्थता पसरते. वृत्तपत्रेही मग या सगळ्या घटनांची दखल घेऊ लागतात. बराच गवगवा होतो. शासनावर प्रचंड दबाव पडतो. मग पावले उचलली जातात. हळूहळू कळू लागते की या चोऱ्या अल्पवयीन मुलेच करत आहेत. मग या बेवारस, अनाथ, रस्त्यावरच्या मुलांची एक टोळीच या सगळ्या चोऱ्यांच्या मागे आहे असे निष्पन्न होते. या टोळीला 'कॅप्टन्स ऑफ द सँड्स' असे नाव दिले जाते.

इथे त्यांच्या रहाण्याच्या ठिकाणी म्हणजेच समुद्रकिनाऱ्यावरच्या पडक्या गोदामात चोरून आणलेल्या वस्तूंचा ढीग जमू लागतो. किती वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू! या वस्तूंची योग्य ती वासलात लावण्यासाठी पेड्रो बाला चोरट्या वस्तूंचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांशी संधान बांधतो. यात तो एका मध्यस्थाची मदत घेतो. त्याप्रमाणे चोरून आणलेल्या वस्तू पडक्या गोदामात येणे, तेथून त्या काही खास व्यापाऱ्यांना विकल्या जाणे असा क्रम सुरळीत चालू होतो. कॅप्टन्स ऑफ द सँड्सकडे आता पैसे येऊ लागतात. त्यांचे भीक मागायचे दिवस संपतात. तरीही काही मुले व्यवसाय म्हणून भीक मागतच रहातात. हातात पैसे आल्यावर या टोळीपैकी काही जण, विशेषतः कॅट जुगार खेळू लागतात. त्यात तो बरेच पैसे कमावू लागतो. एके दिवशी त्याला डालवा नावाची एक वेश्या भेटते. तिला बघताक्षणी तो तिच्या प्रेमात पडतो. पहिल्यांदा ती त्याला झिडकारते पण मग ते दोघे एकत्र येतात. आठवड्यातल्या एकदोन रात्री तिच्या बरोबर घालवण्याचा कॅटचा नेम सगळ्यांच्याच अंगवळणी पडतो.

अतिशय योजनाबद्ध चोऱ्या करण्याचा कॅप्टन्सचा धंदा चालूच असतो. पण पोलीस आता जागरूक झालेले असल्यामुळे या मुलांना चोऱ्या करताना अतिशय काळजी घेणे आवश्यक असते आणि त्याप्रमाणे ते ती घेतातही. त्यासाठी ते नव्यानव्या कल्पना वापरतात.

कॅप्टन्स ऑफ द सँड्सची कीर्ती आता शहरभर पसरलेली असते. असे हे जीवन जगत असताना या टोळीतल्या अनेक सदस्यांवर वेगवेगळे प्रसंग येतात, वेगवेगळ्या अनुभवातून त्यांना जावे लागते. शहरातला एक धर्मगुरू फादर जोस पेड्रो हा अतिशय दयाळू असतो. या सगळ्या अनाथ, बेवारशी मुलांबद्दल त्याला अतिशय कणव असते. सुधारगृहांची एकंदर परिस्थिती त्याला माहीत असल्यामुळे तो त्यांना तिथे जाण्याचा सल्ला द्यायला धजावत नाही, पण तो त्याच्यापरीने या मुलांना मार्ग दाखवण्याचे कार्य करत असतो. जोस पेड्रोच्या धार्मिक प्रवचनांना ही मुले फारसा प्रतिसाद देत नाहीत, पण त्यातला एक मुलगा लॉलिपॉप मात्र पार बदलतो. तो चोरी करायचे मात्र सोडत नाही.

पुढे एकदा बिग जाओ आणि प्रोफेसर यांची गाठ शहरातल्या रस्त्यावर एका मुलीशी पडते. त्या मुलीला काही लोक त्रास देत असतात. तिला ते वाचवतात आणि आपल्या राहण्याच्या जागी म्हणजेच पडक्या गोदामात आणतात. सोनेरी केसांच्या या मुलीला बघून काही मुलांच्या मनात कामवासना जागृत होते. ते तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न करतात. पण बिग जाओ तिच्यामागे खंबीरपणे उभा राहतो. त्याच्याशी मारामारी करायला कोणीच धजावत नाही. पेड्रो बाला मध्ये पडण्याचा प्रयत्न करतो पण आश्चर्य म्हणजे बिग जाओ त्यालाही धुडकावून लावतो. तो म्हणत असतो की ती एक अनाथ मुलगी आहे, आपले भक्ष्य नव्हे. तिची काळजी घेणे हे त्या सर्वांचे कर्तव्य आहे. अशाप्रकारे ही मुलगी डोरा या टोळीत दाखल होते. पुढे पुढे ती जणू सर्वांची आईच बनते. प्रत्येकाला ती मदत करते. कुणाचे फाटके कपडे शिवून देते, कुणाला बरे नसेल तर त्याची शुश्रूषा करते, कुणाबरोबर बोलून त्याचे मन हलके करते. हे सर्व घडत असताना ती आणि पेड्रो बाला एकमेकांच्या जवळ येतात. त्यांच्यात एक वेगळेच नाते निर्माण होते.

पुढे पेड्रो बाला आणि डोरा यांना पोलीस पकडतात. पेड्रोची रवानगी सुधारगृहात केली जाते तर डोराला अनाथालयात पाठवले जाते. सुधारगृहात पेड्रोवर अनन्वित अत्याचार होतात. तो ते सगळे धीराने सहन करतो खरा, पण तो आतून फार खचतो. काही महिन्यांनी कॅप्टन्स ऑफ द सँड्समधील काही सदस्य एक धाडसी योजना आखून त्याची सुटका करतात. डोराला अनाथालयातून सोडवणे फारच सोपे असते. पण त्यांचा हा आनंद फार काळ टिकत नाही. परत आल्यावर थोड्याच दिवसांत डोरा अतिशय आजारी पडते आणि त्यात तिचा दुर्दैवी मृत्यू होतो.

दिवसांमागून दिवस जात असतात. कॅप्टन्स ऑफ द सँड्समधले प्रमुख सदस्य आता वेगवेगळ्या वाटेने गेलेले असतात. प्रोफेसरला एक भला माणूस भेटलेला असतो आणि त्याच्या आश्रयाखाली त्याने एका महाविद्यालयात प्रवेश घेतलेला असतो. आपल्या आयुष्याचा कंटाळा येऊन लेगलेसने आत्महत्या केलेली असते. बिग जाओ जहाजावर नोकरी करत असतो. कॅट डालवापासून वेगळा झालेला असतो. त्यांच्यातल्या एक ड्राय गल्च एका कुविख्यात दरोडेखोरांच्या टोळीत सामील झालेला असतो. पुढे तो पकडला जातो आणि त्याला आजन्म कारावासाची शिक्षा होते. लॉलिपॉप सेमिनरीत दाखल झालेला असतो. पेड्रोच्या मनात डोराच्या मृत्यूचे कायम शल्य असते. पुढे तो राजकारणात सहभागी होतो पण त्याचा सहभाग एका आक्रमक संघटनेत झाल्यामुळे तो पुढे परागंदा होतो. गावागावात एक क्रांतिकारी म्हणून त्याचे नाव झालेले असते. इथे कॅप्टन्स ऑफ द सँड्सचे नेतृत्व बदललेले असते, सदस्यांची संख्या जरा घटलेली असते तरी ते कार्यरत असतात आणि इथेच ही कादंबरी संपते.

समाजाने त्यागलेल्या अनाथ मुलांची कथा या कादंबरीत अमादूने सादर केलेली आहे. या अनाथ, बेवारशी मुलांची कथा अमादूने अत्यंत प्रभावीपणे मांडलेली आहे. या कादंबरीच्या प्रारंभी त्याने काही वर्तमानपत्रांतली कात्रणे उद्धृत करून कॅप्टन्स ऑफ द सँड्स या टोळीची पार्श्वभूमी तयार केलेली आहे. यात काही बातम्या आहेत, काही पत्रे आहेत. यातून आपल्याला ही मुले कोण आहेत याबद्दल थोडा अंदाज येतो. सुधारगृहात अशा मुलांना जनावरांपेक्षा वाईट वागणूक मिळते हेही आपल्याला कळते. अशी पार्श्वभूमी तयार केल्यावर मग अमादू आपल्याला कथा सांगायला

सुरुवात करतो. कथानकाची बांधणी त्याने अतिशय कौशल्यपूर्ण केलेली आहे. प्रथम या टोळीचा इतिहास अगदी मोजक्या शब्दात सांगून मग तो या टोळीच्या विविध कारवाया अतिशय तपशिलात सांगतो. यात बऱ्याचदा चोऱ्यांच्या मोहिमांचे वर्णन आहे तर काही वेळा या मुलांशी निगडित असलेल्या काही प्रसंगांचे चित्रण आहे. उदाहरणार्थ, कॅप्टन्स ऑफ द सँड्स एक मोडकळीला आलेले मेरी गो राऊंड दुरुस्त करून शहरातल्या इतर मुलांना त्यात बसण्याचा आनंद मिळवून देतात हा प्रसंग. हे करत असताना या टोळीतल्या प्रमुख सदस्यांची तो आपल्याला ओळख करून देतो. मग या सदस्यांच्या व्यक्तिगत अनुभवांचे कथन करतो. हा कथापटल अमादू अत्यंत खुबीने आपल्यासमोर विस्तारत नेतो. या कादंबरीचे एक वैशिष्ट्य म्हणजे या टोळीच्या साहसांची वर्णने करताना अमादू कुठेही त्यांच्या परिस्थितीचे, त्यांच्या कृतींचे उदात्तीकरण करत नाही. जिवंत रहाण्याचा हा या लहान मुलांचा केविलवाणा झगडा तो विलक्षण सामर्थ्याने आपल्यापुढे चितारतो. या टोळीच्या काही प्रमुख सदस्यांच्या आयुष्यात येणारे वेगवेगळे प्रसंग हाच या कथानकाचा गाभा आहे. या प्रसंगातूनच त्यांची विभिन्न व्यक्तिमत्त्वे फुलत जातात, त्यांची भावविश्वे आपल्यासमोर स्पष्ट होत जातात. या कादंबरीत कारुण्याची झालर असलेले अनेक नाट्यमय प्रसंग आहेत, पण त्यांचे वर्णन करताना अमादू कधीच भावनाविवश होत नाही. या मुलांच्या आयुष्यांचा एक दस्तऐवजच जणू तो आपल्यासमोर मांडतो आहे. घडलेल्या घटनांचे ते केवळ शब्दांकन आहे इतकेच! या मुलांच्या साहसांतील सगळी शोकांतिका अमादू अगदी सहजच आपल्याला जाणवून देतो. अमादूच्या प्रभावी कथनशैलीमुळेच ही अतिशय कठीण गोष्ट त्याने विनासायास साध्य केलेली आहे असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये.

अमादूच्या भाषेचा बाजही अतिशय संतुलित आहे. या कादंबरीत आपल्याला अस्वस्थ करणारे अनेक प्रसंग आहेत. कधी अकारण असलेले क्रौर्य आहे, कधी लैंगिक हिंसेच्या प्रसंगांचे अंगावर काटा उभा करणारे तपशील आहेत, कधी या लहान मुलांची असहाय्यता आहे, त्यांची विफलता आहे – हे सगळे कथन करताना अमादूने अतिशय साध्या आणि सरळ भाषेचा वापर केलेला आहे. या भाषेत जी एक गेयता आहे त्यामुळे हे सगळेच प्रसंग आपल्या मनात घर करून राहतात. या साहसांची व्याप्ती वाढत जात असतानाच त्यांच्यात भाग घेतलेल्या लहान मुलांची घालमेल उत्तरोत्तर वाढतच जाते. त्यांच्या कृतींबद्दल त्यांच्या मनात संदेह उत्पन्न होतात आणि हे स्थित्यंतर अमादूने अतिशय ताकदीने रंगवलेले आहे. अमादूची भाषा इतकी सामर्थ्यवान आहे की ही कादंबरी वाचताना आपण जणू एक चलचित्र बघत आहोत असेच वाटते. अगदी मोजक्या शब्दांत प्रसंग आणि त्या प्रसंगांत गुंतलेल्या त्या लहान मुलांची भावविश्वे आपल्या डोळ्यांसमोर अमादू अगदी मूर्तिमंत उभी करतो.

अमादूने वेगवेगळ्या प्रसंगांची माळ गुंफून या कथानकाची बांधणी केली आहे त्यामुळे साहजिकच या कथानकाला गतिमानता प्राप्त झालेली आहे. या टोळीच्या वेगवेगळ्या सदस्यांच्या विभिन्न अनुभवांचे हे कथन असल्यामुळे एकामागून एक प्रसंग घडतच जातात, पण या प्रसंगांचा मूळ संदर्भ या टोळीने आखलेल्या योजनांशी असल्यामुळे यात एक समान दुवादेखील आहे, त्यामुळेच हे कथानक एकसंध झालेले आहे. हे कथानक पुढे सरकताना या मुलांच्या पहिल्या उन्मादाची जागा विषादाने भरून जाते. या शोषित लहान मुलांचे हे घृणास्पद जग आपल्यासमोर अमादूने अतिशय परिणामकारक उभे केलेले आहे. त्यामुळे ही कादंबरी अतिशय वाचनीय झालेली आहे.

या कादंबरीतले संवाद या कथानकाला आणि त्यातल्या प्रमुख व्यक्तिरेखांच्या स्वभावधर्मांना अनुरूप असेच आहेत. एका अर्थी ग्राम्य, आक्रमक, अपशब्दांनी भरलेले, भडक, अंगावर येणारे हे संवाद प्रथम प्रथम आपल्याला खटकतात खरे, पण या कादंबरीचे कथानक पुढे जाताना ते किती योग्य आहेत याची खात्री पटते. पण हे करताना अमादूने कुठेही लक्ष्मणरेषा पार केलेली नाही.

अनेक चित्रविचित्र व्यक्तिरेखांनी भरलेले हे कथानक आहे. यातल्या सगळ्याच मुख्य व्यक्तिरेखा तशा असाधारणच आहेत. कॅप्टन्स ऑफ द सँड्सचा म्होरक्या पेड्रो बाला, लॉलिपॉप, शक्तिमान बिग जाओ, जुगारात निष्णात असलेला कॅट, लंगडा लेगलेस, गुड लाईफ, अभ्यासू प्रोफेसर, बंडखोर ड्राय गल्च अशी टोपणनावे असलेली ही मुले आहेत. या प्रत्येकाच्या विशिष्ट स्वभावधर्मांसकट अमादूने ही प्रत्येक व्यक्तिरेखा अतिशय उठावदारपणे रंगवलेली आहे. पुढे कॅप्टन्सचा मित्र असलेला धर्मगुरू जोस पेड्रो, या कॅप्टन्सची जणू आई झालेली डोरा, कॅटची प्रेमिका डालवा अशा अनेक वेगवेगळ्या व्यक्तिरेखांनी हे कथानक समृद्ध झालेले आहे. अमादूने त्याच्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे मोजक्याच शब्दांत ही सगळी माणसे जणू जिवंतच केलेली आहेत.

समाजाने बेदखल केलेल्या लहानमुलांच्या आयुष्यावरची ही कादंबरी प्रसिद्ध झाली ती १९३७ साली म्हणजे अमादूच्या लिखाणाच्या प्रारंभीच्या काळात. अमादूवर असलेला साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव या कादंबरीत स्पष्टपणे जाणवतो. बाहियातील श्रीमंतांचे सुखासीन जग आणि या निराधार मुलांचे शापित जग यातला फरक अमादूने या कादंबरीत अतिशय ठळकपणे दाखवलेला आहे. बाहियावर अमादूने एकंदर सहा कादंबऱ्या लिहिल्या. Carnival Country ही पहिली तर Captains of the Sands ही शेवटची. या कादंबऱ्या बाहियन कादंबऱ्या म्हणून ओळखल्या जातात. बाहियातल्या लोकांच्या आयुष्यांचे सर्वतोपरी यथार्थ दर्शन घडवणाऱ्या या कादंबऱ्या आहेत.

जॉर्जे अमादूच्या असामान्य प्रतिभेची आपल्याला पुरेपूर खात्री पटवून देणारी ही कादंबरी जागतिक वाङ्मयातील एक अत्यंत श्रेष्ठ कलाकृती आहे हे आता जगन्मान्य झालेले आहे.

**– राजीव श्रीखंडे**
rshrikhande@yahoo.com




# कवी मनाचा कथाकार

## सुधाकर वसईकर

**भारताने** १९९१ साली मुक्त अर्थव्यवस्था अंगीकारल्यावर शहरी, निमशहरी आणि ग्रामीण मानवी जीवनात आमूलाग्र बदल झाला. एकीकडे पैसा खुळखुळायला लागला. मध्यमवर्गीय उच्च मध्यमवर्गाकडे मार्गक्रमण करत होता तद्वतच कामक्रोधाने भारलेल्या मानवाचे अक्राळविक्राळ स्वरूप उग्र होत गेले. वासनेचा बळी ठरलेले, प्रेमभावना लोप पावून भौतिक सुखाच्या मागे धावणारे, आणि व्यवस्थेचा बळी ठरलेला समाज पुढे १९९० ते २०१५ या पावशतकात कोणत्या भयावह परिस्थितीतून संक्रमण करत आला याचे वास्तववादी विदारक चित्र, केवळ १५९ पृष्ठांच्या १० लघुकथेतून बालाजी सुतार यांनी प्रचंड ताकदीने चितारले आहे. त्यांच्या 'दोन शतकांच्या सांध्यावरच्या नोंदी' या कथासंग्रहास नुकताच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा बाबुराव बागूल हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. यापूर्वी या संग्रहास शांताराम कथा पुरस्कार, नाथ फाऊंडेशन, औरंगाबादचा 'बी रघुनाथ' पुरस्कारही मिळाला आहे.






**बालाजी सुतार**

राजकीय व अर्थसाक्षरतेचा अभाव असलेल्या देशात, 'खाउजा'मुळे निर्माण झालेल्या जगण्याच्या नव्या आव्हानांना सामोरे जाताना अनेकांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उभे राहिले. शेतकरी, कामगार, कष्टकरी वर्ग यांच्या हितसंबंधांना नव्या नीती-कायदे यांनी सुरुंगच लावले. गरिबांना तर वालीच उरला नाही. राजकीय-आर्थिक-सामाजिक बदल/स्थित्यंतर याविषयी अनेक तज्ज्ञ आपले मत/निष्कर्ष वेळोवेळी नोंदवत असतात. परंतु सामान्य माणसाच्या आयुष्यावरील परिणाम याविषयी कोणीच बोलू इच्छित नसते. ही उणीव साहित्यिक, कलावंत यांनी भरून काढावी अशी अपेक्षा असते. याकरता सांस्कृतिक, साहित्यिक दस्तऐवज तयार होणे अत्यावश्यक असते. असा प्रयत्न करणारी बोटावर मोजता येतील एवढीच सृजनशील मंडळी सध्या शिल्लक आहेत. त्यात बालाजी सुतार हे एक आश्वासक नाव आहे. विसाव्या आणि एकविसाव्या शतकांचा हा जो 'सांधा' आहे त्याच काळात सुतार यांची जडणघडण झाली आहे. समाजातील विविध स्तरांतील सूक्ष्म बदल, त्यात निमशहरी आणि ग्रामीण भागातील माणसांचे उद्ध्वस्त होणे, त्यांचे शोषण आणि ते करणारे शोषक, शासकीय यंत्रणा आणि तिच्या साहाय्याने येणारी भांडवलशाही, मोजक्यांना गब्बर करून बाकीच्यांना देशोधडीला लावणारा, पिळणारा 'बाजार', धार्मिक ध्रुवीकरण, देशाच्या राजकारणाने 'बहुसंख्यवादा'च्या दिशेने घेतलेले वळण हे सारे अनुभवत, जगत ते सारे टिपून मानवी जगण्याची कथा त्यांनी संवेदनशीलतेने सांगितली आहे. जी खरे तर वाचकाला हादरवून

टाकते, अस्वस्थ करते पण, त्याच वेळेस जगण्याचे बळही देते.

'दोन शतकांच्या सांध्यावरील नोंदी' या कथासंग्रहातील कथा वाचताना वाचकाला हे परिणाम (सकारात्म वा नकारात्म असो) प्रत्ययास येतात. २५ वर्षांचा काळ खरे तर मोठा कॅनव्हास आहे. त्यावर अनेक दुखरे संदर्भ कथन करत या लघुकथा आशयाच्या पातळीवर दीर्घचिंतन करायला भाग पाडतात. संसाधनांची मुबलकता असूनही मानवी नातेसंबंधांत एक निर्वात पोकळी निर्माण झालीय याचे दाखले लेखनात जागोजागी मिळत राहतात.

सभोवताल अनेक सुख-दुःखाच्या घटनांनी भारलेला असला तरी त्याचे संदर्भ कधी लागतात, कधी लागत नाहीत. आणि हे तुकड्यातुकड्यातील संदर्भ गोळा करून एकसंध पद्धतीने बांधत एक प्रयोगशील कथाकार जेव्हा प्रचंड ताकदीने त्या कथा, गोष्ट-स्वरूपात वाचकांसमोर ठेवतो तेव्हा अवाक् व्हायला होते. सगळं काही असूनही काय करावं? हा सगळ्यांना पडलेला हा सार्वत्रिक प्रश्न. 'विच्छिन्न भोवतालाचे संदर्भ' या पहिल्याच कथेत असंच कंटाळायुक्त आयुष्य जगणारा राघव आधुनिक जगातला फोलपणा अनुभवतो. त्यामुळे त्याची जगण्याची गोची झाली आहे. त्याच्या या कंटाळवाण्या जगण्याचे प्रसंगानुभव बारकाव्यनिशी अतिशय खुबीने रेखाटले असून, काव्यगत तत्त्वातून मांडलेले कथासार मुळात वाचणे अतिशय विलक्षण आहे.

तुरटी फिरवून पाणी नितळ करावे तसे नात्यांबाबत नाही करता येत. निदान नवऱ्या-बायकोच्या नात्यामध्ये तर नाहीच. डहुळला डोह नितळ होणे शक्य नाही हे हरिश्चंद्रला कळते पण ते वळत नाही. मित्राच्या साडूची बायको कीटकनाशक पिऊन आत्महत्या करते. पण नवऱ्याशी प्रतारणा करत नाही. हे तो आपल्या बायकोला, तिच्या अनैतिक संबंधाबाबत, ठणकावून सांगण्यास मात्र कचरतो....'डहुळ डोहातले भोवरे' या कथेतील त्याचे हताशपण कथा संपल्यावरही वाचकास हळहळ करायला लावते.

'निळ्या चमकदार काळोखातले अप-डाऊन्स' कथेतील ४७ वर्षांच्या चित्राला मूल नसते आणि नवरा आपल्याच कामात गर्क असतो. अशा स्थितीत ती जीवनातील भावनिक पोकळी भरून काढण्यासाठी आभासी जगाचा आधार घेते. त्यात रममाण होते. तिला आधार मिळतोही; पण तोही त्याच पुरुषीवृत्तीचा निघतो तेव्हा ती हबकून जाते. वास्तव असो वा आभासी, जग आपल्या पद्धतीने वाटचाल करत असते. स्वतःच्या कुवतीप्रमाणे जगाला पेलता किंवा टाळता आले पाहिजे. समजूतदारपणे स्वतःशी बोलता आले पाहिजे, हा अनेक गोष्टींबाबतचा एक हुकमी एक्का असतो.... हे तिला उमगते आणि ती आभासी विश्वातून लॉग आऊट होते. इथेही कथाविस्तारात लेखक आभासी जगाचे अनेक रंगपापुद्रे तपशिलाने सहज उलगडत जातो.

कविता हा एक गंभीर साहित्यप्रकार आहे हे लक्षात घेऊन जाणीवपूर्वक कविता लिहिताना कुणी दिसत नाही. आणि महानगरीय, शहरी संस्कृतीतील कवितेचा तोंडवळा आणि अनागर कवितेचा बाज यावर नेमकं भाष्य करणारा 'दोन जगातला कवी' या कथेतील नायक राजा म्हणतो, भुकेल्यापोटी भाकरकेंद्रित कविता होऊ शकते. मात्र शहरी कवितेत रूढ ग्रामीण कवितेचे अनुकरण होऊ शकत नाही. हा भेदाभेद खुबीने स्पष्ट करणारी ही कथा अंतर्मुख करते.

'पराभवाच्या बखरीतील काही पानं' या कथेतील तासिका तत्त्वावर नोकरी करणारा निवेदक पुरता समजूतदार असला तरी आयुष्यातील पोकळी त्याला अस्वस्थ करत असते. त्याचा सहपाठी मित्र मात्र शहरात जाऊन सहा आकडी गलेलठ्ठ पगाराची नोकरी करतो. थोड्याफार फरकाने ही विसंगती आज सगळीकडे दिसून येते. याच अनुषंगाने या कथेत शिक्षणसंस्थेतील अनागोंदी कारभार आणि त्यात भरडल्या जाणाऱ्या तरुणाईच्या व्यथेचे प्रसंग प्रकर्षाने येतात. शैक्षणिक व्यवस्थेवर ओरखडे ओढले आहेत ते प्रसंग मन विषण्ण करणारे आहेत. एकीकडे पराभूताचे आयुष्य जगतानाही निवेदक तारुण्यसुलभ वयातील शकूचा घेतलेला मुका मात्र विसरू शकत नाही.

'दोन शतकांच्या सांध्यावरच्या नोंदी' ही शीर्षक कथासंग्रहाच्या संकल्पनेचा युएसपी ठरते. यात इसवी सन २०००, इसवी सन २००८, इसवी सन २०१३ आणि इसवी सन २०१७ मधील धार्मिक उन्मादाचे परिणाम, पाणीप्रश्न, शेतकरी आत्महत्या, आणि राजकारणाने गाठलेला उच्चतम कळस याच्या नोंदी वाचकांस अस्वस्थ करतात. त्यात शेखरच्या तोंडी एक वाक्य येते, 'बाजलं बदलून पोर होत नसतं भड्यांनो, त्यासाठी. नवरा बदलावा लागतो.' उत्तरादखल एक जण बोलतो, 'हे कितीही खरं असलं तरी देश चालवताना नुसता कारभारीही बदलून उपयोग नसतो.' असे हे सम्यक, तसेच संयत आणि तितकेच टोकदार व समजूतदार लेखन कुठेही एकांगी वाटत नाही. म्हणूनच हा कथाकार आजच्या पिढीत दखल घेण्यास पात्र ठरतो.

'अमानवाच्या जात्यावरचा पाळू' ही कथा करीमभाई आणि आमदार शिंदे ह्या एकाच पक्षाच्या राजकीय ध्रुवीकरणाची आहे. अनुबाई ही करीमभाईच्या पोराशी संबंध ठेवून आपला व्यवसाय सांभाळून आहे. मात्र त्याचा खून होतो. तो कसा आणि का होतो? आणि त्यात अनुबाई कशी भरडली जाते याचे विदारक चित्रण मन हेलावून सोडते. कथेत नावीन्य नसले तरी कथेची हाताळणी विचारप्रवण आहे.

'संधिकाळातले जहरी प्रहर'मध्ये आधीचे-पुढचे-मधले दिवस आणि कडेलोटाचा एकेक क्षण या विभागात केलेले भाष्य वाचकास सैरभैर करत असले तरी समाजजीवन, राजकारण आणि सांस्कृतिक जडणघडणीत होत असलेली अदृश्य घुसळण, मानवी जीवनाचा कोपर अन् कोपरा व्यापून उरलेली अनुकरणप्रियता, सामान्य माणूस सभोवतालचे जगणे तो स्वतःशी ताडून पाहत असतो. शेवटी त्याला कळून चुकते, की आपल्याला व्हायचे असते काहीतरी आणि आपण निष्कारणच वणवणणारा इसम बनतो. असे जगण्याचे तत्त्व सहज सांगून जाणाऱ्या या आठही कथा असल्या तरी त्या वाचकाच्या मनात विचारांचे मोहोळ उठवतात. दोन शतकांच्या सांध्यावरच्या या नोंदी सर्वसामान्यांच्या मनाला हळवे करून सोडणाऱ्या आहेत. म्हणूनच

त्या वाचकाला स्वतःच्या कथा वाटू लागतात.

बालाजी सुतार यांचा मूळ पिंड कवीचा आहे. अतिशय संवेदनशील, उत्कट कविता असो वा सामाजिक, विद्रोही आशयाच्या कविता असोत, तेवढ्याच समर्थपणे ते सर्व कविता प्रकार हाताळतात. एवढे असूनही ते स्वतःला कधीच कवी म्हणवून घेत नाहीत. अतिशय रांगडा (शब्दकळेबाबत म्हणायचे आहे), परखड, काहीसा फटकळ वाटणारा हा कवी स्वतःलादेखील सोलून काढतो. त्यांच्या लेखनातून ते सामान्य माणूस– ग्रामीण वा शहरी–झाडे–फुले–जनावरे याविषयी पोटतिडकीने लिहितात. अस्सल मातीतले! कवी असल्याने त्यांची शब्दनिवड अतिशय चपखल असते, अगदी थेट आणि हृदयस्पर्शी! कथा वाचतानादेखील अनेकदा पद्य वाचल्याचा अनुभव येतोच येतो. त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला नाही अजून, पण झालाच तर त्यांच्या कविता मराठी कवितेत नक्कीच मोठी उलथापालथ घडवून आणतील. त्यांची एक छोटी कविता त्यांच्या लेखनप्रेरणेविषयी मार्मिक भाष्य करते;

सनातन
नातं–
तुटता तुटत नाही,
त्या भोवतालाशी,
आणि,
कहाणी–
संपता संपत नाही.

ही गांज
का छळते, डअशी,
निरंतर?
आई म्हणाली,
तुझी नाळ पुरली, न, तिथे
म्हणून!

एकूणच, विसाव्या शतकातून एकविसाव्या शतकात संक्रमण करताना काय सुटलं आणि हाती काय लागले याचा लेखाजोखा मांडणारा हा सर्जक प्रयत्न आहे. १९९१ ते २०१६–१७ या काळातील देशपातळीवरच्या महत्त्वाच्या घटनांच्या प्रकाशात, भारतीयांच्या जगण्यात झालेले अपरिहार्य बदल, जगण्याचे साधन, भावविश्व, भवताल, मूल्यव्यवस्था आदींमध्ये झालेली उलथापालथ, ऱ्हास यांची नोंद हा संग्रह घेतो. माणूस आणि पैसा यांच्याकडे बघण्याचा बदललेला दृष्टिकोन आणि माणसाचे झालेले वस्तुकरण अधोरेखित करतो. आरसा धरत समाजाला त्याचा कराल चेहरा दाखवण्याचे धाडस करतो. यात कोणताही अभिनिवेश नाही. सर्व स्तरातील या नोंदी असून, त्या सर्वसामान्य माणसांच्या आहेत. ह्या नोंदी वाचकाला अंतर्मुख करत स्वतःबद्दल, समाजाबद्दल आणि देशाबद्दल विचार करायला भाग पाडतात.

**– सुधाकर वसईकर**
svasaikar64@gmail.com


॥ग्रंथाली॥

**शरद काळे यांची विचार व जीवन यावर सांगड घालणारी पाच पुस्तके**

**चिंतन भाग १ व भाग २**





**मूल्य ६०० रु.**
**सवलतीत ३५० रु.**





**मूल्य ७५० रु.**
**सवलतीत ४५० रु.**

**विज्ञानांजली**





**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २१० रु.**

**प्रेरणा**




**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**




**श्रीमद्भगवद्गीतेतील विज्ञानमूल्ये**
**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २५० रु.**



# निसर्गाचा स्रोत अबाधित राहण्यासाठी....!

**शरद काळे**

**पाटावर** किंवा खुर्चीवर बसून भरले ताट समोर आले की त्यावर आडवा हात मारल्याशिवाय कुणी उठत नाही! ताटात आवडते पदार्थ असले तर मग विचारायलाच नको! पण हे पदार्थ समोर येण्यासाठी आतापर्यंत मानवाने नेमके किती कष्ट केले आहेत, याचा विचार सहसा मनात येत नाही. कुतुहूल म्हणून आलाच तरी त्याचे फारसे निरसन करून घेण्याचा प्रयत्न करणारे हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच असतात. अर्थात त्यात वावगे आहे असे नाही, पण निसर्गऋण लक्षात घेण्यासाठी त्याची कल्पना असणे आवश्यक आहे. सहजतेने जीवन जगत असताना, त्यामागे निसर्गातील किती प्रकारचे स्रोत आणि संसाधने आपण वापरत असतो, त्यांचा आढावा घ्यायला शिकवला तर निसर्गाचा समतोल बिघडू न देता आपण सहजतेने जीवन जगताना, ते सर्वच दृष्टीने सुंदर असेल ह्यासाठी अधिक प्रयत्न करू शकू! निसर्गाच्या दृष्टीने तुमचे जीवन सुंदर असेल, तरच त्याला सर्वार्थाने सुंदर म्हणता येईल!

पृथ्वीवर पहिला आदिमानव उत्क्रांत झाला, त्याचे नाव होमो हॅबिलिस (हँडी मॅन) असे होते. साधारण २४ लाख वर्षांपूर्वी तो पूर्व आणि दक्षिण आफ्रिकेत राहत होता. त्यानंतर १९ लाख वर्षांपूर्वी होमो रुडॉल्फेन्सिस हा आणखी एक मानवसदृश प्राणी पूर्व आफ्रिकेत उदयास आला. त्यानंतर होमो इरेक्टस किंवा ज्याला दोन पायांवर उभा राहणारा म्हणून अपराईट मॅन असे संबोधले गेले, असा मानव चीन आणि इंडोनेशियामध्ये ११ लाख वर्षांपूर्वी उत्क्रांत झाला व एक लाख दहा हजार वर्षांपूर्वीपर्यंत तो पृथ्वीवर वावरत होता असे मानले जाते. होमो सेपियन म्हणजे आधुनिक मानव. याची उत्क्रांती सुमारे तीन लाख वर्षांपासून सुरू झाली. आपण सर्व जण याच वंशाचे लोक आहोत. या विविध मानवी जातींव्यतिरिक्त संशोधकांना वीस लाख वर्षांपूर्वीचे काही अतिप्राचीन मानवसदृश प्राण्यांचे पुरावे आफ्रिकेत मिळाले आहेत. यांचा संकर युरेशियन भागातील निंदरथाल (होमो निंदरथालेन्सिस) आणि डेनिसोव्हान (सन २००८मध्ये शोध लागलेले, आणि अजून नामकरण न झालेले!) यांच्याशी झाला असावा, असे फेब्रुवारी २०२० मध्ये प्रसिद्ध झालेल्या सायन्स अ‍ॅडव्हान्स या नियतकालिकातील शोधनिबंधात म्हंटले आहे. माणसाचा विविध टोळ्यांमधील संकराचे हे पहिले उदाहरण असावे. त्या नंतर या दोन्ही टोळ्यांमधील मानवी प्राण्यांचा आधुनिक मानवाशी संकर झाला आहे, असे पुरावे पुरातत्वशास्त्रात उपलब्ध झाले आहेत. जर्मनीतील मॅक्स प्लांक उत्क्रांत मानववंशशास्त्र संस्थेतील संशोधकांना निंदरथाल मानवी प्राण्यांचे जे डी.एन.ए. सिक्वेन्स उपलब्ध झाले, त्यातील काही जनुकपुंज आधुनिक मानवाच्या (होमो सेपियन) डी.एन.ए. सिक्वेन्सेसमध्येदेखील आढळून आले आहेत. त्यामुळे संशोधन क्षेत्रात असे काही घडले असेल याबद्दल फारसे दुमत राहण्याचे कारणच उरले नाही! याच निंदरथाल आणि डेनिसोव्हान टोळ्यांमधील मानवाचा संकर सायबेरियामधील निंदरथाल गटाशी झाला असावा असा पुरावा एका तेरा वर्षांच्या मुलीच्या अवशेषांमधून मिळाला आहे. ही मुलगी सुमारे ९०००० वर्षांपूर्वी सायबेरियाच्या पहाडी क्षेत्रातील गुहेत राहत होती! तिच्या अवशेषांच्या डी.एन.ए. विश्लेषणात तिची आई निंदरथाल आणि वडील डेनिसोव्हान होते असे आढळले आहे.

आधुनिक मानवाचा मेंदू अतिशय विकसित झालेला आहे. त्याचे सरासरी आकारमान २१०० घन सेंटिमीटर इतके (१४ सें.मी. x ९० सें.मी. x १६ सें.मी.) असते. त्याचे सरासरी वजन १.३ ते १.५ किलोग्रॅम असते. काहींचे मेंदू यापेक्षा कमी किंवा अधिक आकारमानाचे आणि वजनाचे असू शकतात! इतर सजीवांच्या तुलनेत याच मोठ्या आकाराच्या मेंदूमुळे माणसाने आपले अधिराज्य पृथ्वीवर गाजवायला सुरुवात केली. त्याने अग्नीचा शोध लावला. दगडांची शस्त्रे बनवली. गुहेमध्ये आसरा घेण्यास सुरुवात केली. नदीकाठी राहून भटक्या जीवनाला स्थिर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. शेती करून सातत्याने अन्नसाठा करण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच मानवी संस्कृती विकसित होण्याच्या दृष्टीने मानवाची वाटचाल दहा ते बारा हजार वर्षांपूर्वी निर्माण झाली असावी असे

मानले जाते. सुमारे सात हजार वर्षांपूर्वी मानवाने शेती आणि व्यापार करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यामुळे अन्नसाठा करून अतिरिक्त कामांसाठी त्याला वेळ मिळू लागला. इराकमधील टायग्रीस आणि युफ्रेटिसच्या साथीने मेसोपोटेमिया, नाईलच्या साथीने इजिप्त आणि सिंधूच्या साथीने भारतीय संस्कृतीचा विकास सुरू झाला. साधारण त्याच सुमारास मेक्सिको आणि दक्षिण अमेरिकेत माया संस्कृतीचा विकास होत होता. अंटार्क्टिका खंड वगळता, सर्वच खंडांमध्ये मानवाची प्रगती सुरू झाली.

प्रत्येक मानवी संस्कृतीची काही ठळक वैशिष्ट्ये असतात. त्यात नागरी वस्ती, विविध कलादर्शक स्मृतिकेंद्रे, परस्परसंवाद आणि परस्परसंबंध, प्रशासनप्रणाली, कार्यविभागणी, आर्थिक निकषांवर झालेली सामाजिक स्तरांची विभागणी आणि सांस्कृतिक मध्यवर्ती केंद्रांपासून वेगळे राहून त्यांच्याशी समरस होणारी मंडळी, अशा गोष्टींचा समावेश होता. आजही थोड्याफार फरकाने ह्याच गोष्टी समाजात सर्वत्र आढळतात. नागरी आणि ग्रामीण असे दोन भाग त्यात पडणे स्वाभाविक होते. इसवी सन ३०० ते ६००च्या दरम्यान मेक्सिकोजवेळ असलेल्या तुतीवकन शहरात दोन लाख लोक राहत होते असा संदर्भ आहे. भारतातदेखील मोहेंजोदडो आणि हडप्पापासून मगध, कोशल, देवगिरी, बदामी, उज्जैन, गुजरात, राजस्थान वगैरे क्षेत्रांमध्ये नागरी वस्ती असल्याचे बरेच पुरावे उपलब्ध आहेत. इजिप्तमध्ये लक्सॉर भागात फेराओंच्या साम्राज्यात अशी वस्ती होती. शेतकऱ्यांनी शेतीची जबाबदारी स्वीकारून अन्नसुरक्षेसाठी विश्वसनीय प्रणाली विकसित केली, तर समाजातील कला आणि शिक्षणक्षेत्राची प्रगती चांगली होते. भारतात कैलास लेणी, अजिंठ्याची लेणी, बेलूर, हलेबीटमंदिर, बृहडेश्वरमंदिर, मीनाक्षीमंदिर, पद्मनाभमंदिर, नटराजमंदिर, सुवर्णमंदिर, काळा हस्तीमंदिर, ताजमहाल, खजुराहो, कार्ला, भाजे, यादगिरी यांसारखी लेणी, शालिवाहन आणि सातवाहनांनी बांधलेले किल्ले, गोवळकोंडा किल्ला, प्रतापगड, रायगड, पन्हाळा यासारखे महाराष्ट्रातील किल्ले आणि अशी आणखी शेकडो उदाहरणे आपल्याला कला आणि स्थापत्यशास्त्रातील प्रगती दाखवण्यासाठी उपलब्ध आहेत. संगीतक्षेत्रातील विविध दिग्गज, संत रामदास, संत ज्ञानेश्वर, संत तुळशीदास, संत कबीर, संत तुकाराम, अर्वाचीन काळातील विविध लेखक आणि कवी आपल्याला हेच दर्शवतात की समाजाची भूक भागवण्यासाठी शेतकरी प्रणाली भक्कम असेल तर देश सर्वच क्षेत्रांत प्रगतिपथावर असतो. भारत देशातून एकेकाळी सोन्याचा धूर निघत असे, असे जे म्हणतात ते त्यामुळेच शक्य होते. निसर्गाची सेवा प्रत्येकानेच करायची असते. निसर्गातील सुविधांचा, संसाधनांचा आणि स्रोतांचा योग्य तो उपयोग करण्यासाठी स्वतःची प्रगल्भता वाढवण्याची गरज असते. स्वत: शेतकरी नसलो तरी शेतकरी आपल्यासाठी काय करत असतात, याची माहिती तरी करून घेतली पाहिजे. ती माहिती करून घेतली, तर शेतकऱ्यांना आणि निसर्गाला आपण नेमकी कोणती मदत करायची आहे, हे ठरवून त्याप्रमाणे ती मदत करण्यासाठी प्रत्येकाला वेळ काढावाच लागतो.

निसर्गाकडून आणि समाजाकडून आपल्याला सातत्याने काही न काहीतरी मिळत असते. त्याचे दोन ठळक भाग करता येतील. आपल्या शरीरामुळे आपण या जगाचा भाग बनतो. जन्माला आल्याच्या दिवसापासून शेवटचा श्वास घेईपर्यंत हे शरीर चांगले राखणे हे आपले कर्तव्यच असते. जगाशी संवाद साधण्याचे ते माध्यम आहे. हे शरीर चांगले राखण्यासाठी आपल्याला अन्न, वस्त्र, निवारा, पाणी आणि हवा यांची गरज असते. अन्नासाठी आपल्याला जसे निसर्गातून मिळणाऱ्या स्रोतांवर अवलंबून राहावेच लागते, तसेच पाण्यासाठी आणि हवेसाठीही निसर्गावरच अवलंबून राहावे लागते. पावसाळा उशिरा येणार असला की शेतकऱ्याचा पोटात जसा गोळा येतो, तसाच तो सामान्य नागरिकांच्या पोटातही येतो. कारण पिण्याच्या पाण्याची टंचाई त्याला परवडण्यासारखी नसते. त्यामुळे तोही चातकासारखी पावसाची वाट पाहात असतो. पाणी हे हायड्रोजन आणि ऑक्सिजन या दोन मूलद्रव्यांचे बनलेले असते. ऑक्सिजन आणि नायट्रोजन हे वायू वातावरणाचे घटक आहेत, तेही आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. अन्नावाटे आपल्या शरीराला आवश्यक असलेली इतर सर्व मूलद्रव्ये मिळतात. यात कार्बन, फॉस्फरस, सल्फर, क्लोरिन, फ्लुओरिन, आयोडिन, सोडियम, पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम, मँगॅनीज, लोह, तांबे, कोबाल्ट, निकेल, मॉलिब्डेनम, झिंक, सेलेनियम, सिलिका, बोरॉन यांचा समावेश असतो. प्रथिने, कार्बोहायड्रेट आणि मेद या ज्या तीन पायाभूत अन्नघटकांची शरीराला जरुरी असते, त्यातून ह्यातील बरीचशी मूलद्रव्ये शरीराला मिळत असतात. त्याशिवाय शरीराला जीवनसत्त्वे आवश्यक असतात. त्यांचा उपयोग मुख्यतः आपली रोगप्रतिकारक प्रणाली बळकट करण्यासाठी होतो. विविध भाज्यांमधून तसेच दूध, अंडी यांसारख्या प्राणिजन्य पदार्थांमधून ही जीवनसत्त्वे शरीराला मिळत राहतात. यातील एखादे किंवा एकाहून अधिक मूलद्रव्ये वा जीवनसत्त्वे आपल्याला मिळाली नाहीत तर शरीरात रोग किंवा दोष निर्माण होतात. त्यामुळे रोजच्या रोज एका निश्चित प्रमाणात या सर्व मूलद्रव्यांची पूर्तता अन्नावाटे होणे आवश्यक असते. हे अन्न आपल्याला निसर्गातूनच मिळते. महाराष्ट्रातील जेवणाच्या शाकाहारी ताटात भात, वरण/आमटी, पोळी/भाकरी, उसळी, विविध भाज्या, दही, लोणची, कोशिंबिरी, भजी, वडे, साबुदाणा खिचडी, तांदळाची खिचडी, भगर, कुरडया, पापड, पापड्या, सांडगे, विविध प्रकारची पक्वान्ने यांसारखे पदार्थ आलटूनपालटून असतात. मांसाहारी ताटात मटण, चिकन, मासे, कोळंबी, तिसऱ्या, झिंगे, कबाब यांसारख्या विविध प्राणिजन्य पदार्थांचा समावेश असतो. या सर्व अन्नघटकांना आपल्या ताटापर्यंत आणण्यासाठी कितीतरी लोक कष्टाचे डोंगर उपसत असतात. त्यात शेतकरी, व्यापारी, वाहतूकदार, आई, पत्नी किंवा बहिणीच्या रूपातील स्त्री, हॉटेल कर्मचारी आणि सर्वात महत्त्वाची ही धरतीमाता ह्या सर्वांचा वाटा सारखाच महत्त्वाचा असतो. त्या सर्वांना पोहोचपावती देण्यासाठी आपण सजग राहिले पाहिजे.

अन्न ज्या विविध धान्यांच्या, भाज्यांच्या, फळांच्या,

प्राणिजन्य पदार्थांच्या रूपात आपल्यासमोर येते, तेव्हा त्यातील विविधता लक्षात आल्यावर मन स्तिमित झाल्याशिवाय राहात नाही. पण या जगात खाणारे आपण एकटेच नसतो. आपल्या बरोबरीने समाजातील प्रत्येक व्यक्तीला निसर्गातील हे सर्वच पदार्थ मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार असतो. हा मूलभूत अधिकार मान्य करत असताना आपली मूलभूत कर्तव्येदेखील समजावून घेतली पाहिजेत. आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशातील नागरिकांच्या वाढत्या संख्येच्या बरोबर गरजाही वाढत्याच राहिलेल्या आहेत. त्यानुसार शेतीतंत्र सुधारून आपल्या बळीराजाने आपल्याला कधी उपाशी ठेवलेले नाही. त्यासाठी किती स्रोत लागतात, किती ऊर्जा लागते, किती पाणी लागते याचा सातत्याने आढावा घेत राहून आपल्या वैयक्तिक पातळीवर यांच्या भरपाईची सोय करणे अतिशय महत्त्वाचे असते. तसे झाले तरच मूलद्रव्यांची जैवरासायनिक चक्रे समतोल राहून सजीवसृष्टीचे अस्तित्व कायम राहण्यास मदत होईल. म्हणूनच आपण शेतीक्षेत्रात आपल्या देशाची नेमकी स्थिती काय आहे ह्याचा आढावा घेणार आहोत.

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारताची लोकसंख्या ३४ कोटी होती. त्या लोकसंख्येत जे बदल होत गेले ते तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शवले आहे.

लोकसंख्येत सातत्यपूर्ण वाढ होतच आहे. मध्यंतरी लोकसंख्यावाढीचा वेग हा २.३४ टक्के एवढा होता. आता मात्र तो कमी होत ०.९७ टक्के इतका झाला आहे. आजच्या मितीला लोकसंख्या १४० कोटींचा आकडा पार करून गेली आहे. एक ठळकपणे नजरेत भरणारी बाब ह्या ठिकाणी लक्षात घ्यावी लागेल. वाढत्या आयुर्मानाच्या रूपात एक महत्त्वाचा गुणात्मक बदल लोकसंख्येत पाहावयास मिळतो, त्यामागे विज्ञानाचा मोठा सहभाग असल्याचे प्रकर्षाने जाणवते. माणसाचा इतिहास पाहिला तर त्याचे सरासरी आयुर्मान कधीही ३५-४० वर्षांहून अधिक असल्याची नोंद नाही. काही काही जमातींमध्ये दीर्घायुष्य लाभलेली अनेक उदाहरणे असतात, हे खरे असले तरी सरासरी म्हणून पाहिले तर माणसाची दीर्घायुषी या सदरात गणना करता येणार नाही. काही

**तक्ता क्रमांक १ – भारताची लोकसंख्या**

| वर्ष | लोकसंख्या (कोटी) | वाढीचा वेग (%) |
|---|---|---|
| १९६० | ४५.०५ | १.९८ |
| १९७९ | ५५.५२ | २.३३ |
| १९८० | ६९.९० | २.३४ |
| १९९० | ८७.३३ | २.१० |
| २००० | १०५.६६ | १.७८ |
| २०१० | १२३.४३ | १.३६ |
| २०१५ | १३१.०२ | १.१२ |
| २०२० | १३८.०० | ०.९९ |
| २०२१ | १३९.३४ | ०.९७ |
| २०२२ | १४०.६६ | ०.९५ |

समुद्री जीवांचे सरासरी आयुर्मान दोनशेहून अधिक वर्षे असले तरी सजीव प्राणिसृष्टीत सरासरी आयुर्मान पन्नास वर्षांपेक्षा कमीच असते. माणूसही त्याला अपवाद नव्हता. परंतु विज्ञानातील आणि विशेषतः वैद्यकीय विश्वात झालेल्या नेत्रदीपक प्रगतीमुळे तसेच शरीरशास्त्रातील विविध बारकावे माहीत झाल्यामुळे या स्थितीत नक्कीच फरक पडला आहे. त्याला जोड मिळाली ती कृषिक्षेत्राची! वाढत्या लोकसंख्येच्या विविध गरजा भागवताना उत्पादनही भरपूर वाढले. जागतिक स्तरावर त्याचे दृश्य परिणाम झालेले दिसतात. तक्ता क्रमांक दोनमध्ये गेल्या सहा दशकांमधील जगाच्या तुलनेत भारतातील वाढत्या आयुर्मानाची जी आकडेवारी दिली आहे, त्यावरून हे स्पष्ट होते, की आपल्या देशाला विज्ञानक्रांतीची फळे चाखायला मिळत आहेत. अमेरिकेत आपल्यापेक्षा सरासरी आयुर्मान दहा वर्षांनी तर जपानमध्ये पंधरा वर्षांनी अधिक आहे. हे आकडे नक्कीच महत्त्वपूर्ण असून आपल्याला अंतर्मुख होऊन त्यावर विचार व कृती करण्याची आवश्यकता आहे.

यात सुधारणेस नक्कीच वाव आहे. समाजातील प्रत्येक स्तरापर्यंत हे परिणाम पोहोचण्यास आणखी काही काळ लागेल.

**क्रमांक २ – जगाच्या तुलनेत भारतातील सरासरी आयुर्मान (वर्ष)**

| वर्ष | भारत | अमेरिका | चीन | जपान | जग |
|---|---|---|---|---|---|
| १९६० | ४१.१३ | ६९.८४ | ४४.५० | ६७.५० | ५०.०९ |
| १९७० | ४७.४१ | ७०.७८ | ५७.९५ | ७२.१६ | ५६.४९ |
| १९८० | ५३.४७ | ७३.७० | ६८.९२ | ७६.०४ | ६०.९९ |
| १९९० | ५७.६६ | ७५.१९ | ६९.१० | ७८.८९ | ६४.०५ |
| २००० | ६२.२८ | ७६.७५ | ७१.२५ | ८१.०३ | ६६.२० |
| २०१० | ६६.४३ | ७८.४९ | ७४.२६ | ८२.९२ | ६९.७० |
| २०१५ | ६८.३७ | ७८.८९ | ७५.७३ | ८३.७६ | ७१.४४ |
| २०२० | ६९.७३ | ७८.९३ | ७७.१३ | ८४.६७ | ७२.६३ |
| २०२१ | ६९.९६ | ७८.९९ | ७७.३० | ८४.७९ | ७२.८१ |
| २०२२ | ७०.४२ | ७९.११ | ७७.४७ | ८५.३ | ७३.२० |

**तक्ता क्रमांक ३ – गव्हाचे उत्पादन (मेट्रिक टन)**

| वर्ष | भारत | चीन | अमेरिका | जग |
|---|---|---|---|---|
| १९६१ | १.१ | १.४३ | ३.३५ | २२.२४ |
| १९७० | २.०१ | २.९२ | ३.६८ | ३१.०७ |
| १९८० | ३.१८ | ५.५२ | ६.४८ | ४४.०२ |
| १९९० | ४.९९ | ९.८२ | ७.४३ | ५९.१३ |
| २००० | ७.६४ | ९.९६ | ६.०६ | ५८.५ |
| २०१० | ८.०८ | ११.५२ | ६.०१ | ६४.०८ |
| २०२० | १०.७६ | १३.४३ | ४.९७ | ७६.०९ |

**तक्ता क्रमांक – ४ तांदळाचे उत्पादन (मेट्रिक टन)**

| तांदूळ | भारत | चीन | अमेरिका | जग |
|---|---|---|---|---|
| १९६१ | ५.३५ | ५.६२ | ०.२५ | २१.५६ |
| १९७० | ६.३३ | ११.३१ | ०.३८ | ३१.६४ |
| १९८० | ८.०३ | १४.२९ | ०.६६ | ३९.६९ |
| १९९० | ११.१५ | १९.१६ | ०.७१ | ५१.८६ |
| २००० | १२.७५ | १८.९८ | ०.८७ | ५९.८७ |
| २०१० | १४.३९ | १९.७२ | १.११ | ६९.४५ |
| २०२० | १७.८३ | २१.३६ | १.०३ | ७५.६७ |

पण गाडी त्या दिशेने धावत आहे, असे नक्की म्हणता येईल. सदा आदर्शवादी विचार मनात घेणाऱ्या लोकांसाठी कदाचित अजून परिस्थिती निराशजनकच आहे, असे जाणवते! सुदैवाने अशा लोकांची संख्या कमी आहे!

१४० कोटी लोकसंख्येच्या जीवनावश्यक गरजा भागवण्यासाठी भारतीय शेतीक्षेत्र पूर्णपणे नसले, तरी बऱ्याच अंशी सक्षम आहे. चीन (१९६२) आणि पाकिस्तान (१९६५ आणि १९७१, १९९९) यांच्याविरोधात झालेल्या लढायांचा फटका भारताच्या अर्थव्यवस्थेला चांगलाच भोगावा लागला होता. त्यानंतरही या दोन शत्रूंच्या कायमस्वरूपी धोक्यामुळे आपल्या अर्थव्यवस्थेत भारतीय लष्करावर भरपूर खर्च करावाच लागतो, आणि सुरक्षेच्या दृष्टीने तो अनिवार्यदेखील आहे. तरी शेतीक्षेत्रात आपल्या देशाची घोडदौड सातत्याने सुरू आहे. १९६०च्या दशकात आपली अन्नधान्य परिस्थिती फारच बिकट होती. देशातील शेतीउत्पादन पुरेसे नव्हते आणि आयातीसाठी परकीय चलनाचा तुटवडा होता. युरोपीय शास्त्रज्ञांनी भाकीत केले होते की, भारतात अन्नासाठी यादवी युद्ध होऊन भारताचे तुकडे तुकडे होतील! अमेरिकन सरकारने त्यावेळी मिलो नावाचे अतिशय हलक्या आणि निकृष्ट दर्जाचे धान्य पाठवून आपली फार मोठी निराशा केली होती. तांदूळ, गहू, साखर हे रेशनकार्डवर ठरावीक प्रमाणातच पुरवले जात होते. रॉकेल रेशनकार्डावरच मिळत होते. आजही यातील काही गोष्टी रेशनवर मिळतात हे खरे असले तरी त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या साठ ते नव्वदच्या दशकातील संख्येच्या आणि वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर बरीच कमी झाली आहे. सत्तरच्या दशकात भारतीय कृषिक्षेत्रात डॉ. नॉर्मन बोरलॉग आणि डॉ. स्वामिनाथन यांच्या मार्गदर्शनाखाली जी हरितक्रांती झाली, तीमुळे देशाच्या कृषिउत्पादनात आणि विशेषतः गहू व तांदळाच्या बाबतीत भरघोस वाढ झाली (तक्ता क्रमांक ३). १९६०च्या तुलनेत भारतीय लोकसंख्या तीन पटींहून अधिक वाढली आहे, पण त्या दरम्यान गव्हाचे उत्पादन दहा पट तर तांदळाचे उत्पादन साडेतीन पट वाढले आहे. अन्नसुरक्षेसाठी ही आकडेवारी निश्चितच दिलासा देणारी आहे यात शंका नाही. भारतीय कृषिक्षेत्र आपल्याला भविष्यात अधिक बळकट करण्यासाठी केंद्रीभूत संशोधन महत्त्वाचे आहे, तसेच यांत्रिकीकरण करण्याचीदेखील गरज आहे. जीवनमानात झालेल्या गुणात्मक बदलांमुळे शेतीवरील कामांसाठी जे मनुष्यबळ पूर्वी उपलब्ध होते, तसे ते आता उपलब्ध होणार नाही हे निश्चितच म्हणता येते.

(तक्ता क्रमांक – ४) यातील बारकावे, त्यांचे भारतीय जीवनमानावर होणारे परिणाम आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या भविष्यातील आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी आपल्याला वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर नेमके काय करावे लागेल, याचा आढावा आपण पुढील लेखात घेणार आहोत.

**– शरद काळे**
भ्रमणध्वनी : ७५०६४९८२८५
sharadkale@gmail.com


ग्रंथाली

रवि मांद्रेकर लिखित दोन पुस्तके

बाऊन्सर



BOUNCER



मूल्य ४०० रु.
सवलतीत ३०० रु.

Price : Rs. 500
Discount : Rs. 300

डॉ. अविनाश सुपे लिखित दोन पुस्तके

'सर्जन'शील



राहा फिट



मूल्य ३५० रु.
सवलतीत २१० रु.

मूल्य ३०० रु.
सवलतीत १८० रु.

# पायाभूत सुविधा पुरवण्यात एमआयडीसी अग्रेसर

**रु. २,६९,८८७ कोटींचे १२३ सामंजस्य करार, थेट परकिय गुंतवणूकीत अग्रेसर, अद्ययावत पायाभूत सुविधा**



राज्याच्या विकासासाठी पायाभूत सुविधांचा विकास आवश्यक असतो. रस्ते महामार्ग, रेल्वे, हवाई आणि समुद्री वाहतूक, बंदरे या दळणवळणाच्या साधनांमुळे दैनंदिन जीवन सुलभ होते. राज्यात औद्योगिक क्षेत्रात अशा सुविधांचे मोठे जाळे विणण्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. राज्यात पाणी, वीज, रस्ते, पथदिवे, जलशुद्धीकरण व सांडपाणी प्रक्रिया केंद्र इत्यादी पायाभूत सुविधा एमआयडीसीमार्फत पुरविल्या जातात. यामुळे राज्याच्या औद्योगिक विकासासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ही राज्यातील गुंतवणूक प्रोत्साहन देणारी नोडल एजन्सी आहे. एमआयडीसीमार्फत उद्योगांना अद्ययावत पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. औद्योगिक पायाभूत सुविधा विकसित करणारी एमआयडीसी ही महाराष्ट्र शासनाची प्रमुख संस्था आहे. एमआयडीसीने आजवर विशेष औद्योगिक क्षेत्रे म्हणजेच सेझ, सिल्व्हर झोन, आयटी, बीटी, वाइन (द्राक्षप्रक्रिया) आणि रत्नांसाठी विशेष औद्योगिक पार्क तयार केले आहेत.

३१ डिसेंबर २०२१पर्यंत एमआयडीसीने २८९ औद्योगिक वसाहती विकसित केल्या असून त्यामध्ये २५३ मोठी औद्योगिक क्षेत्रे, २५ लघुक्षेत्रे तर ११ विकासकेंद्रांचा समावेश आहे. ही क्षेत्रे अतिशय किफायतशीर दरात उपलब्ध असून तेथे प्लग आणि प्ले इन्फ्रास्ट्रक्चर या उपक्रमा-अंतर्गत उद्योगांना रेडी-टू-मूव्ह-इन फॅक्टरी म्हणजेच थेट उत्पादनासाठी साहाय्य दिले जाते. एमआयडीसीने आयडीबीआय बँकेच्या सहकार्याने एअरोस्पेस आणि डिफेन्स क्षेत्रातील स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी व्हेंचर कॅपिटल फंड तयार केला आहे. औरंगाबाद आणि नागपूर येथे सीईपीईटीच्या सहकार्याने कौशल्य विकास केंद्रांना प्रोत्साहन देऊन कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाते. एमआयडीसीची पाणीपुरवठा योजना आशिया खंडात सर्वात मोठी आहे. महाराष्ट्रातून जाणाऱ्या दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरसाठी एमआयडीसी ही नोडल एजन्सी आहे.

### ४५ हजार एकर जमिनीची लँड बँक

एमआयडीसीने ४५ हजार एकरहून अधिक जमीन उद्योगांसाठी अधिगृहीत केली आहे. यात मुंबई-ठाणे रायगड (१५,००० एकर), पुणे-चाकण-तळेगाव-सातारा (८००० एकर), नाशिक-मालेगाव अहमदनगर (५००० एकर), औरंगाबाद (ऑरीक-डीएमआयसी) व जालना (१०,००० एकर), नागपूर-अमरावती (४००० एकर) आणि रत्नागिरी-सिंधुदुर्ग (५१५० एकर) जमिनीचा समावेश आहे. या व्यतिरिक्त, एमआयडीसीद्वारे औद्योगिक शेडची जागा भाडेतत्त्वावर उपलब्ध करून दिली जाते. यामुळे उद्योगांना कमी वेळेत उत्पादनात जाणे शक्य होते. राज्यात ३१ डिसेंबर २०२१पर्यंत ५२,६२३ औद्योगिक घटक आहेत. यात एकूण ३,१९,१९७ कोटींची गुंतवणूक करण्यात आली असून त्यातून १६.२९ लाख रोजगार निर्माण झाले आहेत.

### पंतप्रधान गतिशक्ती योजनेसाठी नोडल एजन्सी

एमआयडीसी ही प्रधानमंत्री गतिशक्ती योजनेची नोडल एजन्सी आहे. गतिशक्ती योजना हा देशात सर्वांगीण पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठीचा राष्ट्रीय उपक्रम आहे. या माध्यमातून देशभरातील

पायाभूत सुविधांच्या विकासासाठी एकात्मिक फ्रेमवर्क तयार करणे अभिप्रेत आहे. या सुविधांमुळे सरकारी आणि खाजगी क्षेत्राकडून झालेल्या गुंतवणुकीचा अधिक चांगल्या प्रकारे विनियोग करणे शक्य होणार आहे.




### महाराष्ट्र समृद्धी महामार्गासाठी इक्विटी पार्टनर

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, विदर्भ आणि मराठवाडा विभागांना सुधारित कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी बांधला जात आहे. राज्याची हिवाळी राजधानी असलेल्या नागपूर शहराला राज्याची आर्थिक राजधानी मुंबईशी जोडणारा हा भव्य प्रकल्प आहे. या मार्गावर १० जिल्हे आणि ३९३ गावे जोडण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पासाठी एमआयडीसी इक्विटी पार्टनर आहे.

### महाराष्ट्र विमानतळ विकासासाठी इक्विटी पार्टनर

महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेडच्या (एमएडीसी) इक्विटी भागीदारीमध्ये एमआयडीसीचा समावेश आहे. प्रादेशिक हवाई कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी एमएडीसी कार्यरत आहे. एमएडीसीमार्फत नागपूर (मिहान) येथे मल्टि-मॉडेल इंटरनॅशनल हब विमानतळ उभारला जात असून राज्यात हवाई क्षेत्रासाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी विशेष प्रयत्नशील आहे.

### रांजणगाव, पुणे येथे इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफक्चरिंग क्लस्टरचा विकास

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वतीने रांजणगाव एम आयडीसीच्या फेज-३ मध्ये इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर (ईएमसी) स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे. येथील औद्योगिक विकासासाठी एकूण ३०० हेक्टर जमीन संपादित करण्यात आली असून त्यापैकी १२०.२४ हेक्टर ईएमसी २.० योजनेअंतर्गत ग्रीनफिल्ड प्रकल्पाच्या विकासासाठी निश्चित करण्यात आली आहे. ईएमसी प्रकल्पाच्या संकल्पनेतून रांजणगाव येथील उद्योगांच्या सुविधा विकसित करण्याचे नियोजन आहे. या ठिकाणी चाचणी प्रयोगशाळा, प्लग अँड प्ले, ट्रक टर्मिनल्स इत्यादीसारख्या अनेक पायाभूत सुविधांचा विकास केला जाईल. प्रस्तावित प्रकल्प पुण्यातील इलेक्ट्रॉनिक्स उद्योगांना चालना देण्याच्या दृष्टीने उपयोगी ठरेल.

### महाराष्ट्रात मल्टि-मॉडेल लॉजिस्टिक पार्कचा विकास

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण- एनएचएआय आणि महाराष्ट्र सरकारने मुंबई-ठाणे, पुणे, नाशिक आणि औरंगाबाद येथील ४ एमएमएलपी प्रकल्पांची निवड केली आहे. त्यासाठी एमआयडीसी, एनएचएलएमएल आणि रेल्वे विकास निगम यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र प्रकल्पाच्या विकासाच्या दुसऱ्या टप्प्याचे नियोजनही सुरू आहे.

### पंतप्रधान मित्र योजनेअंतर्गत टेक्सटाइल पार्कचा विकास

केंद्राच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाने राज्य सरकारांच्या भागीदारीत ग्रीनफील्ड/ब्राऊनफील्ड साइट्समध्ये ७ पंतप्रधान मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाइल क्षेत्र आणि अपेरिअल (PM-MITR) पार्क्सची स्थापना करण्यासाठी योजना सुरू केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्यावतीने बिडकीन-ऑरिक, औरंगाबाद येथे ग्रीनफिल्ड पार्क आणि अतिरिक्त अमरावती एमआयडीसीमध्ये ब्राऊनफिल्ड पार्क विकसित करण्यासाठी एमआयडीसीने दोन प्रस्ताव पाठवले आहेत.

### विदर्भ संरक्षण औद्योगिक हबचा विकास

मल्टि-मॉडेल इंटरनॅशनल हब एअरपोर्ट (मिहान) येथे विदर्भ डिफेन्स हब आणि इंडस्ट्रियल क्लस्टर (VDHIC) या नावाने एकात्मिक संरक्षण उत्पादन क्लस्टर तयार केला जात आहे.

संरक्षण क्षेत्रात उपकरणांच्या निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी विदर्भ डिफेन्स इंडस्ट्रियल हब प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची स्थापना केली आहे. ही कंपनी संरक्षण व हवाई वाहतूक क्षेत्रासाठी आवश्यक उपकरणे तयार करण्यासाठी कार्यरत आहे.

हा उपक्रम विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन, व्हिडीआय-एझपीएल, बुटीबोरी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, एमआयडीसी इंडस्ट्रीज



विमानतळ दर तासाला ४०० प्रवासी किंवा प्रति तास दोन उड्डाणे हाताळू शकते. तसेच, याची १० लाखांहून अधिक प्रवासी वाहतुकीची वार्षिक क्षमता आहे. चिपी विमानतळावर ए-३२० आणि बी-७३७ सारखी विमाने उड्डाण करू शकतात. यामुळे कोकणातील पर्यटनाला मोठी चालना मिळेल आणि प्रादेशिक अर्थव्यवस्थेसाठी अधिक संधी निर्माण होतील.

असोसिएशन, इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफक्चरर्स असोसिएशन आणि लघुउद्योग भारती, सोलर इंडस्ट्रीज आणि या भागातील अभियांत्रिकी उद्योगांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

### एकात्मिक औद्योगिक क्षेत्रे आणि एकात्मिक लॉजिस्टिक पार्क्सचा विकास

राज्य सरकार एकात्मिक औद्योगिक क्षेत्र (आयआयए) आणि इंटिग्रेटेड लॉजिस्टिक पार्क्स (आयएलपी)च्या निर्मितीसाठी धोरण निश्चित केले आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी एमआयडीसी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून काम करत आहे.

### साळाव, रायगड (कोकण) येथे बल्क ड्रग्ज पार्कचा विकास

औषध उत्पादन देशात होण्याकरता जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी रायगड जिल्ह्यातील साळाव येथे बल्क ड्रग्ज पार्क सुरू करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने एमआयडीसीमार्फत केंद्राकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. बल्क ड्रग्ज पार्कमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होऊन औषधांच्या उत्पादनखर्चात लक्षणीय घट होईल. देशांतर्गत औषध उद्योगात स्पर्धा वाढवून राज्याला औषधनिर्माण क्षेत्रात स्वावलंबी होता येईल.

### चिपी, सिंधुदुर्ग विमानतळाचा विकास

सिंधुदुर्गातील चिपी विमानतळामुळे महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टी भारताच्या हवाई वाहतुकीच्या नकाशावर आली आहे. चिपी विमानतळाची धावपट्टी २५०० मीटर लांबीची असून त्यात अजून १००० मीटरची वाढ करण्यास वाव आहे. हे

### एमआयडीसीद्वारे देण्यात आलेल्या मुख्य सुविधा–

**लँड बँक** : राज्याच्या २८९ एमआयडीसीमध्ये २.२५ लाख एकर जमीन आहे. शिवाय मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० अंतर्गत, राज्याने ५८,००० एकरांपेक्षा जास्त जमीन औद्योगिक वापराकरता विकसित करण्यासाठी राखून ठेवली आहे. त्यातील जमिनीचा काही भाग संपादित केला आहे, तर काही भाग संपादनाच्या प्रक्रियेत आहे.

**पाणीपुरवठा** : एमआयडीसीकडे आशियातील सर्वात मोठी पाणीपुरवठा यंत्रणा आहे. याद्वारे दररोज २५०० एमएलडी पाणीपुरवठा केला जातो. गेल्या दोन वर्षांत एमआयडीसीद्वारे सरासरी १४२२.३५ एमएलडी पाणीपुरवठा केला गेला आहे. वागळे इस्टेट, डोंबिवली, कल्याण, भिवंडी, टीटीसी, तळोजा, अंबरनाथ, अतिरिक्त अंबरनाथ, बदलापूर इत्यादी औद्योगिक क्षेत्रांना तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणीपुरवठा करण्यासाठी एमआयडीसीने १९७२ मध्ये बदलापूरजवळील पिंपळोली गावाजवळ बारवी नदीवर १३०.४० एमसीएम क्षमतेचे बारवी धरण बांधले. पाण्याच्या मागणीतील वाढ लक्षात घेऊन, बारवी धरणाची उंची वाढवून याची क्षमता १७८.२६ एमसीएम करण्यात आली. तर



२०१९ मध्ये धरणाच्या एकूण क्षमतेत ३४०.४८ एमसीएम इतकी वाढ झाली.

**सामायिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प** : एमआयडीसीच्या वतीने आपल्या औद्योगिक क्षेत्रात कॉमन एफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट म्हणजेच सामायिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आले आहेत. तळोजा औद्योगिक क्षेत्राचे पुनर्वसन करण्यासाठी जुन्या प्रकल्पांचे अद्ययावतीकरण आणि २७.५० एमएलडी क्षमतेचा प्रकल्प कार्यान्वित करण्यात करण्यात आले. तारापूर एमआयडीसीत ५० एमएलडी क्षमतेचा सीईटीपी तयार आहे. रोहा औद्योगिक क्षेत्रासाठी २२.५० एमएलडी क्षमतेचा सीईटीपी तयार होत आहे. तर अतिरिक्त अंबरनाथ, कोल्हापूर आणि अतिरिक्त बुटीबोरीमध्ये सीईटीपीचे बांधकाम सुरू आहे.

**वीज** : एमआयडीसीकडे भारतातील विजेची सर्वाधिक ४३ गिगावॉट इतकी स्थापित क्षमता आहे. तसेच, अपारंपरिक ऊर्जानिर्मितीसाठी ९ गिगावॉट क्षमतेची चौथी सर्वात मोठी क्षमता स्थापित आहे.

**कनेक्टिव्हिटी** : राज्यात २.५ लाख लांबीच्या रस्त्याचं जाळे उपलब्ध आहे. त्यात एमआयडीसीने गेल्या दोन वर्षांत २७२ किलोमीटर लांबीचे रस्ते बांधले आहेत. राज्यात ५ आंतरराष्ट्रीय विमानतळ, १३ देशांतर्गत विमानतळ, २ प्रमुख बंदरे आणि ५३ लहान बंदरे यांच्याद्वारे परिपूर्ण असा हवाई आणि समुद्री वाहतुकीचा समावेश आहे. तसेच, एमआयडीसी लॉजिस्टिक इन्फ्रास्ट्रक्चर विकसित करण्यासाठी साहाय्य करते. यात वेअरहाऊस, कोल्ड स्टोरेज, मल्टि-मॉडेल लॉजिस्टिक पार्क्सचा समावेश आहे. यामुळे येत्या काही वर्षांत कनेक्टिव्हिटीला आणखी चालना दिली जाईल.

**एकूण गुंतवणूक करार – रु. ६,२१,७५५ कोटी**
**थेट परकीय गुंतवणूक – रु. २,८८,९०५ कोटी**
(ऑक्टोबर २०१९ ते मार्च २०२२)
**नियमित गुंतवणूक – रु. ६२,९६३.६४ कोटी**
(डिसेंबर २०२० पासून)

## गुंतवणूक करारांवर स्वाक्षरी

- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, जून व जुलै २०२०**
  **रु. १७,६८६ कोटी । १४,०२५ रोजगार**
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, नोव्हेंबर २०२०**
  **रु. ३४,८२९ कोटी । २३,१८२ रोजगार**
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, डिसेंबर २०२०**
  **रु. ६१,०४२ कोटी । २,५५,३८० रोजगार**
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, जुलै २०२१**
  **रु. १६,५०० कोटी । ५,००० रोजगार**
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, सप्टेंबर २०२१**
  **रु. ३५,५०० कोटी । १०,००० रोजगार**
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, ऑक्टोबर २०२१**
  **रु. २,८२३ कोटी । १,२५० रोजगार**
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, नोव्हेंबर २०२१**
  **दुबई एक्स्पो २०२० – रु. १५,६१७ कोटी । ११, ३८५ रोजगार**
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, डिसेंबर २०२१ व जानेवारी २०२२**
  **रु. ५,५१२ कोटी । ९,९८० रोजगार**
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, मे २०२०**
  **रु. ८०,४७९.७८ कोटी । ९६,७०५ रोजगार**





# दृश्यात्मक शब्दकळेची कविता

किरण येले

पूर्णत्व लाभण्यासाठी इथला प्रत्येक सजीव धडपडत असतो. मग ते पूर्णत्व जीवनातील असो की कलेतील. साहित्य क्षेत्रातही आपल्या लेखनास प्रकाश मिळावा आणि ते लोकांपुढे यावे यासाठी अनेक नवोदित लेखक कवी प्रयास करताना दिसतात.

मंगेश पाडगावकर एका ठिकाणी लिहितात, 'आणि फुले होण्यासाठी, कळ्या जागताना'. या सुंदर ओळीत एक तगमग आहे, आस आहे, सूर्यप्रकाशाची. त्याच्या तेजाची. ते तेज मिळवण्यासाठी जागणाऱ्या कळ्यांची तगमग ज्याला समजली, त्याला त्या कळांच्या उमलण्याचे अप्रूप वाटू लागते. त्या कळ्या वेळेत उमलाव्यात ही भावना जागू लागते.

वेळेत न उमललेल्या कळ्या, फूल न होता गळून गेल्या की ते नुकसान फुलाचे तर असतेच, अवकाशाचेही असते. एक निर्मळ गंध त्या अवकाशाने गमावलेला असतो. कवी ग्रेस लिहितात –

उजळून निघण्यासाठी जळतात जिवाने सगळे
जो वीज खुपसतो पोटी तो एकच जलधर उजळे

हे असे वीज पोटात खुपसून घेणारे जलधर आणि त्यांच्यातले ते तेज हरवून जाऊ नये म्हणून, या महिन्यापासून सुरू होणाऱ्या 'उमलती अक्षरे' या सदरात मराठी साहित्याच्या विश्वात आपल्या प्रतिभेने प्रवेश करणाऱ्या नवलेखक/कवींची दखल घेण्यात येईल. त्यावर तुमचे अभिप्राय थेट त्या लेखकास पाठवलेत तर त्यांना ते प्रेरणादायी आणि दिशादर्शक ठरतील.



सागर अचलकर

**या** सदराची सुरुवात सोलापूरच्या अशा एका साहित्यिकापासून करत आहोत, ज्याचा पुढील साहित्यिक प्रवास भरारी घेणारा असेल असे त्याच्या अक्षरावरून दिसते आहे. त्याचे वाचन अफाट आहे. पूर्वसुरीपासून समकालीन लेखकांपर्यंतचे अनेक नामवंत आणि नवोदित लेखक त्याने वाचून काढले आहेत. त्यांच्या साहित्याचा त्याने चौफेर अभ्यास केलेला आहे. गेली अनेक वर्षे त्याच्या व्हाट्सअपचा स्टेटस एकच आहे, तो म्हणजे 'वाचणारे विजयी होवोत!' सोलापूरजवळील हत्तरकुंडलसंग येथील मंदिरावर

कोरलेल्या शिलालेखातील हे वाक्य आहे. अलीकडे वाचक कमी होत आहेत अशी ओरड ऐकू येते. अनेकदा लेखक-साहित्यिक यांचे वाचनही नसल्याचे जाणवते. अशा परिस्थितीत एक नवोदित कवी समग्र वाचन करून न थांबता मनन-चिंतन आणि त्यानंतर लेखन करत आहे ही बाब आनंददायी आहे. 'वाचणारे विजयी होवोत' या वाक्यामागचा गर्भित अर्थ समजून घेतल्यास या वाक्याचे महत्त्व आणि अर्थसूचन आपल्या कायम लक्षात राहील. वाचक म्हणजे समाजव्यवस्थेतील एक सर्वसामान्य घटक, ज्याला समाजव्यवस्थेतील प्रक्रियेत काहीही स्थान नसते. परंतु राज्यकर्ते निवडण्याची वेळ येते तेव्हा तेव्हा या घटकाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होते. कारण वाचक वाचनाने समृद्ध झालेला असतो. अनेक ग्रंथांच्या वाचनाने तो विचारशील झालेला असतो. असा वाचक एखादा विचार सांगतो तेव्हा त्यामागे कारणमीमांसा असते, जी हितसंबंधांतून आलेली नसते तर ठाम सामाजिक आणि वैचारिक बैठकीतून आलेली असते. त्यामागे समाजाचे, राज्याचे आणि देशाचे हित असते. असे सगळे वाचक राज्यकर्ते निवडून देतील किंवा स्वत: राज्यप्रक्रियेत सामील होतील तेव्हा राज्य आणि देश विचारवंतांच्या नजरेने मार्गक्रमण करू लागेल. वाचनाने विचार प्रगल्भ होतात, विचाराने आचरण प्रगल्भ होते आणि आचरणाने संस्कृती प्रगल्भ होते. जेव्हा विचार, आचार आणि संस्कृतीने प्रगल्भ झालेला घटक सत्ता निवडून देईल आणि स्वतः सत्तेत येईल तेव्हा देश प्रगतिपथावर चालू लागेल. असा काळ लवकर येवो, म्हणून 'वाचणारे विजयी होवोत.' गेली अनेक वर्षे ते स्टेटस ठेवणाऱ्या या तरुणाचे नाव आहे सागर अचलकर.

सागर अचलकर एका कंपनीत मार्केटिंग विभागात काम करतो. त्याचबरोबर तो सोलापूरच्या रेडिओ भूमी ९०.४ या नभोवाणीवर अर्धवेळ निवेदक म्हणून काम करतो. एम.ए.ची परीक्षा दिलेला हा तरुण गेली जवळपास दहा वर्षे कविता लिहितो आहे. अजूनही त्याने कवितासंग्रह काढण्याची घाई केलेली नाही. दहा वर्षे कवितेची साधना, अभ्यास, रियाज करत असलेल्या या कवीचे आवडते कवी आहेत हिंदीतील विनोद कुमार शुक्ल. त्यांच्या कवितेतील जादुई भाषिक मांडणी त्याला जास्त भावते. भाषेचा चपखल वापर करून अर्थप्रवण करणारे कवी म्हणजे विनोद कुमार शुक्ल असे तो म्हणतो. लिहिण्याचा सराव करताना त्याने इतर साहित्यप्रकारही हाताळून पाहिले आहेत. त्यांचा तटस्थपणे अभ्यास करताना त्याच्या लक्षात आले, की इतर साहित्य प्रकारात आपण मनासारखे व्यक्त होत नाही. म्हणून त्याने इतर साहित्यप्रकारातील लेखन थांबवून कवितेचा रियाज आणि अभ्यास करण्यावर लक्ष केंद्रित केले. ज्यामुळे आज महाराष्ट्रातील अप्रकाशित आणि नवोदित कवींत सागर अचलकर याची कविता लक्षवेधी ठरते. त्याची अभिव्यक्ती फक्त कवितेपुरती मर्यादित न राहता एकूणच जगण्याचा शोध तो रंगमंचाच्या माध्यमातूनही घेण्याचा प्रयत्न करत असतो. सागर मराठी रंगभूमीवरीलही एक उगवता तारा आहे. अभिनयापासून नाटकाची संगीतयोजना, प्रकाशयोजना यात त्याला विशेष गती आहे. असे कलेचे विविध आयाम तपासताना त्याची कविता प्रगल्भ होत गेलेली दिसते. याचा पुरावा त्याचा एका कवितेतून दिसतो.

'मर्ढेकर' ही त्याची कविता वाचताना त्या कवितेत मर्ढेकर असले तरी ही कविता वाचताना कोलटकरांच्या कवितेचा रूपबंध असल्याचा भास होतो. या कवितेतील; शब्दकळा आणि रूपबंध कोलटकरांच्या अल्पाक्षरी कवितेसारखा आहे. तो लिहितो-

***मर्ढेकर***

*दगडाला पाठ टेकून*
*मर्ढेकर वाचणाऱ्या एका माणसाला*
*मी विचारले,*
*इथे जवळपास कुठे नदी आहे का?*

*तो म्हणाला, मला ठाऊक नाही.*
*मी इथे नवीन आहे.*

*मी पुढे निघालो तर मागून*
*मर्ढेकर वाचणाऱ्या माणसाने*
*हाक मारली*
*मी पुन्हा त्याच्याकडे गेलो*
*तर तो म्हणाला,*
*कवितेतली नदी चालेल का?*

*मी म्हणालो, त्याने तहान भागेल का?*
*तो काहीही बोलला नाही*
*त्याने माझ्या हातात मर्ढेकर दिले.*
*मी दगडाला पाठ टेकून मर्ढेकर वाचण्यात गुंग झालो.*

*काही वेळाने एक माणूस आला*
*इथे जवळपास कुठे नदी आहे का विचारू लागला.*
*मी म्हणालो,*
*ठाऊक नाही.*
*मी इथे नवीन आहे.*

या कवितेत एकूण तीन पात्रे आहेत. या पात्रापैकी एक दगडाला टेकून बसलेला आहे आणि तो पुस्तक वाचतो आहे. तो जे पुस्तक वाचतो आहे ते मर्ढेकरांचे आहे. मर्ढेकरानी ज्या कविता लिहिल्या त्यातून माणसाचे माणूसपण अंगी यावे अशी साधी इच्छा त्यांच्या कवितेत डोकावते.

*भरूनी येईल हृदय जेधवा*
*शरीर पिळूनी निघेल घाम*
*अन शब्दांच्या तोंडामधे*
*बसेल तुझा गच्च लगाम*
*काळ्यावरती जरा पांढरे*
*या पाप्याच्या हातुनी व्हावे*

*आणि परंतु फक्त तेधवा*
*हेच पांढऱ्यावरती काळे*

अशी प्रार्थना लिहिणाऱ्या मर्ढेकरांचे पुस्तक दगडाला टेकून बसलेला माणूस वाचतो आहे. आता हा दगड कोणता आहे याचा विचार केल्यास अनेक अर्थसूचन जाणवू लागते. अशा दगडाला टेकून मर्ढेकर वाचत बसलेल्या माणसाला निवेदक वा कवी विचारतो, इथे जवळपास नदी आहे का? आता ही नदी कोणती आहे? त्यात कोणते पाणी वाहत आहे? निवेदक आसपास नदीचाच शोध का घेत आहे? त्याला तहान लागली आहे का? तो कासावीस तर दिसत नाही. मग हे कोणते पाणी आहे ज्याचा तो शोध घेत आहे? असे अनेक प्रश्न वाचकाच्या मनात उभे राहतात आणि सखोल विचार करताना त्यामागे एक प्रगल्भ विचार दिसू लागतो. मर्ढेकर वाचणारा माणूस म्हणतो, मला माहीत नाही. मी इथे नवीन आहे. पण विचारतो, कवितेतील नदी चालेल का? आणि मग हातातील मर्ढेकर निवेदक वा कवीला सोपवून तो निघून जातो. याचा अर्थ मर्ढेकरांची कविता नदी आहे का? मग हा आधी वाचणारा माणूस ती सोपवून पुढे निघून का जातो? आता पुढील एखाद्या नदीचा शोध त्याला घ्यायचा आहे का? तो कुठे निघून जातो? आणि तो मर्ढेकरांचे पुस्तक देऊन गेल्यावर नदी शोधणारा माणूस मर्ढेकर वाचत बसतो. मग तो नदी शोधत इथवर आला त्याचा तो शोध संपला आहे का? की मर्ढेकर हे त्याच्या शोधाची एक पायरी आहे? हा माणूस वाचत बसल्यावर आणखी एक माणूस येतो आणि नदी कुठे आहे विचारतो.

दुसऱ्या महायुद्धात जो नरसंहार झाला त्यानंतर माणसाचे यांत्रिकीकरण झाले आणि माणुसकीचे अभिनिवेषी रूप उरले. या काळात मर्ढेकरांनी माणूस आणि माणुसकीवर कविता लिहिली. आटत चाललेल्या माणुसकीच्या नदीचे प्रवाहीपण त्यांनी कवितेतून रुजवण्याचा प्रयत्न केला. या माणुसकीच्या प्रवाहाच्या शोधात आजही माणसे वणवण फिरताना दिसतात.

चांगली कविता ही कॅलिडोस्कोपसारखी असते किंवा अमूर्त चित्रासारखी असते. वेगवेगळ्या कोनांतून ती वेगवेगळी दिसते किंवा अनेक प्रश्न मांडत उत्तरे शोधण्यास भाग पाडते. सागर अचलकरच्या काही कविता या कसोटीवर उतरतात. सागरच्या कविता या काळातल्या असल्या तरी त्याचा पाया पूर्वसुरींच्या कवितांचा आहे याचा पुरावा म्हणजे ही कविता. सागरची कविता मर्ढेकरांचा वारसा घेऊन आली आहे आणि ती अरुण कोलटकरांच्या मार्गाने जाणार असल्याचे दिसते. त्याच्या कविता अल्पाक्षरी आहेत. आपण नीट पाहिल्यास लक्षात येईल की आजच्या काळात मॉडर्न किवा ग्लोबलायझेशनच्या म्हटल्या गेलेल्या बहुतांशी कवितांमध्ये नेहमी यादीवजा विधानाची वा वस्तूची वा कृतींची यादी असते. परंतु सागरची कविता प्रत्येक ओळीतून एक काही गोष्ट ठामपणे सांगू पाहते आणि ते सांगण्यासाठी सागर जो रूपबंध वापरतो तो वेगळा आहे. प्रत्येक दृश्यमान गोष्ट तो उलटसुलट करून कवितेत आणू पाहतो त्यातून कविता बहुआयामी होत जाते हे निश्चित. त्याच्या जोरकस कवितालेखनाचा प्रत्यय देणाऱ्या या कविता.

***प्रवास***

*आता पुढच्या स्टेशनवर.*
*आपल्याला जितकं उतरता येईल*
*तितक उतरूया*

*बाकी राहिलेलं उतरू*
*पुढच्या स्टेशनवर*

*असं करता करता*
*प्रत्येक स्टेशनवर*
*उतरत गेलो आपण*
*थोडं थोडं*

*शेवटचं स्टेशन आलं*
*आणि लक्षात आलं की*
*उतरण्यासाठी*
*आता आपण*
*काहीच शिल्लक नाहीयेत*

या कवितेकडे एकाच कोनातून आपल्याला पाहता येणार नाही. अनेकार्थ सूचन करणारी ही कविता आहे. ही कविता जगण्याचे परिमाण सांगते तसेच नातेसंबंधाचे चित्रणही उभे करते. या कवितेतील स्टेशने कोणती आहेत? ती आयुष्याच्या वाटेवरची आहेत की आठवणींच्या वाटेवरची आहेत. आणि कवितागत निवेदकाचा प्रवास कुठून कुठे चालला आहे? हा प्रवास परतीचा आहे की सुरुवातीचा? आणि यात दोन व्यक्ती आहेत की अनेक? ही कविता सामाजिक स्थितीवर भाष्य करते की व्यक्तिगत नातेसंबंधावर असे प्रश्न मनात उपस्थितीत होत जातात. अशा अनेक आयामातून या कवितेचे वाचन केल्यास विविध अर्थ त्यातून सूचित होतील. अशाच रूपबंधाच्या कविता म्हणून विहीर, स्वप्न-काही तुकडे या कवितांकडे पाहता येईल.

***विहीर***

*विहिरीच्या आकाराची*
*एक कविता*
*कागदावर खोडून पाहिली*

*आत उतरायला*
*दहा-बारा पायऱ्या लिहिल्या*
*पण पाणी काही सुचेना*

*मग खोडून पाहिलेली विहीर*
*आत उतरून खोडून टाकली.*

*फक्त पायऱ्या तेवढ्या शिल्लक ठेवल्यात*
*वर येण्यासाठी*

*स्वप्न – काही तुकडे*

*१.*
*मातीचं स्वप्न बघत*
*गाढ झोपी गेलो*
*जाग आली*
*तेव्हा*
*सगळ्या स्वप्नांची*
*माती झाली होती.*

*२.*
*मातीत माती पेरली*
*की म्हणे उगावतो डोंगर*

*माझ्याकडे होती*
*थोडीशी माती*
*स्वप्नांची झालेली.*

*ती पेरली*
*पण उगवलं काहीच नाही.*

*शेवटी याही स्वप्नांची मातीच झाली.*

*३.*
*स्वप्नं पडतात*
*थेंबाथेंबानं*
*पाणी साचतं*
*आणि जाग येते.*

*४.*
*तू सुईवर एक अर्धवट*
*ओळ लिहिलीस*
*आणि मी*
*दोरीवर एक*
*अर्धवट*
*ओळ लिहिली*

*कुणीतरी माझी ओळ*
*तुझ्या ओळीत ओवली*

*आणि पाहतो तर काय*

*पानभर टाकेच टाके*

*पक्ष्यांचं गाणं*

*तू गर्भवती आहेस*
*तुझ्या पोटातून*
*एक झाड उगवावं*
*अशी माझी*
*तीव्र इच्छा आहे*

*इच्छेचं फळ न पिकताच*
*गळून पडलं*
*आणि*

*तुझ्या पोटातून*
*घरटं हरवलेला*
*एक पक्षी बाहेर पडला*

सागर अचलकर त्याच्या कवितेचा हा प्रवास असाच सुरू राहिला तर त्याची कविता पुढील काळात मराठी साहित्यातील एक महत्त्वाची कविता ठरेल, असे वाटते. त्याच्या कवितेला दृश्यात्मक शब्दकळा आहे. त्याच्या कवितेला गती आहे. त्याच्या बहुतांश कवितेतील प्रत्येक ओळीत काही घटित घडताना दिसते. हे घटित त्याची कविता पुढे नेत राहते. पण, हे घटित फक्त कथा म्हणून येत नाही तर ते घडताना प्रत्येक वेळी काही प्रश्न निर्माण करते. सागर अचलकर याचे नाट्यप्रकारवरचे प्रेम आणि त्याचा अभ्यास पाहता त्याच्या कवितेत नाट्याविष्कारातील दृश्यात्मकता दिसते. परंतु म्हणून कवितेचे नाट्य होत नाही. सागरची कविता कळत-नकळत ती सीमारेषा ओळखून त्यापलीकडे जात नाही, हे त्याच्या कवितेचे विशेष म्हणावे लागेल. परंतु काही वेळा त्याची कविता विधानात्मक होते. त्यामुळे कवितेतील सूचकता जाऊन त्या कवितेचे सपाटीकरण झालेले दिसते. काही कवितांत डोकावणारा हा धोका त्याला टाळावा लागेल. तसे झाल्यास सागर अचलकर हे नाव पुढील काळात मराठी कवितेतील एक महत्त्वाचे अक्षर असेल, यात शंका नाही.

**– किरण येले**
भ्रमणध्वनी : ९८६९२६०७८०
kiran.yele@gmail.com

**– सागर अचलकर**
भ्रमणध्वनी : ८७९३८७५४५६

**चित्रगुज पश्चिमेचे**



# रंगरेषांचा प्रवास

**विजयराज बोधनकर**

**प्राणी,** पक्षी, कीटक, निसर्गातल्या अनेक गोष्टी चित्रातून मांडतांना कलावंत त्याला ते आवडत असतं म्हणून चितारत असतो. आतल्या आवडीचा धागा कलावंत सोडत नाही. पैसा आणि समाधान या दोन गोष्टी क्वचितच एकत्रित नांदतात. स्वत:च्या कलानेच काम करताना अनेक संकटं झेलावी लागतात. त्यात निराशा आणि दु:खही वाट्याला येतं. आजारांचा सामनासुद्धा करावा लागतो. अशाही परिस्थितीत कलावंत हृदयाचा धागा मरेपर्यंत सोडत नाही आणि मनबुद्धीला भावणारं चितारताना तो दु:ख स्वीकारतो, पण स्वत्व सोडत नाही अशाच पठडीतल्या या गोष्टी आहे, थोडक्यातला हा रंगरेषांचा प्रवास आहे.



एडविन लँडसीअर यांची कलाकृती

**एडविन लँडसीअर**



भाग्य आणि दुर्दैव काहींच्या आयुष्यात हातात हात घालून येतं. एकीकडे यशाचं शिखर तर दुसरीकडे आजाराचा पाठलाग. एडविन लँडसीअर या चित्रकाराच्या बाबतीत हेच घडत गेलं. त्याचा जन्म ७ मार्च १८०२ मध्ये इंग्लंडमध्ये झाला. त्याचे वडील हे एक उत्तम एनग्रेव्हर होते. घरातच कलेचं मूळ असल्यामुळे एडविनमध्येही कलेचे गुण मुळातच होते. ते घरच्यांच्या लक्षात आल्यामूळे ऐतिहासिक पेंटर बेंन्जामिन रॉबर्ट याच्याकडे त्याला वडिलांनी चित्रकला अवगत करायला पाठवलं. त्याअगोदर वडिलांनीही घरी कलेचं शिक्षण दिलं होतं. बेन्जामिननं मात्र एडविनला प्राण्यांच्या चित्रावर लक्ष केंद्रित करायला सांगून पक्ष्यांचा व प्राण्यांचा परिपूर्ण अभ्यास करण्यास प्रवृत्त केलं. प्राण्यांचं विच्छेदन करून त्यांचे स्नायू, हाडाचे सांगाडे, आतील अवयव कशा रचनात्मक पद्धतीनं असतात याचं शिक्षण घेण्यास प्रोत्साहित केलं. त्यामुळे त्याच अभ्यासाच्या मार्गावरून प्रामाणिकपणे तो गेल्यानं त्याचा उत्तम प्राणिचित्रकार म्हणून सर्वत्र बोलबाला होऊ लागला.

केवळ तेरा वर्षांचा असताना त्याची चित्राकृती रॉयल ॲकॅडेमीमध्ये प्रदर्शित झाली. तो चोवीस वर्षांचा असताना तो ॲकॅडेमीचा साहाय्यक म्हणून निवडून आला व त्यानंतर पाच वर्षांत ॲकॅडेमीचा शिक्षणतज्ज्ञ बनला. १८५० मध्ये त्याला मानाचा किताब बहाल करण्यात आला व १८६६ मध्ये त्याला ॲकॅडेमीचा प्रेसिडेंट म्हणून निवडण्यात आलं, पण त्याचा त्यानं स्वीकार केला नाही.

आरोग्य ही निसर्गाची मालमत्ता आहे. कधी काय होईल ते सांगता येत नाही. एडविनला एका आजारानं कवटाळलं, त्यात तो खूप निराश होत गेला. नर्व्हस ब्रेकडाऊनचे त्याला झटके येऊ लागलेत. याच काळात टफलागर चौकात बसवण्यासाठी चार भव्य शिल्पांचं काम मिळालं, पण आजारामुळे ते काम करायला त्याला नऊ वर्षे लागली. आजाराच्या कटकटीमुळे तो दारूच्या व ड्रग्जच्या आहारी गेला आणि पुन्हा आरोग्याचे तीन तेरा वाजले. त्याचा आजार जास्तच बळावला तेव्हा घरच्यांनी तो वेडा झाला असं घोषित करून टाकलं. १८७२ची ही गोष्ट आहे.

मात्र त्यानं जे काम केलं ते केवळ अद्वितीय होतं. केनवूड हाऊस, द व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियम, टेट ब्रिटन, वॉलेस कलेक्शन अशा प्रसिद्ध ठिकाणी त्याची चित्रं व शिल्पं मानानं प्रदर्शित केली होती. महाराणी व्हिक्टोरियाचा तो आवडता चित्रकार होता. तिनं त्यांच्या पाळीव प्राण्यांची खूप चित्रं एडविनला काढायला सांगितली. एक फारच भव्य चित्र त्यानं चितारलं त्यात व्हिक्टोरीया राणी मोठ्या रुबाबात घोड्यावर बसली आहे. ते चित्र रॉयल ॲकॅडेमीमध्ये लावण्यात आलं. असा हा एडविन १ ऑक्टोबर १८७३ रोजी इंग्लंडमध्ये वारला तेव्हा लोकांनी एक दिवस आपली दुकानं उत्स्फूर्तपणे बंद ठेवून दुखवटा पाळला होता. त्याची अंतयात्रा पाहण्यासाठी लोकांनी तोबा गर्दी केली होती. त्यानं निर्माण केलेल्या सिंहाच्या शिल्पावर पुष्पचक्र अर्पण करण्यात आलं होतं. त्याचा देह लंडनमधल्या सेंट पॉल कथिड्रलमध्ये दहन करण्यात आला होता. हे असं भाग्य फारच कमी कलावंतांच्या नशिबी येत असतं.

**रोलन्ट सेव्हरी**

भिंतीवरची पाल, अनेक कीटक  हे काय चित्रांचे विषय आहेत काय? पण निसर्ग प्रत्येकाच्या मनोविश्वाचं गणित करूनच पाठवत असतो, मनात दडून बसलेलं विश्व बाहेर येतंच येतं. रोलन्ट सेव्हरी या चित्रकारानं प्राणी, पक्षी, कीटक, सुंदर फुलं, फुलांच्या गळून पडलेल्या पाकळ्या व या सर्व चित्रांना पौराणिक व बायबलची पार्श्वभूमी देऊन तर कधी निसर्गाच्या गाभाऱ्यात ही चित्रं रंगवली आणि आपला एक स्वतःचा ठसा त्या काळी जनमानसांवर उमटवला. असा हा वेगळा चित्रकार बेलजियम देशातल्या, वेस्ट फ्लॅंडर्सच्या प्रांतातल्या कॉर्त्रिक शहरात १५७३ साली जन्माला आला. त्याचा मोठा भाऊ जेकब सेव्हरी व चित्रकार हॅन्स बॉल ह्या दोघांकडे रोलन्टनं आपल्या बालपणी चित्रकलेचे धडे गिरवले. सोबत त्यानं आपले शालेय शिक्षणसुद्धा पूर्ण केलं.

त्यानंतर सेंट्रल युरोपमधल्या प्राग शहारात गेला. तिथे सम्राट रुडॉल्फ दुसरा आणि सम्राट मथायस ह्या दोन राजांच्या दरबारात तो दरबारी चित्रकार म्हणून काम करू लागला. १६०६ ते १६०८ मध्ये तो वनस्पतीवर अभ्यास करण्यासाठी टरोल राज्यात गेला. तिथे तो चित्रकार गिलीस डॉडकोएटरचा शिष्य बनला. वनस्पतीवरचा अभ्यासपूर्ण झाल्यानंतर तो ॲमस्टरडॅमला परतला. तिथे एक घर विकत घेऊन राहू लागला. दोन वर्षं तिथे चित्रसराव केल्यानंतर तो युट्रेक्टला गेला व तिथे स्थायिक झाला. एका वर्षभरातच त्यानं तेथील चित्रकारांच्या संस्थेत म्हणजे आर्टिस्ट गिल्डमध्ये सदस्यत्व मिळवलं. याच दरम्यान त्याचा पुतण्या हॅन्स सेव्हरी याला त्याने स्वतःचा महत्त्वाचा साहाय्यक बनवला.



कामाचा आर्थिक ताळेबंद योग्य दिशेनं सरकत गेला आणि युट्रेक्ट शहराच्या बोटरस्ट्राट या भागात त्यानं एक भव्य घर विकत घेतलं. या भव्य घराच्या आवारात त्यानं त्याला आवडणारी विविध जातीची झाडं, वेली, फुलांची झाडं मोठ्या आवडीनं लावली. त्या आवाराला एक वेगळ्याच झाडांचा स्पर्श झाल्यामुळे अनेक चित्रकार त्याला भेटायला येत. तो चित्रकारांचा मीटिंग पॉईंट बनला असावा. त्यामुळे अनेक चित्रकारांचा स्नेह वाढत गेला. चित्रकार बॅलथजा व्हॅनडर एस्ट व ॲक्ब्रोसियस बॉस्थर्ट या स्टील लाइफ करणाऱ्या दोन्ही चित्रकारांची ओळख झाली. याच ठिकाणी त्याचे अनेक विद्यार्थीही जोडले गेले.

सेव्हरीनं निसर्गवेडामुळे अनेक निसर्गचित्रंही रंगवली. पण



**रोलन्ट सेव्हरी यांची कलाकृती**

त्याची निसर्गचित्रं ही त्याच्या अलंकारिक शैलीतली असल्यामुळे त्याच्या चित्रांची त्यानं स्वत:ची ओळख निर्माण केली होती. त्याची अशी अद्वितीय चित्रशैली तेव्हाच्या रुळलेल्या मॅनरिझम शैलीशी जोडली गेली होती. त्या काळच्या आर्ट कलेक्टर मंडळींनी त्याच्या शैलीला लोकप्रिय केलं. युरोप व नॉर्थ अमेरिकेच्या खूप साऱ्या म्युझियममध्ये त्याची चित्रं आढळतात. त्याचं सर्वात उत्कृष्ट मानलं गेलेलं काम म्हणजे डोडो पक्ष्याची चित्रं, जे पक्षी आता आस्तित्वातच नाहीत. असा हा वैविध्य जपणारा चित्रकार मात्र दारूच्या व्यसनात गुरफटला गेला. त्यामुळे त्याचं कलाविश्व अडचणीत येत गेलं. यातच तो दिवाळखोर बनला. शेवटी शेवटी तो कफल्लक बनला आणि निराशेच्या गर्तेत गेल्यावर २५ फेब्रुवारी १६३९ रोजी त्यानं जगाचा निरोप घेतला.

**फिलीप पीटर रूस**

का असं होतं? बऱ्याचदा या प्रश्नाला उत्तर मिळत नाही. सारं काही आलबेल असतांना महत्त्वाची कडी साखळीपासून दुरावते. का नियती अशी खेळ खेळते. फिलीप पीटर रूसच्या बाबतीत हे सारं लागू पडतं. तो कामात दक्ष होता, उत्कृष्ट होता, विविधांगी होता. परंतु तो व्यवहारी नव्हता. केवळ याच अवगुणामुळे त्याचा शेवट प्रसन्न होऊ शकला नाही. त्याची गोष्ट जरा वेगळी आहे. अशा या चित्रकाराचा जन्म १६५५ मध्ये जर्मनी देशातल्या फ्रँकफर्ट शहरात झाला. त्याचे वडील व भाऊ चित्रकार होते. ती दोघंही निसर्गचित्रं चितारायचे. फिलीप त्याच्या भावाच्या कामात सहकार्य करायचा. फिलीप लहान असताना वडिलांच्या तोडीचं काम करायचा. वडिलांच्याच शैलीत काम करायचा.



एकदा त्याला लँडग्रेन ऑफ हॅस कासलसाठी आमंत्रण आलं. चार्ल्स पहिला यानं आमंत्रण दिलं होतं. चार्ल्सला फिलीपचं काम इतकं आवडलं की राजानं फिलीपला तगडी रक्कम देऊन रोमला चित्रकला शिकण्यासाठी पाठवलं. त्याच्या नियमित गरजेचासुद्धा खर्च उचलला आणि फिलीप रोम ला एका वेगळ्या कारणाने रोमला गेला. रोमला तो इटालियन पेंटर जियोकेंटो ब्रॅन्डी या चित्रकाराच्या हाताखाली काम करू लागला. कालांतरानं तो जियोकेंटोच्या मुलीच्या प्रेमात पडला. तिच्याशी विवाहबद्ध होण्याअगोदर कॅथलिक धर्म त्याने स्वीकारला.

फिलीप हा प्राणिप्रेमी होता. त्यानं त्याच्या मोठ्या घरात वेगवेगळी प्राणी पाळले होते. त्यांच्या जिवंत हालचालीवरून चित्रण करायचा. चित्रं त्यामुळेच जिवंत भासू लागत. त्याचे मित्र विनोदानं त्याच्या घराला 'नोहाचे आर्क' म्हणत. मोठमोठ्या आकारांत तो प्राण्यांची चित्रं रेखाटायचा. त्यामुळे त्याला फारच लवकर यश मिळत गेलं. त्याच्या चित्रशैलीमुळे तो उच्चभ्रू लाभलेल्या लोकांमध्ये आवडता बनत गेला. ग्रामीण जीवनाशी त्याची बांधिलकी असण्यामुळे ग्रामीण जीवनमान त्याच्या चित्रातून दिसू लागलं. गायी, मेंढ्या, घोडे, कुत्रे अशा विविध जातींचे प्राणी आणि मानवी व्यवहार याचं चित्र आयुष्यभर केलं. स्वप्नाळू निसर्गचित्राचं त्याच्या भव्य चित्रात वेगळेपण अधोरेखित होत असे. वेगवेगळ्या वनस्पती, टेकड्या, ग्रामीण घरकुल, असे घटक त्याच्या शांतरंगातून प्रकट व्हायचेत.

त्याचं प्राणिप्रेम इतकं पराकोटीचं होतं की एका माणसानं एका कुत्र्याला शिव्या दिल्या म्हणून त्यानं त्याला बेदम मारलं होतं. तो क्वचितच प्राण्यांचं मांस भक्षण करत असे. परंतु हाच फिलीप कुणालाही कुठल्याही किमतीत चित्रे काढून द्यायचा. तो अजिबात व्यवहारी नसल्यामुळे त्याची हळूहळू आर्थिक अवस्था बिकट होत गेली. त्यानं चित्रांची जणू फॅक्टरीच काढली होती. किमतीचा आलेख त्यामुळे घसरत गेला. हळूहळू आर्थिक दारिद्र्य वाढतच गेलं. अशाच वाईट परिस्थितीत त्याचा जर्मनीत १७०६ मध्ये मृत्यू झाला.



फिलीप पीटर रूस यांची कलाकृती

**– विजयराज बोधनकर**

vijayrajbodhankar1964@gmail.com



# किशोर जोथाडी

**प्रकाश दुधळकर**

**किशोर** जोथाडी यांच्याशी माझी ओळख केवळ योगायोगानेच झाली. साधारण १९९१-९२ साल असेल. मी नुकताच फोटोग्राफिक सोसायटीचा सभासद झालो होतो. पावसाळा शेवटच्या टप्प्यात होता. काही सीनियर संभासदांनी आऊटडोअर शूटिंगचा बेत आखला होता. त्यात मीही सामील झालो. शिरीष झवेरी, सॉयरस श्रॉफ, सुनील कपाडिया व इतर दोन सभासद सोबत होते. आम्ही कर्जतजवळील कोठिंबे गावाच्या परिसरात लँडस्केप फोटोग्राफीसाठी गेलो होतो. सर्वत्र सुंदर हिरवळ पसरली होती. प्रत्येक जण त्याच्या त्याच्या आवडीनुसार व वकुबानुसार फोटोग्राफी करत होता. तो काळ फिल्म फोटोग्राफीचा होता; त्यामुळे रिझल्ट तर नंतरच कळणार होते, पण विश्रांतीच्या वेळी किंवा निघताना फोटोग्राफीच्या संदर्भात ज्या गप्पा होत त्या माझ्यासारख्या नवीन लोकांसाठी फारच मार्गदर्शक असत. त्या चर्चांमध्ये भाग घेणाऱ्या दोन व्यक्तींनी माझे विशेष लक्ष वेधले ते होते, सुनील कपाडिया व किशोर जोथाडी. त्यांचे फोटोग्राफपण बघावयास मिळाले. ते सर्व हटके असायचे. आमची अधेमधे भेट होत होती व काहीतरी चांगले बघायला मिळत होते. जोथाडी यांच्या कामातील हटकेपणा अजून तसाच आहे व अजूनही त्यात भर पडतेच आहे.



किशोर जोथाडी

किशोर जोथाडी यांचा जन्म गोव्यातील मडगाव येथे १९४१ साली त्यांच्या आजोळी झाला. त्यांचे वडील त्यावेळी मुंबईला नोकरी करत होते. आईचे माहेर गोव्याचे असल्याने सुटीच्या दिवसांत त्यांचे गोव्याला जाणेयेणे चालू असायचे. त्यांचे वडील व मामा या दोघांनाही फोटोग्राफीची आवड होती. त्यांच्या घरी एक बॉक्स कॅमेरा होता. पण, त्यांच्या वडिलांनी या अद्‌भुत कलेबद्दल काही अधिक जाणून घेऊन त्यात काही विशेष काम केले नाही. किशोर आठ वर्षाचे असतानाच वडिलांनी त्यांना बॉक्स कॅमेरा हाताळायला दिला. तेव्हापासून त्यांचे फोटोग्राफीशी नाते जुळले. फोटोग्राफीबद्दल फारसे काही माहीत नसतानाही केवळ अंगभूत गुणांमुळे त्यांनी काढलेले फोटो चांगले येत व ते लोकांना आवडत. किशोर हे त्यांच्या आईवडिलांचे एकमेव अपत्य. आपला मुलगा अभ्यासात जास्त लक्ष न देता फोटोग्राफीसाठी वेळ वाया घालवतो असे वाटून त्यांच्या वडिलांनी त्यांना फोटोग्राफी करण्यापासून कधी परावृत्त केले नाही. फोटोग्राफीसाठी त्यांनी सदैव प्रोत्साहनच दिले. त्यावेळी ब्लॅक अँड व्हाइट फोटोग्राफीच उपलब्ध होती. त्यांनी विविध माध्यमातून माहिती उपलब्ध करून आपले फोटोग्राफीचे ज्ञान वाढवत नेले. १९५०च्या दशकात फोटोग्राफिक साहित्य खूपच स्वस्त होते, पण उत्पन्नदेखील तुटपुंजेच असायचे. त्यावेळी फोटोग्राफी शिकवणारी एखादी संस्था किंवा वर्ग असेल याची माहिती नसल्याने ते स्वतःच फोटोग्राफी शिकण्याचा प्रयत्न करत. सुरुवातीला ते फिल्मप्रक्रिया व छपाईसाठी काम बाहेर देत व त्यावर खर्चही बराच होत होता.

सन १९५८ मध्ये दैनिक पुढारी या वर्तमानपत्राने दिवाळी निमित्ताने फोटोग्राफीची स्पर्धा आयोजित केली होती. त्यांचे एक मामा कोल्हापूरला राहायचे. त्यांच्या मामेबहिणीला ही जाहिरात बघून किशोरच्या फोटोग्राफीच्या आवडीबाबत आठवण झाली. तिने लगेच किशोरला पत्र लिहून त्या स्पर्धेची माहिती दिली व फोटो पाठवण्यास सांगितले. पत्र पोहोचणे व त्यानंतर फोटो पाठवणे यासाठी जो कालावधी लागला तोपर्यंत फोटो सादर करण्याची वेळ निघून गेली होती. तरीपण त्यांच्या बहिणीने प्रयत्न करून त्यांचे फोटो स्पर्धेसाठी दाखल करून घेतले आणि नेमके त्यांच्याच फोटोला पहिले बक्षीस मिळाले. बक्षीस मिळाल्यामुळे किशोर यांचा उत्साह

वाढला व ते अधिकाधिक चांगले फोटो काढण्याचा प्रयत्न करू लागले. त्या काळी फोटोग्राफीची माहितीपत्रके व मासिके मोफत किंवा अल्प किमतीत उपलब्ध असत. जोथाडी यांचे शिक्षण मराठी माध्यमातून झाल्यामुळे व त्या काळी उपलब्ध असणारी फोटोग्राफीची माहितीपत्रके, मासिके इंग्रजीमध्ये असल्याने ते सर्व डोक्यावरून जात. त्यामुळे त्यातील केवळ चित्र पाहून त्याच प्रकारचे फोटो काढून बघण्याचा ते प्रयत्न करत.

त्या काळी फोटोग्राफी शिकवणारे वर्ग विशेष नव्हते. त्याच वेळी मुंबईत द फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया ही संस्था अस्तित्वात असली तरी त्यांना त्याबद्दल माहीत नव्हते. स्वत: फोटोग्राफी शिकण्याचा प्रयत्न करत असताना रोलमागून रोल वाया घालवले व बराच खर्च केला. तथापि, त्यांच्या पालकांनी कधीही व्यर्थ टीका केली नाही किंवा फोटोग्राफीपेक्षा जास्त लक्ष अभ्यासावर लक्ष केंद्रित करा असे सांगून त्यांची छायाचित्रणातील आवड कमी करण्याचाही प्रयत्न केला नाही. आपण मागे वळून पाहतो तेव्हा त्या वेळेची परिस्थिती पाहता आश्चर्य वाटते, की पालकांनी त्यांना मनाई केली असती तर आपण एका चांगल्या फोटोग्राफरला मुकलो असतो. आज त्यांना केवळ भारतीयच नाही तर परदेशी छायाचित्रस्पर्धा आणि प्रदर्शनांसाठी ज्युरी म्हणून आमंत्रित करण्यात येते.



Early Bird



I have miles to go

त्यांच्या मामाने १९६२ मध्ये त्यांना सांगितले, की एक खूप चांगले छायाचित्रकार एम.व्ही. विजयकर यांना ते ओळखतात आणि त्यांना ते त्यांच्या खारच्या घरी भेटायला घेऊन गेले. त्यांनी त्यांच्या काही प्रिंट आपल्यासोबत नेल्या होत्या. एका हसतमुख चेहऱ्याच्या विनम्र छायाचित्रकाराच्या समोरासमोर भेटीदरम्यान त्यांच्या लक्षात आले की तो त्यांच्यासाठी एक चांगला मार्गदर्शक होऊ शकेल. विजयकर यांनी जोथाडी



**In the company of cloud**

रसायनशास्त्राचे विद्यार्थी असल्याने, फिल्म कार्टनमध्ये किंवा मोठ्या आकाराच्या कागदाच्या पाकिटांमध्ये मिळणाऱ्या छोट्या पत्रकांमध्ये दिलेल्या सूत्रांच्या आधारे वेगवेगळे डेव्हलपर तयार करायचे आणि त्यावर प्रयोग करायचे. हळूहळू त्यांनी रंगीत छायाचित्रण क्षेत्रातदेखील प्रवेश केला. व्यावसायिक प्रयोगशाळांनी दिलेले काम न आवडल्याने त्यांनी Meopta कलर एन्लार्जर विकत घेतला आणि कलर प्रिंटिंग शिकले. या संदर्भात त्यांचे दुसरे गुरू स्वर्गीय शरद देव्हारे यांनी केवळ तंत्रच शिकवलेच नाही तर दादर येथील स्वस्तिक प्रयोगशाळेतून कलर पेपर, डेव्हलपर, ब्लीच आणि कलर प्रिंटिंग पेपरचे छोटे छोटे तुकडे मिळण्याची व्यवस्थाही केली. तोपर्यंत देव्हारे हे महाबळेश्वरला गेले होते व त्यांनी तिथेच स्थाइक होण्याचे ठरविले. त्यावेळी मोबाइल फोनसारख्या सुविधा नसल्यामुळे आलेल्या अडचणी सोडवण्यासाठी ते प्रिंटिंगच्या सत्रादरम्यान देव्हारे यांना ट्रंककॉल करायचे आणि देव्हारेदेखील त्यांना फोनवरच उपाय सुचवायचे. कृष्णधवल प्रिंटच्या अगदी विरुद्ध, रंगीत प्रिंटसाठी पूर्ण अंधार आवश्यक आहे. तेथे लाल किंवा केशरी रंगाच्या सुरक्षित प्रकाशात काम करता येत नाही. म्हणून रात्री आठच्या सुमारास रंगीत प्रिंट डेव्हलप करण्याचे सत्र सुरू करावे लागायचे. बाहेर पूर्णपणे अंधार झाल्यानंतरच सुरू होऊन पहाटे चारपर्यंत ते चालू असे. त्यामुळे देव्हारे यांना बरेचसे फोन मध्यरात्रीच्या सुमारास असायचे पण या कामाच्या वेळापत्रकाची त्यांना जाणीव असल्याने त्यांनी कधी नाराजीचा शब्द उच्चारला नाही.

यांच्या त्या प्रिंट पाहून त्यांना फोटोग्राफीबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी फोटोग्राफिक सोसायटीचे सभासद होण्याचा सल्ला दिला. जोथाडी लगेच त्या संस्थेचे सभासद झाले आणि तेव्हापासून त्यांची फोटोग्राफीमध्ये खरी प्रगती सुरू झाली असे म्हणायला हवे. फणीबुंडा, डॉ. सदाशिवन, वामन ठाकोर यांसारखे ज्येष्ठ सदस्य त्यावेळी सोसायटीमध्ये कार्यरत होते आणि विजयकर तर होतेच. विजयकर हे इंडियन टेलिग्राफमध्ये नोकरीस होते. ऑफिस सुटले की ते सरळ फोटोग्राफिक सोसायटीत येत. ते होतकरू आणि नवीन सदस्यांना त्यांच्या चित्रांचे विश्लेषण करण्यात, दोष आणि उणिवा निदर्शनास आणून अधिक सुधारणा करण्यासाठी मदत करत. चित्राचे कंपोझिशन इत्यादीबद्दल हातचे काहीही राखून न ठेवता सखोल ज्ञान देत.

सुरुवातीला जोथाडी यांना, आपण काढलेले फोटो लोकांना आवडतात हे बघून स्वत:बद्दल अभिमान वाटत होता. फोटोग्राफिक सोसायटीमध्ये अनेक सभासद येत त्यांचे फोटो बघताना त्यांना जाणवले की यांच्या तुलनेत आपण कुठेच नाही. दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी होणाऱ्या मासिक स्पर्धा तसेच जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये होणारी प्रदर्शने इत्यादींना ते हमखास हजर राहायचे. कलात्मक फोटोग्राफी काय असते ते त्यांना इथे जाऊनच कळले. जुन्या सभासदांकडून मिळणाऱ्या मार्गदर्शनामुळे त्यांच्या फोटोग्राफीमध्ये खूप सुधारणा झाली आणि विविध फोटोग्राफिक स्पर्धांमध्ये त्यांना पुरस्कारही मिळू लागले. PSI मध्ये त्यांना अनेक नामवंत छायाचित्रकार भेटले. त्यांच्याकडून अधिकाधिक जाणून घेण्यासाठी त्यांचा सतत पाठपुरावा केला. आपल्या ब्लॅक अँड व्हाइट प्रिंटना इतर अनुभवी कलाकारांच्या स्पर्धेत उभे राहायचे असेल तर व्यावसायिक प्रयोगशाळांवर अवलंबून राहता येणार नाही म्हणून ते ब्लॅक अँड व्हाइट प्रक्रिया आणि फोटो प्रिंटिंग शिकले. ते

जोथाडी यांनी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना एका नामांकित जर्मन बहुराष्ट्रीय कंपनीत मार्केटिंग विभागात नोकरी मिळाली. त्या कंपनीत त्यांनी निवृत्त होईपर्यंत बत्तीस वर्षे विविध विभागांत काम केले. या कंपनीत काम करताना एक अनमोल भेट त्यांच्या जर्मन नियोक्त्यांकडून मिळाली. त्यांच्या डायरेक्टरांना फोटोग्राफीमध्ये खूप रस होता आणि त्यांनी जोथाडी यांच्यासाठी जर्मनीहून एक श्रायडर एनलार्जिंग लेन्स आणली. त्या काळची ती सर्वोत्कृष्ट लेन्स होती. त्या काळी भारतात काही विशेष रंगीत रोलवर प्रक्रिया करणाऱ्या प्रयोगशाळा उपलब्ध नव्हत्या. कंपनीच्या डायरेक्टरना कंपनीच्या कामासाठी दर महिन्यात जर्मनीला जावे लागे. जाताना जोथाडी यांचे रंगीत रोलदेखील ते सोबत नेत व प्रक्रिया करून आणत. तसेच जर्मनीतून येणाऱ्या पाहुण्यांशी जोथाडी यांचा परिचय करून देत व त्यांच्या फोटोग्राफीबद्दलदेखील माहिती देत. ते आवर्जून जोथाडी यांचे फोटो बघत. साहजिकच येणाऱ्या

पाहुण्यांसोबत फोटोग्राफीवर चर्चा होत व नवनवीन माहितीची भर पडे.

कलर तसेच ब्लॅक अँड व्हाइट फोटोग्राफीसाठी जोथाडी यांचे आवडते विषय म्हणजे लँडस्केप, आर्किटेक्चर आणि अॅब्स्ट्रॅक्ट. त्यांचे पहिले प्रेम ब्लॅक अँड व्हाइट फोटोग्राफी आहे. ते म्हणतात, कलेचे शुद्ध स्वरूप म्हणूनच मी फोटोग्राफीकडे प्रेमाने पाहिले आहे. आर्थिक लाभ मिळवण्याचे साधन म्हणून मी याकडे कधीही पाहिले नाही. तथापि, आता ते त्यांचे फोटो काही नामांकित परदेशी स्टॉक एजन्सींना सादर करतात.

त्यांना आतापर्यंत भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय फोटोग्राफिक सलूनमध्ये सातशेहून अधिक स्वीकार आणि पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना १९९१ मध्ये द फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेची (PSI) असोसिएटशिप मिळाली. आणि २०११ मध्ये त्याच संस्थेचे मानद सदस्यत्व (Hon. PSI) देऊन सन्मानित करण्यात आले. २०१३ मध्ये त्यांनी टॅमरान कंपनीने आयोजित केलेल्या देशांतर्गत स्पर्धेत भाग घेऊन ती स्पर्धा जिंकली आणि बक्षीस म्हणून त्यांना Tamron लेन्स मिळाली.


ते सध्या ही अद्‌भुत कला शिकण्यास उत्सुक असलेल्या तरुण फोटोप्रेमींना फोटोग्राफी शिकवतात आणि मार्गदर्शन करतात. त्यांच्या सुरुवातीच्या काळात योग्य मार्गदर्शनाअभावी त्यांना कसा संघर्ष करावा लागला होता याची जाणीव असल्याने तरुण मित्रांना जमेल तशी मदत करून त्यांचे जीवन सोपे बनवण्याचा प्रयत्न करतात.

सुरुवातीच्या काळात त्यांना ओळखीच्या लोकांकडून लग्नाच्या फोटोग्राफीच्या असाइनमेंट मिळायच्या. हातात थोडीशी रक्कम पडली की रोमांचित व्हायचे. परंतु त्यांना समजले की लोक लग्नाच्या छायाचित्रकारांचा फारसा आदर करत नाहीत. किंबहुना, ते केटरर, आइसक्रीम सप्लायर इत्यादींच्या पातळीवर मानले जातात. कदाचित आता चित्र बदलले असेल. त्यांना या प्रवासात मित्तर बेदी, गौतम राजाध्यक्ष, राया प्रभू यांसारखे अनेक प्रतिष्ठित, उच्च प्रोफाइल छायाचित्रकार आणि प्रसिद्ध प्रकाशने आणि मासिकांचे संपादक भेटले. ज्यांची मैत्री त्यांच्या जीवनात एक प्रमुख घटक ठरली. त्यांच्या जडणघडणीत मित्तर बेदी यांच्या मैत्रीला विशेष महत्त्व आहे. सदैव प्रोत्साहन देणारा व मदतीसाठी तत्पर असा अत्यंत मोठ्या मनाचा माणूस असे ते त्यांचे वर्णन करतात.

चांगल्या फोटोबद्दल त्यांचे असे मत आहे, की कलात्मक फोटोग्राफीच्या नियमांचे नीट पालन करून चित्रविषय, कंपोजिंग आणि प्रकाशाचे भान ठेवून केलेला फोटो नक्कीच प्रेक्षकाचे लक्ष वेधून घेतो. या क्षेत्रात नव्याने येणाऱ्यांना त्यांचा असा सल्ला आहे की तुम्ही भारतातले नामांकित फोटोग्राफर असल्याशिवाय केवळ फोटोग्राफीवर उपजीविका करणे व टिकून राहणे फार कठीण आहे. या क्षेत्रात आर्थिक लाभ, व्याप्ती आणि संधी खूप मर्यादित आहेत. त्यामुळे प्रथम चांगली शैक्षणिक पात्रता मिळवून स्थिर नोकरी किंवा व्यवसाय करावा आणि त्यानंतर दुसऱ्या उत्पन्नाचा स्रोत म्हणून छायाचित्रणाचा अवलंब करावा. त्याने तुम्हाला आर्थिक स्थैर्य मिळू शकते आणि तुम्ही कोणत्याही चिंता किंवा तणावाशिवाय तुमची आवडदेखील जोपासू शकता.

**– प्रकाश दुधळकर**
माजी कोषाध्यक्ष, फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया
dudhalkar@gmail.com

ग्रंथाली




**लोकमान्य टिळक**

**एक चिकित्सक अभ्यास**


संकलन
**माधव राजवाडे**

लोकमान्य टिळक स्मृतिशताब्दीवर्षानिमित्त
आयोजित डिजिटल व्याख्यानमालेतील
भाषणांचे संकलन

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

**माझी कॉर्पोरेट दिंडी**

**माधव जोशी**




लेखकाची जडणघडण आणि संस्कार,
बहुराष्ट्रीय कंपन्यांची कार्यसंस्कृती ह्याचं
मनोहारी चित्रण

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

## प्रकाशन वृत्तांत

### मेघना साने यांचे 'मराठी सातासमुद्रापार' पुस्तक प्रकाशित

ग्रंथाली प्रकाशित मेघना साने यांच्या 'मराठी सातासमुद्रापार' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार, संपादक डॉ. उदय निरगुडकर यांच्या हस्ते ठाणे येथे करण्यात आले. त्या प्रसंगी पाहुणे म्हणून माजी माहिती संचालक देवेंद्र भुजबळ आणि सुप्रसिद्ध कवयित्री प्रा. प्रतिभा सराफ उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना डॉ. उदय निरगुडकर यांनी या पुस्तकावर आपले विचार मांडले. ते म्हणाले, 'साने यांनी मराठी भाषा आणि संस्कृती जपणाऱ्या कुंपणापलीकडच्या मराठी व्यक्तींची ओळख यात करून दिलीय. विदेशात जाऊन मराठी माणसं टिकून उभी राहिली आणि नांदताहेत. मराठी भाषेचा आणि संस्कृतीचा प्रसार आणि जातन ते करताहेत. अशा परदेशातील मराठी व्यक्तीचं मराठीच्या कार्याबद्दलचे हे पहिलं पुस्तक. जे पाहिलं ते सांगण्याची कळकळ यातून दिसते.' ते पुढे म्हणाले, यातील व्यक्ती, घटना, चळवळ आणि मंडळं यांची ओळख याचा पाया मराठी भाषा हाच आहे. भाषा आपुलकी जपते. आपल्या भाषेत सांगणं ही सांस्कृतिक ओळख होय. नवनिर्मितीची प्रेरणा मातृभाषेतूनच मिळते म्हणून मराठी भाषा टिकली पाहिजे. संवेदनांचे पूल बांधण्याचं काम आपल्याला मराठी भाषेतून करायला हवं. 'मराठी सातासमुद्रापार' या पुस्तकानं केलं आहे.




**मराठी सातामुद्रापार**

**मेघना साने**

**मूल्य २०० रु.**

**सवलतीत १२० रु.**


कवयित्री प्रा. प्रतिभा सराफ यांनी पुस्तकावर अभ्यासपूर्ण विवेचन करताना म्हटले, की या पुस्तकानं कर्तृत्ववान मराठी व्यक्ती आपल्यापर्यंत पोहोचवल्या आहेत. त्यांच्या मराठी भाषा, गीत, संगीत, कला आणि कार्य तसंच वृत्तीतील बारकावे यात टिपले आहेत. या सकारात्मक लेखांतून मेघना साने यांची परदेशातील मराठी व्यक्तींबद्धलची जाण, चौफेर ज्ञान यांची जाणीव होते. तर देवेंद्र भुजबळ यांनी, मराठी कर्तृत्ववान व्यक्ती पुढे चालल्या आहेत. परदेशात त्यांनी आपलं नाव आणि मराठी भाषा जपली आहे, त्या व्यक्तिमत्त्वांची गुंफण या पुस्तकात केली आहे. त्यातून आपल्यात आत्मविश्वास निर्माण होतो. ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर प्रास्ताविक केले. स्नेहा आघारकर यांनी कार्यक्रमाचं नेटकं सूत्रसंचालन केलं. ●

---

### सुप्रसिद्ध अभिनेते अशोक सराफ यांची ठाणे येथे संस्मरणीय मुलाखत

सोमवार १८ जुलै २०२२ रोजी ठाणे येथे मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात सुप्रसिद्ध अभिनेते अशोक सराफ यांची मुलाखत झाली. अशोक सराफ यांच्या अमृतमहोत्सवी वर्षातील पदार्पणानिमित्त आणि 'मी बहुरूपी' या त्यांच्या ग्रंथालीद्वारा प्रकाशित आठवणींच्या पुस्तक प्रकाशनाचे औचित्य साधून मराठी ग्रंथ संग्रहालय–ठाणे, अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद–ठाणे शाखा, ग्रंथाली प्रकाशन आणि स्वा. वि. दा. सावरकर प्रतिष्ठान–ठाणे या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित केला होता. सुप्रसिद्ध अभिनेते विघ्नेश जोशी यांनी ही मुलाखत अतिशय रंजकतेने आणि जिव्हाळ्याने घेतली.

मुलाखतीदरम्यान अशोक सराफ यांनी आपल्या रंगभूमीवरील पदार्पणामागची पार्श्वभूमी, आपले मामा व गुरू सुप्रसिद्ध नटवर्य व नाट्यनिर्माते गोपीनाथ सरकार यांच्याकडून शिकलेल्या गोष्टी, भारतीय स्टेट बँकेतील नोकरी व नाटकातील कामे ही कसरत करताना उडलेली तारांबळ, चित्रपटांमधील कारकीर्द, छोट्या पडद्यावरील अनुभव अशा अनेक आठवणी सांगितल्या. यावेळी विघ्नेश जोशी यांनी विनंती केल्यावर त्यांनी कोट घालून 'गुपचूप गुपचूप' या चित्रपटातील वेंधळ्या प्राध्यापकाच्या भूमिकेची झलक रसिकांसमोर सादर केली.




**मी बहुरूपी**

**अशोक सराफ**

**मूल्य ६०० रु.**

**सवलतीत ३५० रु.**


रंगमंचावर भूमिका साकारण्याच्या आवडीमुळे अंगात उपजतच असलेल्या तबलावादनाकडे दुर्लक्ष झाल्याचे अशोक सराफ यांनी मुलाखतीच्या ओघात सांगताच विघ्नेश जोशी यांनी ठाणेकर रसिकांना तुमचे तबलावादन ऐकायला आवडेल असे सांगून तबला–डग्गा त्यांच्यासमोर मांडला. अशोक सराफ यांनीही आढेवेढे न घेता विघ्नेश जोशी यांनी पेटीवर वाजवलेल्या मंदारमाला नाटकातील 'जय शंकरा गंगाधरा' या नाट्यगीताला बहारदार अशी तबलासाथ केली. प्रास्ताविक 'ग्रंथाली'च्या वतीने सुदेश हिंगलासपूरकर तर ग्रंथसंग्रहालयाच्या वतीने विद्याधर ठाणेकर यांनी केले. सूत्रसंचालन वृंदा दाभोळकर यांनी केले. ●




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**

**जिवलग जिवाचे**
**नंदा भटमुळे**




**यथा काष्ठम् च काष्ठम्**

*‘‘खरं म्हणजे माणसाच्या हातात काही आहे, असं मला अजिबात वाटत नाही. नियतीच त्यांना खेळवत असते. नाहीतर आपल्याच माणसांची मनं दुखावण्याचं काम माणूस काय म्हणून करत असतो? एकमेकांवर जिवापाड प्रेम करणारी माणसं स्वत:चं मन सांगेल तसंच वागतात, असं का?’’*

‘जिवलग जिवाचे’ ही बृहद्‌कादंबरी वाचत असताना एक सूत्र आपल्याला घट्ट बिलगून असलेले जाणवत राहते. ते सूत्र आहे, ‘यथा काष्ठम् च काष्ठम्’. लाकडाचे ओंडके प्रवाहात पडल्यानंतर प्रवाहाचे त्यांच्यावर नियंत्रण असते. कधी जवळ येणे, संगतीने राहणे. पुन्हा एकमेकांपासून विलग होणे. प्रवास सुरू असतो प्रवाहाच्या सोबतीने मात्र जवळ येणे व दूर जाणे ही नियती ठरते. हे सूत्र केवळ आणि केवळ कुणा एका कुटुंबापुरते मर्यादित राहत नाही. ते वैश्विक रूप धारण केलेले सूत्र आहे आणि ते त्रिकाल कायम राहणारे आहे.

प्रस्तुत कादंबरी बृहद् म्हणण्याचे कारण तिचा आवाका आणि आकारमान. साडेपाचशे पानांची ही कादंबरी आहे. तिच्यात राघव–मीना, जय, जाई, राघवचे बाबा आणि आई, हे एक कुटुंब केंद्रस्थानी आहे. परंतु त्यांचा गोतावळा हा एखाद्या वृक्षाच्या फांद्याप्रमाणे पसरलेला आहे. हा गोतावळा शेजारी, मित्र, आप्त यांचा असतोच, परंतु तो जोडला जाण्यासाठी आवश्यक असतो तो ठायी असणारा प्रेमळ स्नेहभाव, आपुलकी, आदर, उदात्त मन, यामुळेच एक प्रेमळ, मधाळ मधाचे पोळे तयार होते. ज्यांच्या ठायी असे सद्‌गुण आहेत, त्यांच्यासाठी माणसांची कधी वानवा नसते, ते सर्व गुण अंगी असलेल्या या कुटुंबाचा जीवनपट या कादंबरीत उलगडलेला आहे.

अलीकडील काळात अमेरिका ही सोन्याची लंका ठरलेली आहे. अनेक कारणांसाठी कधीकाळी जिवाचा आटापिटा केल्यानंतर दर्शन देणारी अमेरिका आता मुंबई–दिल्लीसारखी जवळ आली आहे. शिक्षण आणि त्यानंतर करिअर याचे डेस्टिनेशन म्हणजे अमेरिका. एकदा अमेरिकेत पाय ठेवला की त्या पावलांच्या मागे पाऊलखुणा हळूहळू पुसट होत जातात. कधीतरी कारणाकारणांच्या निमित्ताने भारतात येणेजाणे हे पाहुण्यांसारखे ठरते. त्यामुळे मागे मातीची ओढ आणि वयाची कारणे सांगत घरादाराला बिलगून वसलेले आईबाप संध्याछायेच्या स्वरूपात दिसू लागतात. हे चित्रही आता नवीन राहिलेले नाही. यात महत्त्वाचा मुद्दा ठरतो तो अपरिहार्यतेचा. ती अपरिहार्यता टाळली जाऊ शकते, तशी ताणलीही जाऊ शकते. त्यालाच निर्माण होते, ‘यथा काष्ठम् च काष्ठम्!’

प्रस्तुत कादंबरी हे अंतर अधोरेखित करते. त्याचवेळी अमेरिकेत गेलेली माणसे अमेरिकन सिटीझनशिपचे कवच मिरवत असली तरी त्यांची भारताविषयीची, तिथल्या आप्ताविषयींची ओढ कमी झालेली नसते. इतकेच नव्हे तर भारतात असलेले संस्कार, परंपरा, समजुती यांना तडा जाऊ न देता, त्यांचे पालन करण्यात ही मंडळी कमीपणा न दाखवता पुढाकार घेताना दिसतात. पारंपरिक लग्नसोहळा, माप ओलांडून गृहप्रवेश, डोहाळे, जन्मोत्सव, बारसे, यात्रा, देवदर्शन, मावंदे, श्राद्ध, पिंडदान असे संस्कार आणि सोहळे श्रद्धेने पार पाडण्यात या कादंबरीतील व्यक्तिरेखा हौसेने सरसावलेले आहेत. अमेरिका कर्मभूमी आहे तशी भारतभूमीही आहे. या भूमीत वावरताना इथला निसर्ग, तीर्थक्षेत्रे जशी सुंदर आणि पवित्र आहे, तशी इथली नातीही आहेत, यावर लेखिकेने मनापासून प्रेम केलेले आहे, त्याचा प्रत्यय ही कादंबरी देते.

कादंबरीत अनेक व्यक्तिरेखा येतात, तेव्हा त्यांना एकरूप ठेवण्याचे, त्यांच्यातला समतोल सांभाळण्याचे मोठे आव्हान लेखकासमोर असते. दोन संस्कृती भिन्न आहेत, त्यांच्यातले वेगळेपण दाखवताना कुणावर अन्याय होणार नाही, याचीही खबरदारी घ्यावी लागते. लेखिकेने निवडलेली निवेदनशैलीही प्रथमपुरुषी आहे. जाई, नीता, परेश, जय, आजोबा अशा व्यक्तिरेखा त्यांच्या मुखातून निवेदन करतात. त्यामुळे प्रत्येकाचे मनोगत हे स्वगताप्रमाणे आहे. त्यातून भावभावना, संवेदना, मनाचा मोकळेपणा सुंदरपणे व्यक्त झालेला दिसून येतो. संवादकौशल्य हे या कादंबरीचे खास वैशिष्ट्य म्हणावे लागेल. संवादातून श्रेष्ठ कादंबरीचा वेग लक्षात येतो असे नाही तर आपसातल्या संवादामधील आवेगही लक्ष वेधून ठरतो. ‘आईची माया कधी कमी होत नाही की मैत्रिणींचं प्रेम कधी सामान आवरल्यासारखं आवरून घेता येत नाही.’ ‘कोण कुणाला जन्माला पुरलं आहे का कधी? जितका ज्याचा सहवास मिळाला तोच स्वीकारायचा आणि तेच भाग्य समजायचं.’ यासारखी जीवनतत्त्वज्ञान सांगणारी वाक्ये जीवनाकडे पाहण्याची पारदर्शक दृष्टी बहाल करतात, लेखिकेच्या समृद्धपणाची साक्ष देतात. परदेशप्रवास आणि वास्तव्य याचे अनुभवविश्व त्यांच्या लेखनातून व्यक्त झालेले आहे, त्यामागे त्यांची अवलोकनपरिपक्वता किती तरल आहे, याचा अनुभव ही कादंबरी देते. ‘जनरेशन गॅप’ व ‘दहा दिवसांचा पाहुणा’ हे दोन कथासंग्रह त्यांचे प्रकाशित आहेत. नात्यांचा सुंदर गोफ असलेली ही कादंबरी मनाचे प्रसन्नपणही जपणारी आहे. डॉ. प्रकाश लोथे यांची सुंदर प्रस्तावना या कादंबरीला लाभलेली आहे.

सतीश भावसार यांनी कादंबरीचे शीर्षक आणि आशय यांना समृद्ध करणारे मुखपृष्ठ सुंदर रीतीने सजवलेले आहे.

**मूल्य ६०० रुपये सवलतीत ३५० रुपये**




# ग्रंथपान

**हसायदान**

**डॉ. प्रकाश लोथे**




**मनमुक्त निर्मळ लेखन**

*''स्वतःचा संसार, स्वतःचे घर, स्वतःची बाग असावी ही मूलभूत वासना स्त्रियांमध्ये फार प्रबळ असते. हे सगळे करायला मनुष्यबळ लागते. नवरा हा त्याचाच एक भाग. नवऱ्याला घेऊन फिरायला जाणे कुत्र्याला नेण्यापेक्षा केव्हाही सोपे असते. झालेच तर नवऱ्याकरता प्रत्येक फायर हायड्रंटपाशी व प्रत्येक झाडापाशी थांबावे लागत नाही हे वेगळेच. भारतीय नवरे सोडले तर इतर बहुतेक नवरे उत्तम हॅन्डीमॅनसुद्धा असतात.''*

'हसायदान' हा नवा कथा कम् लेखसंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. लेखक डॉ. प्रकाश लोते यांची 'धर्मधुरीण' ही कादंबरी आपण वाचली आहे. राज्यशासनाचा पुरस्कार आणि मुंबई मराठी संघ यांचे बक्षीस लाभलेली ही कादंबरी तिच्या कथानकासोबत लेखकाच्या सुंदर शैलीमुळे वाचकांच्या पसंतीला उतरली होती. डॉ. प्रकाश लोथे यांची भाषाशैली प्रसन्न आणि उत्स्फूर्ततेचा झरा वाटावा अशी सहज प्रवाही आहे. तिचा अनुभव या कादंबरीने दिलाच तसा 'हास्यरेखा' या कथासंग्रहाने त्यांच्यातला विनोदीशैलीचा परिचय करून दिला होता. तोच अनुभव देणारा संग्रह आहे 'हसायदान'. शीर्षकावरून त्याची कल्पना येते. 'वाटचाल', 'पुरुषांना शिंगे असतात', 'काचेच्या भिंती' असा त्यांचा नाट्यप्रवास आहे. प्रा. राम शेवाळकर आणि दिलीप प्रभावळकर यांनी त्यांच्या मुरलेल्या विनोदीशैलीची खास दखल घेऊन सन्मानित केलेले आहे. ती कौतुकाची थाप यथार्थ असल्याची ग्वाही 'हसायदान' हा संग्रह देतो.

डॉ. प्रकाश लोथे हे व्यवसायाने डॉक्टर आहेत, तेही अमेरिकेत. त्यामुळे भारत व अमेरिका असा प्रचंड भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि व्यावहारिक परीघ त्यांनी पाहिलेला, अनुभवलेला आहे. त्याचे प्रतिबिंब 'हसायदान'मध्ये नितळपणे उमटलेले आहे.

कुठलाही लेख, हा साधारणतः शब्दमर्यादेच्या चौकटीत बसवलेला असतो. तसा बसवताना लेखकाला आपले उद्दिष्ट नेमकेपणाने मांडण्याची कसरत करणे अपरिहार्य ठरते. इथे लेखकाला कुठलीही कसरत करण्याची धडपड करावी लागलेली नाही, वा त्यासाठी कुठली तडजोडही स्वीकरावी लागलेली नाही. याचे कारण हे लेख स्वतंत्र, मुक्त आणि बंधनाच्या चौकटीपासून दूर आहेत. आपण एखादा अनुभव ऐकतो आहोत असा, तर कधी एखादा शोधनिबंध वाचतो आहोत, असा या लेखांचा थाट आहे. मध्येच वाचकांशी थेट संवाद साधलेला दिसून येतो. हे सारे ओघात सहजपणे त्या लेखांच्या प्रकृतीशी जुळणारे आहे. आपण काही उदाहरणे पाहूया; वूमन नीड्स हजबंड लाइक ए फिश नीड्स बायसिकल – हे एका सुप्रसिद्ध कु. ग्लोरिया स्टायनम यांचे विधान. याला अनुसरून आलेल्या लेखात – सायकल चालवणाऱ्या मासळ्या – स्त्रियांना पुरुष नवरा म्हणून का हवा असतो, त्याचे निष्कर्ष लेखकाने समोर ठेवलेले आहेत. मूषकगंड, खिसेगंड, संधिवातगंड, परिहारवृत्ती, नृत्यगंड आणि पंचिंग बॅगगंड हे ते निष्कर्ष, ज्यातून नवऱ्याचे स्थान सिद्ध होते; 'पेस्ट कंट्रोलवाल्यापेक्षा नवरा केव्हाही स्वस्त आणि मस्त', 'नवरा म्हणजे हक्काचा खिसा', 'नवरा हा म्हातारपणाची काठी असतो'.

'भारतीय पुरुष स्त्रियांकडे टक लावून का बघतात?'चा लेखातही लेखकाने केलेले संशोधन गंमतीशीर तरी खात्रीलायक असल्याची खात्री देणारे आहे. यावर उपाय काय करायला हवा, याच्या मुळाशी गेल्यानंतर लेखकच लिहितात, 'भगिनींनो, तुमच्याकडे कोणी ढुंकूनही पाहणार नाही याची मी खात्री देतो. पण असे काही झालेच तर तुम्हालाच चुकल्याचुकल्यासारखे वाटेल, होय की नाही?'

आधुनिक तंत्रज्ञानाने घेतलेली झेप थक्क करणारी आहे. डिजिटल युग अवतरले आणि सगळे जग बोटाच्या टिचकीवर आले. अलेक्सा आली, टाइम मॅनेजमेंट कन्सेप्ट आली. लग्नात रिमोट कंट्रोलने सुरू होणारी आणि बंद होणारी यज्ञकुंडे आली. या आधुनिक तंत्रज्ञानाचा अतिरेक लेखांमधून उघड केलेला आहे.

या संग्रहात पंचवीस लेख आणि तीन कथा आहेत. यांतून अनेक व्यक्तिरेखा आपल्यासमोर येतात. 'कलंदर'मधील उत्तरवार मास्तर, 'चिंगी'मधील कुसुम, 'मामा'मधील विनायक आपल्या मनाचा थेट ठाव घेतात. लेखक त्यांच्या बाह्य वर्णनाइतकेच आंतरिक वर्णन समरसून करतात. प्रत्येकाचे वागणे, बोलणे, रूप, अंतरंग वेगवेगळे असते, त्यांचा वेध घेणे वाटते तितके सोपे नसते. लेखक त्यांच्यातले माणूसपण आपल्या शैलीने मांडतात. अर्थात त्यासाठी माणूस वाचावा लागतो. त्याच्या जगण्याच्या दोन्ही बाजू, स्वभाववैशिष्ट्ये समजावून घ्यावी लागतात. आवश्यक त्या ठिकाणी खात्रीशीर संदर्भांची पेरणी करावी लागते. लेखकाकडे हे गुण आहेत. ग्रामीण भाग, तिथला सगळा माहोल, शहरी भाग, सिनेमा, साहित्य, राजकारण असा चौफेर संचार असलेले लेखन, लेखकाच्या समर्थ लेखणीतून उतरले आहे. असे विविध विषयांना प्रसन्न शैलीत गुंफलेले लेखन खूप काळानंतर वाचायला मिळाले. विषयात नावीन्य असेल आणि ते नेमकेपणाने ओघवत्या शैलीत आले असले तर वाचक त्याचे मनापासून स्वागत करतो. हसायदानचे स्वागत 'धर्मधुरीण'सारखेच होईल असा विश्वास वाटतो.

साहित्यातील नावीन्यपूर्ण अभिरुचीचा सातत्याने शोध घेणारे ग्रंथालीचे संस्थापक दिनकर गांगल यांची सुंदर प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. ते लिहितात, 'कमाल वाटते ती त्यांच्या संदर्भविपुलतेची. त्यामधून लोथे यांची प्रगल्भता जाणवते आणि त्यांचे विचारविश्व केवढे व्यापक व सखोल असेल असे मनात येते. मनुष्यजीवनाची एवढी तपशीलवार जाण असलेला सूक्ष्म निरीक्षणशक्तीचा लेखकच उत्तम दर्जाचे विनोदी व संवेदनाक्षम साहित्य लिहू शकतो.'


लेखांसाठी खास रेखाचित्रे काढून त्यांना सजवलेले आहे. त्याचप्रमाणे मुखपृष्ठावर सुंदर आशयसंपन्न सजावट केलेली आहे. ही चित्रे व सजावट चित्रकार सतीश भावसार यांची आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**



# ग्रंथपान

**अरिंदम**
**डॉ. निर्मोही फडके**




**अभ्यासयुक्त आणि अभ्यासउपयुक्त लेखन**

*''एका समुद्रापासून, दुसऱ्या समुद्रावरून, तिसऱ्या समुद्राकडे असा झालेला त्या तेजोनिधीचा दिवसभराचा प्रवास संपूर्ण अनुभवला नि तृप्त होऊनही ओढ लागून राहण्याची 'अवस्था' प्राप्त झाली. एक लसलसता लोहगोल नि दुसरा खळाळता नीलोत्पल. भारतभूच्या शेवटच्या टोकावर उभं राहून तुझ्यासह प्रकाशाच्या ह्या उत्सवाची साक्षीदार झाले, तेव्हा मन गात होतं...*

*''तू सूर्याचे तेज, उदधिचे गांभीर्यही तूची... स्वतंत्रते भगवती...''*

ललित लेखनात विषयाला बंधने नसतात तशी त्याच्या शैलीचीही अपेक्षा फारशी बाळगली जात नाही. किंबहुना शैलीकडे अधिक बारकाईने लक्ष देण्याची गरज नाही. असाच अलीकडील ललित लेख लिहिणाऱ्या लेखकांचा समज झालेला दिसतो. ही बाब मुक्तछंदातील कविताबाबत तर लक्षात येतेच. तीच अवस्था लेख लिहिणाऱ्याच्या बाबतीत दिसून येत आहे. त्याचे परिणाम काय होतात, हेच बहुतेक लेखकांना माहीत नसावेत किंवा त्याबाबतीत ते बेफिकीर असावेत. 'अरिंदम' हा लेखसंग्रह याला अपवाद म्हणावा लागेल. नव्हे तो आहेच. ललित लेख लिहिताना शैली तर असावी लागतेच, त्याचसोबत अभ्यास, संदर्भांची चपखल योजना, त्याच्या भाषेचे सौष्ठव आणि त्यात असलेले घट्ट विणीचे सूत्र, यांचे चोख भान असलेले लेखन म्हणजे 'अरिंदम'!

'अरिंदम' या संग्रहात एकूण पंधरा लेख आहेत. हे सर्व लेख पूर्वप्रकाशित आहेत. त्यांचा कालखंड मात्र वेगवेगळा आहे. त्यामुळे त्यांची पुन्हा एकत्रित उजळणी होऊ शकेल. आपली स्मरणशक्ती तल्लख असेल तरीही हा एकरूप असलेला संग्रह ताजा आहे आणि तो वाचनानंद देणारा अनुभव ताजाच आहे, अगदी नवांकुरलेल्या रोपासारखा. तोही दमदार, कसदार आणि सुपीक जमिनीतून आल्यासारखा!

'घड्यातील अंतर्नाद' हा लेख आरती प्रभू ऊर्फ चिंतामणी त्र्यंबक खानोलकर यांच्या साहित्य-लेखन आणि चरित्र यांचा मागोवा घेणारा आहे. खानोलकर यांनी कविता, नाटक, कादंबरी, लघुकादंबरी असा मोठा आणि दर्जेदार साहित्यखजिना आपल्यासाठी चिरंजीव म्हणून ठेवलेला आहे. या साहित्यात खानोलकर यांनी वापरलेल्या प्रतिमा आणि प्रतीके यांचा शोध घेणे, ही अवघड आणि अभ्यासाची कसोटी पाहणारी कामगिरी आहे. लेखिकेने खानोलकरी साहित्याचा सखोल अभ्यास केला. आपल्याला अपेक्षित असलेल्या गुहेच्या द्वाराशी पोहोचल्या आणि नेमकेपणाने वारंवार येणारी प्रतीके आणि प्रतिमा शोधून काढल्या, त्यांचे त्या त्यानुसार आलेले संदर्भ आणि अन्वयार्थ यांची संगती लावण्याचा प्रयत्न केला आणि तो चपखल असल्याची खात्री लेख वाचत असताना मनोमन पटत जाते. हा लेख वाचून झाला तेव्हा लेखिकेच्या प्रतिभेने थक्क झालो आणि क्षणभर वाटले, आणखी पुढे लेखिकेने काही लिहिले नसते तरी चालले असते.

पं. यशवंत देव हे संगीतकार म्हणून आपणास सुपरिचित आहेत. तसेच ते उत्तम कवी आहेत. त्यांनी आचार्य रजनीश ऊर्फ ओशो यांच्यावर ज्या कविता लिहिल्या आहते त्या 'रुबाई' या काव्यप्रकारातील आहेत. रुबाई म्हटले की उमर खय्याम आपल्या नजरेसमोर उभा राहतो. यशवंत देव यांची रुबाई उमर खय्यामच्या मांडीला मांडी लावून एकाच पंक्तीला बसणारी आहे. चार ओळीत ती कशी असते, तिचे तंत्र कसे, विषय-आशय कसा, याची सोदाहरण मांडणी व विश्लेषण लेखिकेने 'देवांची रुबाई' या लेखात केलेले आहे.

ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित विंदा यांच्या कवितेत अनेक वेळा वेगवेगळ्या रूपात आलेली प्रतिमा म्हणजे 'सुवर्ण.' या प्रतिमेचाही शोध खानोलकरांप्रमाणेच सखोल अभ्यास करून एक सुंदर लेख लिहिलेला आहे.

साहित्य हा लेखिकेचा अभ्यासाचा विषय. तो अभ्यास 'अभ्यासोनि प्रकटावे', 'काळाच्या पलीकडे', 'आमार सोनार देश' या लेखांतूनही दिसून येतो. आताचा काळ- 'डॉट कॉम'शी एकरूप झालेला आहे. 'डॉट कॉम साहित्याचे दिवस', 'आता विश्वात्मके डॉट कॉम' या शीर्षकाचे आहेत. डॉट कॉमची साहित्याशी घातली जात असलेली सांगड, ही भाषिक-साहित्यिक-वैचारिक पातळीवर कसा बदल घडवू पाहत आहे, याचा सुंदर वेध घेतलेला आहे.

आपण शैलीविषयी बोलत होतो, त्यासाठी आपल्याला 'तो अजून नीटसा भेटलाच नाही' आणि 'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती' या दोन लेखांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. आपण एखादा विषय कसा फुलवत न्यावा, त्याच्या नेमक्या जागा हळुवारपणे अधोरेखित कराव्यात, यांचा उत्तम पाठ म्हणजे हे दोन लेख आहेत. आपुलाचि संवाद आपणाशी अशी कीर्तनाला जवळीक साधावी, ही निवेदनपद्धती तर अफलातून म्हणायला हवी. संतसाहित्य आणि त्यात स्त्री संत यांच्या साहित्याचा अभ्यास, शोध लेखिकेने किती घेतला आहे, हे लेखांवरून लक्षात येते.

'अरिंदम' हे शीर्षक तसे अपरिचित किंवा आपले अज्ञान दाखवणारे. हे एका लेखाचे शीर्षक आहे आणि तेच या संग्रहासाठी योजलेले आहे. या शब्दाचा लेखिकेने दिलेला अर्थ आहे, 'शत्रूला जिंकणारा तो अरिंदम!' हा लेख समुद्रावर आधारित आहे. तो वाचत असताना असे वाटते आपण एक काव्य वाचतो आहोत. त्याच्याविषयी लेखिका लिहितात, 'समुद्र हे तुझं एक अजब रूप गर्भश्रीमंती बाळगणारं. अनेकांना अनेक प्रकारे भावणारं, अनेक प्रकारे घाबरवणारं. जीवन देणाराही तूच नि काही वेळा ते घेणाराही तूच. खरं तर तुझ्यावर स्वारी करणारे आम्ही म्हणजे तुझे शत्रूच, पण त्यांनाही जिंकणारा तूच...'

सुप्रसिद्ध कवी, संपादक अरुण शेवते यांनी ब्लर्बमधून या संग्रहाचे वैशिष्ट्य ठळकपणे उद्धृत केलेले आहे.

सतीश भावसार यांनी खूप सुंदर मुखपृष्ठ सजवलेले आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**राजा कालस्यकारणम्!**

**बा.ग. केसकर**



**झपाटलेल्या कालखंडाचे निवेदनात्मक चित्रण**

*''खरेच राजा कालस्यकारणम्! किती खरे आहे हे सुभाषित! दुर्योधनाच्या हेकटपणामुळे दोन्ही कुलांचा नाश तर झालाच पण असंख्य माणसं मारली गेली. रावणामुळे सगळा युरोप उद्ध्वस्त झाला. बेचिराख झाला. काहीही अपराध नसताना लाखो ज्यूंचे शिरकाण झाले. जपानच्या राजामुळे कित्येक सैनिक धारातीर्थी पडलेच पण ट्रूमनच्या निर्णयामुळे नागासाकी, हिरोशिमामधील लाखो निष्पाप जिवांना प्राणास मुकावे लागले, जगले ते अजून मरणप्राय यातना भोगताहेत– त्यांचा काय दोष होता?''*

भांडवलदाराने आपल्या भांडवलाच्या जोरावर एखादा उद्योग सुरू केला. त्याची चांगली भरभराट झाली, तर त्याचा फायदा सामान्यत: अनेकांना होतो. तसा त्याचा त्रासही होतो. चांगुलपणाचा आव आणला की जनतेला त्याची भुरळ पडते. ती त्यांच्यासाठी धावू लागते. यात आपण भरडले जात आहोत, आपले शोषण होत आहे, याची जाणीव तिला त्याक्षणी होत नाही. त्याचा एक धागा या कादंबरीत प्रथम येतो.

राजकारण नावाची एक संकल्पना आहे. तिचे स्वरूप अदृश्य असले तरी परिणाम प्रत्ययकारक असतात, त्याचे दृश्यस्वरूप हळूहळू आकार घेते. हा आकार फार थोड्या जनतेला लयाची संधी उपलब्ध करून देत स्वत:कडे सावलीचे श्रेय घेतो, इतरांसाठी मात्र तो क्रूरपणे झळा सोसण्यास भाग पडतो. हा दुसरा धागा या कादंबरीच्या गुंफणास सहकार्य करतो.

भाबडेपणा, बेरकीपरा, साळसूदपणा, धूर्तपणा, चाणक्यनीती या गुणांचा समुच्चय असलेली माणसे समोरासमोर येतात तेव्हा बळी जातो भाबड्यापणाचा, पण चाणक्य म्हणवणाऱ्यांनाही कुणाच्या हातचे बाहुले म्हणून वागावे लागते, हेही खरेच!

राज्यस्तरावर चालणारे राजकारण हे सत्तेभोवती रिंगण धरून चाललेले असते. त्याची नजर आणि आधार असतो तो केंद्राच्या रिंगणात वावरणारे, राजे या उपाधीचा सन्मान राखणारे थोर नेते, तर ग्रामीण भागातले सरपंच, पाटील स्तरावरचे राजकारण भावबंदकी स्वरूपाचे. यात वावरणारी सगळी मंडळी जनतेचे कल्याण करण्यासाठीच आहेत हा समज जेव्हा पीळ सैल करतो, तेव्हा अशी कादंबरी जन्म घेते, तिचे शीर्षक आहे– 'राजा कालस्यकारणम्'...

बन्सीलाल शेठ 'साखर कारखाना' हा एक उद्योग सुरू करतो. तो करण्यासाठी ज्या ज्या आवश्यक क्लृप्त्या करणे आवश्यक आहे त्या तो दूरदृष्टीने राबवतो. त्या राबवताना जो व्यवहारी धोरणीपणा आणि जिथे नमते घ्यायचे तिथे चाणाक्षपणा दाखवण्यात शेठजी जराही कसूर ठेवत नाहीत. एक हाती साखरसाम्राज्य उभे करतात तटबंदीसहित. पण काळ सगळ्या वेळी सारखाच प्रवाह धारण करत नाही. पुढे अनेक प्रवाह येऊन मिळतात. काही शुद्ध असतात तसे काही मलीन. त्यांचा परिणाम व्हायचा तोच होतो. साम्राज्याच्या तटबंदीला खिंडारे पडू लागतात, तटबंदीचे चिरे निखळू लागतात. आणि एक दिवस साम्राज्याचे विघटन होते. इथे हे आपोआप होत नाही. त्याच्यापाठी असते एक कारण, ते आहे राजकारण. नवी पिढी, नवा विचार त्यात सहभागी असतात, ईर्ष्या–रोष–अविचार आणि स्वार्थ! हे सारे या कादंबरीत आले आहे.

साखर कारखान्यासाठी ज्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या, त्या परत करताना होणारे राजकारण, लँड सिलिंग ॲक्टचे झालेले राजकारण, ग्रामपंचायतीचे झालेले राजकारण, कारखान्यात असलेल्या कामगार युनियनचे राजकारण, हे सारे चित्रित करण्यासाठी या सगळ्याचा अभ्यास, अवलोकन, अनुभव गाठीशी असावा लागतो. त्यातले बारकावे टिपताना आशयसुलभ बाधा येणार नाही, याची खबरदारी घ्यावी लागते. प्रत्येक व्यक्तिरेखेत ठसठशीतपणा साकारताना तिची उंची, मूल्ये सांभाळावी लागतात. वातावरणनिर्मिती चपखलपणे जोडून घ्यावी लागते. हे सारे या कादंबरीतून अनुभवास येते.

त्रयस्थ निवेदन पद्धतीने या कादंबरीचे लेखन झालेले आहे. तिचा कालखंड सुरू होतो स्वातंत्र्यप्राप्तीसोबतीने आणि पुढे हा कालखंड दोन पिढ्यांपर्यंतचा आहे. या काळात झालेले सामाजिक, आर्थिक, कामगारवर्ग, राजकारण या सर्वच स्तरावरील बदल लेखकाने अधोरेखित केलेले आहेत. या लेखनाला केवळ एका कालखंडाचे चित्रण म्हणता येणार नाही किंवा एका उद्योगाचे नाही. सर्वच क्षेत्रात नीतिमत्ता, मूल्ये, निष्ठा, दूरदृष्टिकोन अशा अनेकांचे जे संवर्धन न होता ऱ्हासाकडे धावत आहे, त्याचे एक उदाहरण म्हणून याकडे निर्देश करता येईल. खूप मोठा आवाका असलेले हे कथानक तत्त्वज्ञान, मानसशास्त्र यांचे दर्शन घडवते. प्रवाहाच्या ओघात जो सहजपणा असतो तशी अनेक स्थळे आपणास सहजपणे या कादंबरीत आढळतात. संवाद आणि त्यात आलेले सौंदर्य सहज भावणारे आहे.

'काही लहरी, लाटा अशा असतात की त्या, त्या त्या काळावर स्वार होतात, त्यावेळी दुसरा विचार क्षीण होत जातो.' 'कोणताही वाद, विधान परिपूर्ण असत नाही.' 'माणसाचा मूळ स्वभाव ध्यानात न घेता एक आदर्श म्हणून मॉडेल रेटले तर कालांतराने ते फोल वाटू लागते.' 'सत्ता, संपत्ती व सुंदरी माणसाच्या स्वार्थी आदिम प्रेरणेला कधी जागृत करील सांगता येत नाही.' यांसारखी सुंदर वाक्ये लेखकाच्या सामर्थ्याची साक्ष देतातच. ती वाचत असताना आपणही काही क्षण दिङ्मूढ होतो.

लेखक बा.ग. केसकर यांचे चार कथासंग्रह आणि तीन कादंबऱ्या प्रकाशित आहेत. रामदास फुटाणे दिग्दर्शित 'सुर्वंता' हा महाराष्ट्र शासन पुरस्कारप्राप्त चित्रपट त्यांच्या 'कुणाच्या खांद्यावर' या कादंबरीवर आधारित होता. 'दरी' ही कथा 'भारतीय कहानियाँ' या पुस्तकात समाविष्ट आहे.

सुप्रसिद्ध साक्षेपी संपादक विजय कुवळेकर यांची अतिशय सुंदर प्रस्तावना या कादंबरीला लाभलेली आहे. सुप्रसिद्ध चित्रकार शिरीष घाटे यांनी आशयसंपन्न सुंदर मुखपृष्ठ या कादंबरीला दिलेले आहे.

**मूल्य २५० रुपये सवलतीत १५० रुपये**

# AURIC Aurangabad Industrial City

a DMIC node

Aurangabad Industrial Township Limited's

## AURIC, City with The Golden Address



Located in the heart of Maharashtra, **Aurangabad Industrial City (AURIC)** is one of India's leading investment destinations. The greenfield smart city is being developed across an area of 10,000 acres in the outskirts of Aurangabad & is a part of the ambitious Delhi Mumbai Industrial Corridor. A Special Purpose Vehicle formed by a joint venture between National Industrial Corridor Development Corporation Limited (NICDC) & Maharashtra Investment Development Corporation (MIDC) – **Aurangabad Industrial Township Limited (AITL)** – has been set up to develop the planned city. The Dighi Port Industrial Area (DPIA), a state-of-the-art Industrial node, is also being developed by AITL in western belt of Maharashtra over an area of 6000 acres to facilitate economic prosperity of the state.

## Highlights

- ✓ Reliable 24-hours power supply
- ✓ Effluent Treatment Plants
- ✓ Well-connected Road-Rail-Air
- ✓ Walk to Work Concept
- ✓ Online Application & Single Window Clearance
- ✓ Environment Clearance Obtained
- ✓ E-Land Management System
- ✓ Obtained Power Distribution License

**Invest in AURIC** - India's first greenfield industrial smart city

&

be a part of the future

## Present Investors

AURIC facilitates business operations of more 100+ companies at present

HYOSUNG | NLMK | Perkins THE HEART OF EVERY GREAT MACHINE | Fuji Electric | oerlikon | ENDURANCE Complete Solutions

To know more about AURIC please visit www.auric.city

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.

सारस्वत बँक
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)

डेअर टू ड्रीम...



प्री-अप्रूव्हड
शैक्षणिक कर्ज
₹ 1.5 कोटींपर्यंत
@ 9% प्र. व.

विद्यार्थिनींसाठी खास 8.5% प्र.व. व्याजदर

कोर्स फीस्च्या 100% अर्थसहाय्य

परतफेडीचा कालावधी 12 वर्षे
(मोरॅटोरियम कालावधी व्यतिरिक्त)

भारतातील आणि परदेशातील शिक्षणासाठी

शैक्षणिक कर्जावरील भरलेल्या व्याजावर टॅक्स बेनिफिट
(इन्कम टॅक्स ऍक्ट १९६१ च्या कलम 80E अंतर्गत)

अधिक माहितीसाठी 90290 50027 या नंबरवर मिस्ड कॉल द्या.

नियम व अटी लागू. जुलै 2022

www.saraswatbank.com

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.